भारतीय स्वातंत्र्य • साधना साप्ताहिक ६० हीरकमहोत्सव

संस्थापक : साने गुरुजी

# साधना

शनिवार
१९ जानेवारी २००८
मूल्य रु. ८/-







अंतरंग :


* निर्भीड व बहुजनवादी विचारवंत
- राजेंद्र व्होरा
* काळाचा कैदी कालवश झाला
- विनोद शिरसाठ
* महाराष्ट्रातील सहकारी संस्था : आगामी आव्हाने
- बी. एस. बावीसकर
* वादच वाद
- निरीक्षक
* लोकशाही समाजवादाची वाटचाल
- गोविंद तळवलकर
* व्हेनेझुएला : एका सार्वमताची गोष्ट
– अशोक राजवाडे
* कैफियत
- राजन गवस
* आंतरराष्ट्रीय राजकारण
- मुनीर सय्यद
* चित्र आणि पट
- डॉ. श्रीकांत परळकर
* क्रीडांगण
- शरद कद्रेकर

राजेंद्र
व्होरा

# निर्भीड व बहुजनवादी विचारवंत

**अमेरिकेतील महाराष्ट्र फौंडेशनचा 'समाज-साहित्य-संस्कृती' क्षेत्रातील कार्यासाठीचा गौरव पुरस्कार या वर्षी प्रा.भा.ल.भोळे यांना नुकताच प्रदान करण्यात आला, त्यानिमित्ताने त्यांच्या विचारांचे व कार्याचे मर्म उलगडून दाखवणारा हा लेख...**

भास्कर लक्ष्मण भोळे यांनी बहुजनवादी चळवळ, साहित्यसमीक्षा व राज्यशास्त्र या तीन क्षेत्रांत आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. चळवळीतील कार्यकर्ते, साहित्याचे अभ्यासक व राज्यशास्त्राचे प्राध्यापक त्यांना आपला मार्गदर्शक मानतात. खानदेश, मराठवाडा व विदर्भ या विभागात शिक्षण झालेल्या व अध्यापन केलेल्या भोळेंनी वैचारिक क्षेत्रातील पुण्या-मुंबईच्या मिरासदारीला आव्हान देऊन आपले स्थान अशा प्रकारे निर्माण केले, की महाराष्ट्रातील सामाजिक चळवळ, साहित्य व राज्यशास्त्र या प्रांतांनी त्यांची नुसती दखलच घेतली असे नव्हे, तर आपापल्या प्रांतांतील सर्वोच्च सन्मान व पुरस्कार त्यांना प्रदान केले गेले. इंग्रजी भाषेत चालणाऱ्या वैचारिक व्यवहाराला पूर्णपणे बाजूला सारून मराठी भाषेत हा व्यवहार समर्थपणे कसा करता येऊ शकतो, याचा आदर्श घालून देऊन प्रा.भोळे यांनी राजवाडे, लक्ष्मणशास्त्री व य.दि.फडके यांची परंपरा पुढे चालवली आहे. आज उभा महाराष्ट्र त्यांच्याकडे एक साक्षेपी, निर्भीड व परिवर्तनवादी विचारवंत म्हणून पाहतो आहे.

भोळेंना साने गुरुजींना आदर्श मानणारे वडील व तारतम्य व स्पष्टवक्तेपणा असणारी आई लाभली. शाळेत सर्व जातिजमातींचे सवंगडी मिळाले. परंतु वैचारिक क्षेत्रातील त्यांच्या वाटचालीचा पाया घातला गेला तो औरंगाबाद शहरात. मिलिंद महाविद्यालयातील पहिल्या वर्षात त्यांचा आंबेडकरी विचारप्रणालीशी परिचय झाला व शासकीय महाविद्यालयातील तीन वर्षांत त्यांना चंद्रकांत पाटील, मोईन शाकीर, चंद्रशेखर जहागीरदार, भालचंद्र नेमाडे, रवींद्र किंबहुने, ना.धों.महानोर, रावसाहेब कसबे, अरविंद देशपांडे, मा.गो.देशमुख, सुधीर रसाळ व गो.मा.पवार यांसारखे मित्र मिळाले. औरंगाबादमधील शिक्षण व अध्यापनाच्या दहा वर्षांत प्रा.भोळे यांनी सार्वजनिक व साहित्याच्या क्षेत्रात जेव्हा पदार्पण केले, तेव्हा या मित्रांबरोबर झालेल्या चर्चा वैचारिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीने त्यांना अत्यंत उपयोगी पडल्या. भोळेंची सामाजिक बांधिलकीची भूमिका याच काळात आकार घेऊ लागली.

नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागात प्राध्यापक म्हणून १९७० साली रुजू झाल्यावर भोळेंचा औरंगाबाद शहराचा संबंध संपला, पण त्यांचे मन त्या शहरात कायमचे गुंतले गेले होते. नागपूरला आल्यावर त्यांनी वैचारिक व पाठ्यपुस्तक लेखनास प्रारंभ केला. राज्यशास्त्र नियमातील उच्च माध्यमिकपासून पदव्युत्तर पातळीपर्यंतची पाठ्यपुस्तकं तर त्यांनी लिहिलीच; पण बालभारतीच्या नागरिकशास्त्र व इतिहास या विषय समित्यांवर अध्यक्ष म्हणून काम करून तिसरी ते आठवी इयत्तेच्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीत पुढाकार घेतला. महाविद्यालयीन किंवा शालेय पाठ्यपुस्तकांच्या लेखनात वस्तुनिष्ठता व परिवर्तनवादी भूमिका यांचा मेळ घालण्यात भोळे यांनी बरीच बौद्धिक शक्ती खर्च केली आहे. त्याचप्रमाणे राज्यशास्त्रातील मूळ इंग्रजी संज्ञांना नेमके मराठी प्रतिशब्द तयार करून या विषयातील परिभाषा विकसित करण्यात ते यशस्वी झाले. एकूणच मराठीतून पाठ्यपुस्तके लिहिणे या गोष्टीला भोळे यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन इतरही प्राध्यापक या कामात रस घेऊ लागले आहेत.

समकालीन राजकीय घडामोडी व सामाजिक चळवळीतील भाष्य करणाऱ्या लेखमाला वृत्तपत्रांत लिहून भोळे यांनी पाठ्यपुस्तकेतर वैचारिक लेखनास सुरुवात केली ती साधारणत: १९७५च्या आणीबाणीनंतर. नव्याने उदयाला आलेल्या नमुना पाहणीपद्धतीला व अमेरिकी राज्यशास्त्राच्या बडेजावाला शरण न जाता भोळे यांनी आपले लेखन केले व स्वत:चे खास स्थान निर्माण केले. शास्त्रीय संशोधन पद्धती, संख्याशास्त्राचा वापर व मूल्यविरहित भूमिका या गोष्टींपासून ते दूरच राहिले. परकीय व उपरे राज्यशास्त्र या देशाला लागू पडणार नाही, एतद्देशीय संदर्भ हा जास्त महत्त्वाचा आहे, ही भूमिका घेऊन त्यांनी आपली लोकशाही समाजवादी व बहुजनवादी तत्त्वप्रणाली कधीच सोडली नाही. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला धार आली. प्रत्यक्ष संशोधन करण्याकडे कमी कल असणाऱ्या भोळेंनी पीएच.डी.साठी शेतकरी कामगार पक्षाच्या इतिहासावर जो

(पृष्ठ ११ वर

# लाखाची गोष्ट – स्वप्न व सत्य

ज्ञानपीठ विजेते वि.स.खांडेकर यांचा 'एक लाखाचे बक्षीस' हा लघुनिबंध वाचल्याचे स्मरते. लेखकाला तब्बल एक लाख रुपयाची लॉटरी लागते. लेखनकाळ ६०-७० वर्षांपूर्वीचा. त्यावेळी ही रक्कम फारच भलीमोठी. त्यामधून मिळणाऱ्या सुखांची स्वप्ने पाहण्यात लेखक मश्गुल, दुष्काळात होरपळलेल्या हाडाचा सापळा झालेल्या मुलांच्या भीक मागण्याच्या आर्त हाकेने लेखकाची तंद्री भंग पावते आणि लाखाचे बक्षीस स्वत:साठी उपभोगण्याचा अधिकार नाही असे तो मनोमन बजावतो.

काळ बदलला, राजेशाही गेली. ग्राहक राजा झाला. त्याच्या हाकांनी आसमंत भरून गेला. अशीच एक अदृश्य हाक भारतातील अगग्रण्य उद्योगपती रतन टाटा यांनी चार वर्षांपूर्वी ऐकली (पाहिली). ते भर पावसात निघाले होते. एक मध्यमवर्गीय कुटुंब मोटार सायकलवरून जाताना त्यांनी पाहिले. छोटी मुलगी पुढे टाकीवर बसवून पती मोटारसायकल चालवीत होता. मागे पत्नी बसली होती, दुसऱ्या मुलाचे आई व बाप यांच्यामध्ये सँडवीच झाले होते. अशा परिस्थितीत मोटारसायकल चालविणे हे खूपच धोकादायक असते, हे रतन टाटांना जाणवले. त्या कुटुंबप्रमुखापुढे तर पर्याय नाही, मोटार त्याला परवडत नाही, सार्वजनिक वाहतूकसेवा सक्षम नाही, रतन टाटा यांनी तेव्हाच मध्यमवर्गीयांना परवडणारी एक लाखाची मोटार बनविण्याचा निर्धार केला. याबाबत अनेक शंका-कुशंका व्यक्त झाल्या. एक लाखात मोटार शक्य नाही, स्पर्धक कंपन्या किंमती कमी करून टाटांना शह देतील, परदेशातील बड्या कंपन्या आधीच असे वाहन बाजारात आणतील असे अनेक तर्क मांडले गेले. परंतु चार वर्षांतील भाववाढ लक्षात घेताही टाटांनी आपला शब्द पाळला. ही 'नॅनो' गाडी वितरकाच्या हाती एक लाखाला पडेल. राज्याराज्यातील स्थानिक कर लक्षात घेता तिची किंमत जास्तीत जास्त एक ते दीड लाखापर्यंत जाईल. मारुती ८०० या सध्याच्या सर्वात जास्त खपाच्या छोट्या गाडीपेक्षा बाहेरून थोडी लहान पण अधिक जागा आत मिळणारी ही कार आहे. दर लिटरला २० ते २५ किलोमीटर जाईल. ही मोटार 'युरो ४'चे मापदंड पाळणारी आहे आणि ती मोटारसायकलच्या निम्म्याने प्रदूषण करेल. थोडक्यात ६०-७० हजाराची मोटारसायकल घेणाऱ्या ग्राहकाला एक समर्थ पर्याय देण्यात आला आहे. कनिष्ठ मध्यममवर्ग, छोटे व्यावसायिक, मध्यम शेतकरी हेही कार वापरू शकतील. या मोटारीच्या निर्मितीसाठी झटणारे तरुण इंजिनिअर्स हे मराठी होते, ही मराठी मनाला


**स्थापण्या**
**समता शांती**
**ठेवुनी शुद्ध**
**साधनां।**
**करिती साधना**
**त्यांना ठेवो**
**उत्स्फूर्त**
**साधना**

**१९ जानेवारी २००८**
वर्ष ६० / अंक २२

- संपादक :
  **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक :
  **विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स :– २४४३२४०२
  E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५५९६३५ / ४१
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-
- (अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ : सौजन्य – द हिंदू

सुखावणारी बाब आहे. छोट्या गाड्या-निर्मितीच्या क्षेत्रातही भारत जगाचे माहेरघर बनण्याची शक्यता आहे. 'नॅनो'च्या आधीच बजाज उद्योगसमूहाने त्यांच्या छोट्या मोटारीचे प्रारूप सादर करून छोट्या मोटारीसाठी ग्राहक मिळण्याची स्पर्धा मात्र किती मोठी आहे, याची चुणूक दाखवली आहे. दिल्लीला ज्या प्रदर्शनात या 'नॅनो' कारचे सादरीकरण झाले, त्या निमित्ताने छोट्या-मोठ्या अशा मोटारींची ६०-७० मॉडेल्स बाजारात येत असल्याचे लक्षात आले. चंगळवादी संस्कृती असे म्हणून या गोष्टीकडे नाक मुरडण्याचे दिवस संपले आहेत. विशेषत: धनिकांच्या बाळांसाठी सर्व प्रकारचा चंगळवाद अनिर्बंधपणे उधळला जात असताना आणि तो रोखण्याची शक्यता सोडाच, पण मानसिकताही दिसत नसताना अशा आक्षेपांना जनाधार मिळणे अवघड बनते आहे. समृद्धीच्या स्वप्नांनी गरिबांना ललकारले आहे आणि लाखात गाडी हा त्याच कल्पनेचा फुलोरा आहे.

मात्र हे सर्व मान्य करतानाच विवेक विचाराला सोडचिठ्ठी देण्याची गरज नाही. त्या स्वप्नांना विरोध न करता त्याबरोबरच येणाऱ्या कठोर वास्तवाचे भान तरी बाळगावयास हवेच ना? आज निवासस्थानाच्या किंमती आकाशाला भिडत आहेत. स्वत:च्या निवासस्थानी गाडी उभी करण्यास जागा मिळणे सोपे नाही. वाहन घेऊन ज्या सार्वजनिक ठिकाणी जाणार, तेथे तर पार्किंग या कल्पनेचा पुरा बोजवारा वाजला आहे. मुंबई शहरात १५ लाख मोटारी धावतात, त्यांच्यासाठीची पार्किंगची व्यवस्था केवळ आठ हजार ठिकाणी आहे. 'पे अँड पार्क' असे फलक असलेल्या जागा केवळ शंभराच्या आसपास आहेत, दर चौरस किलोमीटरमध्ये दिल्लीत १६३ वाहने, आंतरराष्ट्रीय सरासरी ३०० वाहनांची, तर मुंबईमध्ये दर चौरस किलोमीटरमध्ये ५९१ वाहने आहेत. स्वस्त आणि मस्त मोटारी यात भरच घालतील. आवश्यक तेवढे मोठे व दर्जेदार रस्ते नाहीत. वाहतुकीचे नियम पाळावेत आणि इतरांना आग्रहाने पाळावयास लावावेत ही मनोभूमिका अस्तित्वातच नाही. शंभर डॉलर प्रती बॅरल या आकाशाला भिडलेल्या इंधनदराचा प्रश्नही ज्वलंतच आहे. यामुळे महाराष्ट्रातील महानगरांच्या रस्त्यावरून 'नॅनो' धावू लागेल, याऐवजी चालू लागेल हेच वर्णन अधिक चपखल आहे. यामुळेच हे वाहन शहरात न आणता प्रामुख्याने जिल्हा, तालुका स्तरावर वितरित करण्याचे धोरण जाहीर झाले. प्रत्यक्षात काय घडते ते दिसेलच. सामान्य माणसाच्या सोईसाठी वेगवान स्वप्न, कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक आणि त्याबरोबरच सायकल चालवण्याचा व चालत जाण्याचा त्याचा हक्क परिणामकारकपणे मिळवून देणारी व्यवस्था हेच खरे उत्तर आहे. लाखाच्या स्वप्नाची दिशा नेमकी उलटी आहे.

आणखी एक बाब नोंदवावी वाटते. सामान्य माणसासाठी सुविधा द्यावयास टाटांनी केलेला तंत्रज्ञानाचा उपयोग, या सामाजिकतेचे कौतुक या लाखाच्या गाडीच्या निमित्ताने सर्व ठिकाणी वाचावयास मिळाले. त्यातील तथ्यांश मान्य करू. प्रश्न असा पडावयास, हवा की तंत्रज्ञानविकासाचे हे पाऊल टाटांनी सौरऊर्जा क्षेत्रात का उचलले नाही? टाटा उद्योगसमूहात हा विभाग आहे, ज्यामध्ये कोणतेही नवे संशोधन गेले कित्येक वर्षांत झालेले नाही. महाराष्ट्रात आजही तीस लाख कुटुंबांना वीज पोचलेली नाही. भारतात ही संख्या अनेक कोटींच्या घरात आहे. अन्न शिजवायला इंधन व रात्री गरजेपुरता प्रकाश या दोन गोष्टी जरी सौरऊर्जा तंत्रज्ञान परिणामकारक व स्वस्तपणे विकसित करून देता आल्या असत्या, तरी खऱ्या ग्रामीण गरीब माणसाला तंत्रज्ञानाद्वारे दिलासा मिळाला असता. ज्या जड वाहननिर्मितीत टाटा उद्योगसमूह आघाडीवर आहे, त्यातच सार्वजनिक वाहतुकीला कार्यक्षम परिमाण प्राप्त करून देणारी मोठी वाहने निर्माण झाली असती, तर ते आम-आदमीसाठी जास्त मोलाचे ठरले असते. असो, भांडवलदारांच्याबद्दल असा भाबडेपणा बाळगणे खरे नाही, पण 'लाखात अशी देखणी' याचे भरभरून कौतुक करताना या वास्तवाचे भान तरी विसरता कामा नये.

# काळाचा कैदी कालवश झाला...

विनोद शिरसाठ

**र.धों.कर्वे यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकात म्हटलंय, ''कितीही मोठा माणूस असला, तरी तो काळाचा कैदी असतो. गजाआडून तो किती दूरवर न्याहाळतो हे महत्त्वाचे.'' या अर्थाने य.दि.फडकेही काळाचे कैदी होते, पण गजाआडून त्यांनी विसाव्या शतकातील महाराष्ट्र जितका न्याहाळला, तितका न्याहाळणारा दुसरा विद्यमान माणूस महाराष्ट्रात तरी दिसत नाही. हा काळाचा कैदी आता कालवश झाला आहे... ते 'साधना'चे नियमित वर्गणीदार होते. फडक्यांनी 'साधना'त लेखनही केले होते आणि 'साधना समकालीन : २००७'मध्ये ध्येयवादी पत्रकारिता ज्योतीचे प्रज्वलन विंदा करंदीकरांनी केले, तेव्हा ते प्रमुख साक्षीदार होते. त्यांना विनम्र अभिवादन.**

''ठिकठिकाणी भ्रमंती करून अस्सल व अप्रकाशित कागदपत्रं जमविणे आणि राजकीय व सामाजिक चळवळीत सहभागी झालेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेऊन मिळालेली माहिती पारखून घेणे, हे संशोधनाचे 'तंत्र' मी १९६६ पासून जवळजवळ ३० वर्षे वापरले आहे.''

''माझी बरीच पुस्तके समकालीन इतिहासाच्या संशोधनावर आधारलेली असल्यामुळे आणि प्रमाणे व पुरावे सादर केल्याशिवाय निष्कर्ष काढावयाचे नाहीत, ही 'शिस्त' मी पाळत असल्यामुळे माझ्या बहुतेक पुस्तकांत अवतरणचिन्हांकित किंवा अन्य पुस्तकांतून उद्‌धृत केलेल्या मजकुराची रेलचेल असते.''

''कोणाचेही समर्थन वा निषेध करण्यापूर्वी त्या प्रश्नाची 'गुंतागुंत' शांतपणे समजावून घेणे आवश्यक असते. हे लक्षात ठेवूनच माझ्या देशबांधवांनी ही पुस्तके वाचावीत, अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.''

य.दि.फडके यांच्या वरील तीन विधानांतून आणि त्यातल्याही 'तंत्र', 'शिस्त' व 'गुंतागुंत' या तीन शब्दांतून त्यांच्या संशोधनकार्याचे मर्म हाती लागते. म्हणजे तंत्रशुद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने काम करून वेगवेगळ्या प्रश्नांतील गुंतागुंत उलगडून दाखवायची, हे त्यांच्या संशोधनाचे व्यवच्छेदक लक्षण होते. य.दि.फडके यांचे हे व्यवच्छेदक लक्षण जवळपास ५० वर्षे टिकून राहिले कसे आणि ते निर्माण झाले तरी कसे, हाच मोठ्या संशोधनाचा विषय आहे. पण त्यांच्या आयुष्यातील व कार्यातील काही तपशील नीट न्याहाळले, तर अस्पष्टसे का होईना, पण एक सूचक चित्र दिसू शकेल...

३ जानेवारी १९३१ रोजी सोलापुरात जन्मलेल्या य.दि.फडके यांचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले, तेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळालेले होते. त्यांनी पुणे विद्यापीठातून राज्यशास्त्र विषयातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले, तेव्हा म्हणजे १९५४च्या आसपास संयुक्त महाराष्ट्र चळवळ जेव्हा सुरू झाली होती. ही चळवळ महाराष्ट्राला उभे आडवे ढवळून काढत होती, तेव्हा य.दि.फडके हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयांचे धडे देत होते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले, पण बेळगाव व निपाणी यांचा समावेश त्यात झाला नाही. सोलापुरात जन्मलेल्या व त्यामुळे बेळगाव-निपाणी परिसराशी ऋणानुबंध असलेल्या तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एकूणच उद्दिष्ट न विसरणाऱ्या फडके यांना त्याचे शल्य बोचत असणार. म्हणजे एका बाजूला भावनिक गुंतवणूक व दुसऱ्या बाजूला वैचारिक गुंतवणूक अशी स्थिती प्रा.फडके यांची झाली. त्यातूनच त्यांनी पीएच्.डी.साठी ''संयुक्त महाराष्ट्र चळवळ व काँग्रेस पक्ष'' हा विषय निवडला. भारताच्या प्रदीर्घ स्वातंत्र्यलढ्याचा जवळपास ६०-७० वर्षांचा वारसा असणारा काँग्रेस पक्ष आणि अवघ्या ७-८ वर्षांत महाराष्ट्रभर पसरलेली संयुक्त महाराष्ट्र चळवळ यांचा तुलनात्मक अभ्यास करीत असतानाच फडके यांच्या भावी संशोधनाची बीजे त्यात रुजली गेली. एका बाजूला समकालीन प्रश्न आणि दुसऱ्या बाजूला त्या प्रश्नांतून गर्भित असलेला इतिहास असे दुहेरी संशोधन एकाच वेळी चालू ठेवण्याची सवयही त्यांना याच काळात लागली असावी. व्यापक अर्थाने बोलायचे, तर य.दि.फडके यांनी नंतरच्या काळात केलेले सर्व संशोधनपर ग्रंथ हे त्या प्रबंधाच्या 'तळटीपा' आहेत. म्हणजे विद्यापीठाने प्रा.फडके यांचा 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ व काँग्रेस पक्ष' हा प्रबंध स्वीकृत करून त्यांना 'डॉक्टरेट' बहाल केली, पण तेवढ्याने डॉ.फडके यांचे समाधान झाले नाही; त्या प्रबंधाच्या तळटीपा आणि त्यांच्याही तळटीपा असा शोध त्यांचा चालूच राहिला आणि त्यामुळेच महाराष्ट्राला राजवाडे, शेजवलकर, सरदेसाई, खरे, फाटक अशांच्या पंगतीत बसू शकणारा एक इतिहाससंशोधक लाभला.

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी महाराष्ट्राच्या इतिहासलेखनाची चौफेर पायाभरणी केली, तितके मूलभूत काम य.दि.फडके यांच्याकडून झाले नसेल; पण महाराष्ट्राच्या व त्या अनुषंगाने भारताच्या आधुनिक राजकीय इतिहासातील अनेक गुंते त्यांनी उलगडून दाखवले. जवळपास ६० पुस्तके व कित्येक प्रकाशित लेख यांद्वारे हे काम त्यांनी केले आणि 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' हा आठ खंडांचा संच तर त्यांच्या चिकाटीचा व दीर्घोद्योगी प्रवृत्तीचा निदर्शक आहे. सुरुवातीला टिळक-आगरकर-वादासंबंधी असलेल्या अनेक अनुत्तरित प्रश्नांचा छडा लावण्यासाठी त्यांनी 'शोध बाळ-गोपाळांचा'

लिहिले; ब्राह्मण व ब्राह्मणेतर चळवळीच्या संदर्भात म.फुले, शाहू महाराज, जेधे, जवळकर यांचे कार्य पुढे आणले; सावरकरांची त्रिखंडात गाजलेली उडी आणि त्यांची मुक्तता सशर्त की बिनशर्त, असा वाद उभा राहिला; तेव्हा 'शोध सावरकरांचा' लिहिले. लो.टिळक व सुभाषबाबू यांच्याबाबतच्या आख्यायिका उलगडून दाखविण्यासाठी त्यांनी लेखन केले. तसेच अरुण शौरींनी 'वर्शिपिंग फॉल्स गॉड' लिहून इतिहासाचा विपर्यास करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा 'आंबेडकरांचे मारेकरी' लिहिले. नथुराम गोडसे यांचे उदात्तीकरण करू पाहणारे नाटक आले, तेव्हा 'नथुरामायण' लिहिले. हे सर्व करताना 'अस्सल कागदपत्रे व ठोस पुरावे' हे तंत्र त्यांनी सोडले नाही. एकदम नवा विषय, नवा वाद उफाळून आला, सार्वत्रिक चर्चेला ऊत आला, तर डॉ.फडके नव्याने अभ्यास करून त्या विषयाची उकल करून दाखवत; मग तो समान नागरी कायद्याचा प्रश्न असो, सोनिया गांधींच्या परदेशी नागरिकत्वाचा मुद्दा असो किंवा राज्यघटनेतील दुरुस्ती-विधेयके असोत. 'न्यायालयात मधु लिमये' या शीर्षकाचेही एक पुस्तक ते लिहू शकले. अशा या संशोधकाला खोडून काढणे सोपे नव्हते.

अर्थात, य.दि.फडके पुरावे व दस्तऐवज यांचे नको तितके स्तोम माजवतात, त्यांच्या मांडणीला शैली नाही, त्यांच्या लेखनात घटना वा व्यक्तीबद्दल जिव्हाळा नसतो, ते हातचे राखून विश्लेषण करतात, अनेक वेळा ते निष्कर्षाप्रत येत नाहीत, प्रस्थापित विचाराला मूलभूत कलाटणी दिली, असे त्यांच्या लेखनात फारसे आढळत नाही यांसारखे आक्षेप त्यांचे चाहतेही घेत राहिले. यातले बहुतांश आक्षेप त्यांना कमी-अधिक प्रमाणात मान्यही होते. पण या आपल्या मर्यादा आहेत, तसेच हीच आपली सामर्थ्येही आहेत, याची त्यांना जाणीव होती. 'घटना बोलतात, मतप्रदर्शनाची फारशी गरज नाही,' या त्यांच्या सूत्राचा काही संशोधकांनी उपहास केला; पण केवळ वस्तुस्थिती पुराव्यानिशी पुढे आणून आणि कल्पना व वास्तव वेगळे करून त्यांनी महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासातील अनेक आख्यायिका उद्ध्वस्त केल्या, हेही अनेक संशोधक मान्य करतात.

संशोधन ही एक न संपणारी प्रक्रिया आहे, तिला तंत्र व शिस्तीची जोड हवी, सतत नवनवीन दस्तऐवज अथवा पुरावे पुढे येत असतात, त्यामुळे निष्कर्ष काढण्याची घाई नसावी, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळेच त्यांच्या लेखनात मोठमोठी विशेषणे किंवा भारावलेपण यांचा अभाव असतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही तर्ककठोरपणा यातूनच आला असावा. आचार्य अत्रे जन्मशताब्दीच्या काळात एका कार्यक्रमात य.दि.फडक्यांच्या पुस्तकातील एका विधानाच्या आधारे एक वक्ते म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्र मिळाला, त्यांचा सर्वांत मोठा वाटा अत्रे यांच्याकडे जातो. त्यावेळी व्यासपीठावरच असलेले य.दि.फडके ताबडतोब म्हणाले, 'सर्वांत' हा शब्द मी वापरलेला नाही. 'त्यांच्याच एका सत्कारसोहळ्यात 'संशोधनाची शिस्त असलेले य.दि.' असा उल्लेख करणाऱ्या वक्त्याला मध्येच थांबवून ते म्हणाले, ''संशोधनात 'शिस्त' हा शब्द येऊन जातो, त्यामुळे 'संशोधनाची वृत्ती असलेले य.दि.' असे म्हणा.'' 'असा हा महाराष्ट्र' या पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभात 'के.सागर'चे संचालक म्हणाले, ''प्रशासनात अधिकारी होणारे विद्यार्थी जेव्हा वेगवेगळ्या संदर्भग्रंथामुळे गोंधळून जातात, तेव्हा ते के.सागरला प्रमाण मानतात आणि के.सागर गोंधळून जातात, तेव्हा ते य.दि.फडक्यांना प्रमाण मानतात. पण य.दि. कोणाला प्रमाण मानतात, ते आम्हाला माहीत नाही.' आपल्या भाषणात य. दि. इतकेच म्हणाले, की 'प्रमाण मानले जाते, त्यावर पुनर्विचार सुरू होतो, तेव्हा तो संशोधनाचा प्रारंभ असतो.'

य.दि.फडके यांच्याकडे हा वस्तुनिष्ठपणा, नि:स्पृहपणा आणि ताठ बाणा त्यांचे दोन गुरू द.रा.बेंद्रे आणि न.र.फाटक यांच्याकडून आला. न.र.फाटक यांनी तर 'रानडे, टिळक, गोखले, आगरकर' या चौकडीतील आगरकरांचे पुस्तक आपल्या हातून पूर्ण होत नाही असे लक्षात आले, तेव्हा ते पुस्तक य.दि.फडक्यांनीच लिहावे, अशी इच्छा व्यक्त केली. आजही आगरकरांची, आळतेकर व य.दि.फडके यांनी लिहिलेली दोन पुस्तकेच 'प्रमाण' मानली जातात. १९९५ साली सेना-भाजप युतीचे सरकार स्थापन झाल्यावर पहिल्याच दिवशी य.दि.फडके यांनी साहित्य संस्कृती मंडळाच्या आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा पाठवला. कशासाठी? तर नवीन सरकारला आपल्या पसंतीची माणसं भरता यावीत म्हणून! इ.स.२००० साली बेळगावला झालेल्या साहित्य संमेलनात सीमा प्रश्नावर लढण्यासाठी प्रयत्न करणार असे य.दि.फडके यांनी जाहीरपणे सांगितले, पण वर्षभरानंतरही काहीच घडले नाही म्हणून 'दै. सकाळ'मध्ये लेख लिहून त्यांनी माफीही मागितली. एका बाजूला संशोधनातून येणारी तर्ककठोरता, तर दुसऱ्या बाजूला लोकशाही मूल्यांतून येणारी नम्रता यांतून यशवंत दिनकर फडके यांचे व्यक्तिमत्त्व घडलेले होते. त्यांनीच र.धों.कर्वे यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकात म्हटलंय, ''कितीही मोठा माणूस असला, तरी तो काळाचा कैदी असतो. गजाआडून तो किती दूरवर न्याहाळतो हे महत्त्वाचे.'' या अर्थाने य.दि.फडकेही काळाचे कैदी होते, पण गजाआडून त्यांनी विसाव्या शतकातील महाराष्ट्र जितका न्याहाळला, तितका न्याहाळणारा दुसरा विद्यमान माणूस महाराष्ट्रात तरी दिसत नाही. हा काळाचा कैदी आता कालवश झाला आहे... ते 'साधना'चे नियमित वर्गणीदार होते. फडक्यांनी 'साधना'त लेखनही केले होते आणि 'साधना समकालीन : २००७'मध्ये ध्येयवादी पत्रकारिता ज्योतीचे प्रज्वलन विंदा करंदीकरांनी केले, तेव्हा ते प्रमुख साक्षीदार होते. त्यांना विनम्र अभिवादन.

**– विनोद शिरसाठ**

■

# महाराष्ट्रातील सहकारी संस्था : आगामी आव्हाने

**बी.एस.बावीसकर यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांतील पदव्युत्तर पदवी घेतली. दिल्ली विद्यापीठात व इतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठातून त्यांनी अध्यापन केले आहे. ग्रामीण भागाच्या संदर्भात विकासाचे समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र व औद्योगिक समाजशास्त्र या विषयातील विशेषज्ञ म्हणून ते प्रसिद्ध आहेत.**

'इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल विकली' या नियतकालिकाच्या २० ऑक्टो. २००७ च्या अंकात 'को-ऑपरेटिवज इन महाराष्ट्रा : चॅलेंजेस अहेड' हा त्यांचा लेख प्रसिद्ध झाला, त्याचाच हा अनुवाद...

**बी. एस. बावीसकर**

सहकाराच्या क्षेत्रात भारतातील एक आघाडीचे राज्य अशी महाराष्ट्राची ओळख करून दिली जाते. १९६० ते १९८० ही दोन दशके राज्याच्या सहकार चळवळीचे 'सुवर्णयुग' मानली जातात. विठ्ठलराव विखे-पाटील आणि धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकारामुळे, अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे १९५१-५२ साली देशातील पहिला सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे उभा राहिला. त्यानंतर चारच वर्षांनी अहमदनगर जिल्ह्यातच कोपरगावजवळील कोळपेवाडी येथे, गणपतराव औताडे-पाटील यांच्या प्रयत्नाने दुसरा सहकारी साखर कारखाना सुरू झाला. १९५९ साली असेच डझनभर कारखाने निघाले आणि त्यानंतर थोड्याच काळात, महाराष्ट्रातील विविध भागांत फार मोठ्या संख्येने सहकारी साखर कारखाने सुरू झाले. १९८० साली त्यांची संख्या शंभराहून अधिक झाली आणि १९८८ साली तर उत्तर प्रदेशला मागे टाकून महाराष्ट्र हे देशात सर्वाधिक साखर उत्पादन करणारे राज्य बनले.

या कारखान्यांच्या यशस्वी वाटचालीमुळेच त्यांच्या सानिध्यातच इतर अनेक प्रकारच्या सहकारी संस्थांचे जाळे तयार झाले. सहकारी सूत गिरण्या, सहकारी कुक्कुटपालन, सहकारी दूध संघ, सहकारी कृषी उत्पादन प्रक्रिया केंद्र, सहकारी खरेदी-विक्री संघ, तत्सम सहकारी उद्योग, सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँका या त्यांच्यापैकी काही.

**सत्तेची नवी केंद्रे**

त्या काळातील महाराष्ट्रात तीन महत्त्वाची सत्ताकेंद्रे होती : पंचायती राज संस्था, सहकारी संस्था आणि काँग्रेस पक्ष. आमदार-खासदार, मंत्री बनण्याची आकांक्षा बाळगणारांना याच्या मार्फतच प्रवास करावा लागत होता. ग्रामपंचायत ते राज्य विधानसभा आणि ग्रामीण पतसंस्था ते सहकारी साखर कारखाना व जिल्हा बँका या सर्व क्षेत्रांत होणारा सत्तासंघर्ष मुख्यत: काँग्रेसजनांतच होत होता. त्यामुळे प्रत्येक पातळीवर काँग्रेसच्या अंतर्गतच किमान दोन प्रतिस्पर्धी गट असत. इतर पक्ष कमकुवत असल्याने या अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेस पक्षाचे गंभीर नुकसान झाले नाही. उलट पक्षश्रेष्ठींनी पक्षाच्या अंतर्गत सत्तासंघर्षात या गटा-तटांचा अत्यंत हुशारीने वापर करून घेतला.

राज्यातील सर्वांत मोठा जातिसमूह असलेल्या मराठा समाजाने ग्रामपंचायती, सहकारी संस्था, काँग्रेस पक्ष आणि राज्य विधानसभा या सर्व ठिकाणच्या महत्त्वाच्या जागा काबीज केल्या होत्या. त्यामुळे माळी, धनगर, वंजारी या अल्पसंख्य जातींना सत्तेतील महत्त्वाची पदे मिळवायला फारच कमी वाव होता. त्यांना संतुष्ट ठेवण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांचे व्हाईस चेअरमन किंवा जिल्हा परिषदेतील दुय्यम पदांवर संधी दिली जात होती. या लहान जातीतील नेत्यांना राग, संताप येत होता; पण होणारी मानहानी ते निमूटपणे सहन करत होते. यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्राच्या राजकारणावर पकड राहिली, याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे ते बहुसंख्य असलेल्या मराठा समाजातील होते; आणि त्यामुळेच दिल्लीतील सत्तेच्या खेळात त्यांचे स्थान बळकट होते.

याच काळात राज्यातील सहकारक्षेत्रात विठ्ठलराव विखे-पाटील, धनंजयराव गाडगीळ, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, वसंतदादा पाटील, अण्णासाहेब शिंदे, यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे यांच्यासारखे कर्तबगार नेते उदयाला आले. त्यांनी आपापल्या भागातील सहकारी संस्था, स्वावलंबी व आर्थिक दृष्टीने भक्कम केल्या आणि यशस्वी उद्योजकतेची झळाळणारी उदाहरणे दाखवून दिली. त्यामुळे या काळाला 'सहकाराचे सुवर्णयुग' असे म्हटले गेले, त्यात आश्चर्य नाही.

**भ्रष्टाचाराचा उगम**

या सहकारी संस्थांचा ऱ्हास १९८० व १९९० च्या दशकांत झाला, त्याला अनेक कारणे आहेत; पण काँग्रेस पक्ष दुर्बल झाल्यामुळे त्याची सहकारी संस्थांवरील पकड सुटली, की सहकारी संस्थांवरील नियंत्रण सुटल्यामुळे तो पक्ष दुर्बल झाला हे शोधून काढणे सोपे नाही.

इंदिरा गांधींनी १९८० मध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे पुन्हा हातांत घेतल्यावर, सर्व सत्ता स्वत:च्या ताब्यात ठेवण्यासाठी, भक्कम असलेली पक्षरचना खिळखिळी करायला सुरुवात केली. त्यांना या साखरसम्राटांचे वर्चस्व सहन होत नव्हते, कारण त्यांच्यावर यशवंतराव चव्हाणांची पकड होती. इंदिरा गांधींनी, शंकरराव चव्हाण या मराठा समाजातील नेत्याला यशवंतराव चव्हाणांच्या विरोधात पुढे यायला उत्तेजन दिले; यामागे साखर सम्राटांची आणि त्यांचे नेते असलेल्या

यशवंतराव चव्हाणांची सत्ता कमी करणे असा दुहेरी हेतू होता. इंदिराजींचे चिरंजीव संजय गांधी यांचे प्राबल्य वाढले त्या काळात, जनसामान्यांत स्थान नसलेल्या बाबासाहेब भोसले, अ.र.अंतुले यांसारख्या नेत्यांना मुख्यमंत्रीपदावर बसवले गेले आणि एके काळी शक्तिशाली असलेल्या 'सहकार लॉबी'ला बाजूला टाकणे सुरू झाले.

या नेतृत्वबदलाच्या प्रकाराबरोबरच, त्या काळात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या, ज्यामुळे सहकारी संस्थांचा ऱ्हास होत गेला. पहिली घटना : १९७७च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधी व त्यांच्या काँग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला आणि मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाचे सरकार आले. नव्या सरकारने साखर नियंत्रणमुक्त ठेवण्याच्या बाजूने निर्णय घेतला, परिणामी साखरेच्या किंमतीत नाट्यमयरित्या घसरण झाली आणि अडीच रुपये किलो इतक्या स्वस्त दराने साखर विकली गेली. साखरेचे भाव कोसळल्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम पुढील वर्षी उसाच्या लागवडीवर आणि पर्यायाने साखर उत्पादनावर झाला; त्यामुळे साखरेचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला. चलनवाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने साखरेच्या कमाल किंमतीवर मर्यादा घातली. बाजारात साखरेचा तुटवडा निर्माण झाल्याने आणि पुरवठ्यापेक्षा मागणी फार वाढल्याने, व्यापाऱ्यांनी साखर कारखान्यांच्या मालकांना 'ऑन मनी' देऊ केला. साखर उद्योजकांना मिळू लागलेला 'ऑन मनी' सरकारने ठरवून दिलेल्या भावापेक्षा कितीतरी अधिक होता आणि इथूनच साखर उद्योगात काळ्या बाजाराची सुरुवात झाली.

अगदी अचानक पैशांचा ओघ सुरू झाल्यावर त्याचा चांगला उपयोग कसा करता येईल, याबाबत सुरुवातीच्या काळात साखर सम्राटांना निश्चित काही ठरवता येत नव्हते. सहकारातील काही नेत्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप टाळण्यासाठी पारदर्शक कारभारशैली अवलंबायचे ठरवले. अनेक सहकारी साखर कारखान्यांनी या 'ऑन मनी'चा प्रश्न चर्चिण्यासाठी आपल्या संचालक मंडळाच्या बैठका बोलावल्या. काहींनी तर हा प्रश्न वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवला. ठराव असे मंजूर केले गेले, की हा 'ऑन मनी' स्वतंत्र ठेवावा आणि सभोवतालच्या परिसराच्या विकासासाठी वापरावा. दरम्यानच्या काळात स्थानिक पातळीवरील निवडणुका वारंवार होऊ लागल्याने खूप पैसे खर्च होत होते; त्यामुळे काही नेत्यांनी अचानक हाती आलेले हे घबाड वेगवेगळ्या निवडणूक प्रचारासाठी वापरायचे ठरवले. अखेर पैशाच्या वापराबाबतचे सर्व संशय खरे ठरले. त्या नेत्यांनी हा सर्व पैसा खिशात कोंबला. हे सर्व व्यवहार बेकायदेशीर असल्याने गोळा केलेल्या या प्रचंड निधीच्या पावत्या, जमाखर्च, हिशोब ठेवले गेले नव्हते.

दुसरी महत्त्वाची घटना : १९८० मध्ये संजय गांधी यांनी निर्माण केलेल्या दबावामुळे, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर अ.र.अंतुले यांची नियुक्ती झाली. या खेळीचा मुख्य उद्देश सहकार लॉबीतील शक्तिशाली मराठा नेत्यांना वेसण घालणे हाच होता. अंतुले यांना सहकाराशी काहीच देणे-घेणे नव्हते आणि त्यांना जनसामान्यांतून पाठिंबाही नव्हता. इंदिरा गांधींना खूष करणे आणि त्यांच्याशी असलेला निष्ठेचे प्रदर्शन करणे यासाठी अंतुले यांनी 'इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठान'ची स्थापना केली. त्या प्रतिष्ठानला सहकारी साखर कारखाने आणि इतर सहकारी संस्थांनी देणग्या द्याव्यात यासाठी त्यांनी दबाव निर्माण केला. किंबहुना मोठ्या सहकारी संस्थांना त्यांचा 'कोटा' ठरवून दिला आणि स्टील, सिमेंट यांसारख्या नियंत्रित वस्तूंच्या व्यापाऱ्यांना सढळ हाताने देणग्या देण्यास भाग पाडले.

महाराष्ट्रातील सहकारातील नेते अंतुले यांच्यापासून एक महत्त्वाचा धडा शिकले, अंतुलेंच्याच पावलावर पाऊल ठेवून त्यांनी शैक्षणिक संस्था व प्रतिष्ठानांची स्थापना करायला सुरुवात केली आणि त्यासाठी साखर कारखान्यांच्या सभासदांना देणग्या देण्यास भाग पाडले. अत्यंत हुशारीने त्यांनी ही प्रतिष्ठाने कायदेशीरपणे सहकारी संस्थांपासून दूर ठेवली. या नेत्यांनी स्वत:ला किंवा कुटुंबातील व्यक्तींना त्या प्रतिष्ठानांवर तहहयात विश्वस्त नेमले आणि साखर कारखान्यांवरील नियंत्रण सुटले तरी या संस्था आपल्याच नियंत्रणाखाली राहतील, अशी तरतूद करून ठेवली. त्यामुळे करोडो रुपयांचे व्यवहार करणारी प्रतिष्ठाने महाराष्ट्रात सर्वत्र अस्तित्वात आली. म्हणजे सर्व संबंधितांच्या मूकसंमतीने भ्रष्टाचार हा महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे उघड गुपीत आणि अविभाज्य वैशिष्ट्य बनला.

सहकारी संस्थांच्या सर्वसाधारण सभासदांकडून गोळा केलेल्या पैशातून या नेत्यांनी मोठमोठी शैक्षणिक संकुले उभारली. तेथील इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट कॉलेजेसच्या प्रवेशासाठी त्यांनी अमाप कॅपिटेशन फी आकारली. अशा प्रकारे कालच्या सहकार महर्षींनी स्वत:ला शिक्षणसम्राटात रूपांतरित केले. हे सर्व व्यवहार पावतीशिवाय, हिशोबाशिवाय टेबलाखालून होत राहिले; कॅपिटेशन फीजचे कसलेही रेकॉर्ड ठेवले गेले नाही.

**घराणेशाहीचा उगम**

गेल्या दोन दशकांत 'घराणेशाही' हे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे आणि इतर महत्त्वाच्या सहकारी संस्थांचे सर्वसाधारण वैशिष्ट्य झाले आहे. आदर्श सहकाराचे तीर्थक्षेत्र असे कौतुक केले जाते, त्या आद्य सहकारी साखर कारखान्यात (प्रवरानगर येथे) संस्थापक विठ्ठलराव विखे-पाटील यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव बाळासाहेब विखे-पाटील आले आणि नंतर त्यांनी आपले चिरंजीव राधाकृष्ण विखे-पाटील यांना त्या कारखान्याचे चेअरमन केले. म्हणजे एकाच कुटुंबाच्या सलग तीन पिढ्यांच्या नियंत्रणाखाली हा कारखाना राहिला. याच इतिहासाची पुनरावृत्ती महाराष्ट्रातील सहकाराचे जे आणखी एक पवित्र स्थान मानले जाते, त्या कोल्हापूर जिल्ह्यातील वारणानगर येथे झाली. तेथील कारखान्याचे संस्थापक तात्यासाहेब कोरे यांच्या निधनानंतर, त्यांचे चिरंजीव चेअरमन झाले आणि आता तात्यासाहेबांचे नातू विनय कोरे चेअरमनपदावर आहेत. सांगली येथील वसंतदादा सहकारी साखर कारखाना आणि वाळवा येथील राजारामबापू सहकारी साखर कारखाना येथे त्यांच्या संस्थापकांचे चिरंजीव अनुक्रमे प्रकाशबापू व जयंतराव चेअरमन आहेत. अग्रेसर मानल्या जाणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव व संजीवनी सहकारी साखर कारखान्यांवर अनुक्रमे शंकरराव काळे व शंकरराव

कोल्हे या प्रभावशाली नेत्यांनी आपापले चिरंजीवच कारखान्याचे चेअरमन होतील याची काळजी घेतली. काळे आणि कोल्हे यांच्यातील दीर्घकाळ चालू असलेली राजकीय स्पर्धा त्यांच्या चिरंजीवांतही आहे. ते दोघे २००४ साली कोपरगाव विधानसभा मतदारसंघातून परस्परांच्या विरोधात निवडणूक लढले होते. पराभूत झालेले बिपिन कोल्हे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार होते तर विजयी झालेले अशोक काळे हे शिवसेनेच्या गोटात होते. सहकारातील आणखी एक मोठे संकुल असलेल्या सातारा जिल्ह्यातील कराड येथे, यशवंतराव मोहिते आणि जयंतराव भोसले हे दोन भाऊ सत्तेसाठी गेली दोन दशके परस्परांशी लढत आहेत; त्यामुळे सत्तासंघर्ष एकाच कुटुंबात मर्यादित राहिला आहे.

जागतिकीकरणाच्या आगमनामुळे सहकार क्षेत्राला नव्या आव्हानांचा सामना करावा लागतोय. खाजगीकरणाच्या ट्रेंडमुळे सहकारावर प्रतिकूल परिणाम होत आहे. पण या व्यापक बदलांमुळे होणाऱ्या परिणामांची यथायोग्य जाणीव असलेले नेते मात्र फारसे नाहीत.

**आर्थिक स्थितीची घसरण**

एका अहवालानुसार इ.स.२००० मध्ये महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका होत्या. त्यातल्या फक्त १५ बँकांनीचे ८८.१९ कोटी रुपये इतका नफा मिळवला आणि उरलेल्यांनी ३८६.७९ कोटी रुपयांचा तोटा ओढवून घेतला. (संदर्भ– सहकारी महाराष्ट्र : २०००) अनियंत्रित भ्रष्टाचार हे या बँकांच्या तोट्यात जाण्याचे मुख्य कारण आहे. नागपूर, वर्धा आणि उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे ६४ संचालक आणि चार नागरी सहकारी बँकांचे ६५ संचालक, या सर्वांनी मिळून शासकीय दस्तऐवजात फेरफार करून एकूण २५० कोटी रुपयांची अफरातफर केली. या १२९ संचालकांच्या व्यक्तिगत मालकीची २२.८९ कोटी रुपये किंमतीची मालमत्ता राज्य सरकारने जप्त केली. (द. लिंक २००२)

आज एकूण सहकारी साखर कारखान्यांतील बरेच कारखाने आजारी आहेत. २००३ मध्ये मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे सांगितले की चालू असलेल्या ११० साखर कारखान्यांपैकी ५२ कारखाने आजारी आहेत आणि त्याचवेळी त्यांनी हेही जाहीर केले की राज्य सरकारची आर्थिक स्थिती सुधारत नाही तोपर्यंत नवीन सहकारी साखर कारखाने काढायला परवानगी दिली जाणार नाही. (को-ऑपरेटिव्ह शुगर प्रेस न्यूज : २००३) त्या पुढील वर्षांत ही परिस्थिती आणखी खालावत गेली. २००४-०५ मध्ये राज्यातील एकूण १९० साखर कारखान्यांपैकी फक्त ७० कारखान्यांनाच खर्च वजा जाता अधिक रक्कम मिळाली, २६ कारखाने दिवाळखोरीच्या काठावर होते. पण १७ कारखाने खरोखर आजारी होते आणि ७७ कारखाने तर अक्षरश: बंद पडले. (हे आकडे वेगवेगळ्या अधिकृत व अनधिकृत अहवालांतून घेतले आहेत.) राज्यातील १७ सहकारी साखर कारखान्यांकडे ३१ मार्च २००० पर्यंत जवळपास १५७.९५ कोटी रुपयांची थकबाकी (व्याजासह) होती. (सहकारी महाराष्ट्र : २०००) १९७० च्या दशकात तोट्यात असलेले अनेक खाजगी साखर कारखाने, स्थानिक ऊस उत्पादकांनी खरेदी करून त्यांचे रूपांतर सहकारी साखर कारखान्यात केले आणि ते नफ्यात चालवले. दैवदुर्विलास असा आहे, की आता तोट्यात असलेले काही सहकारी साखर कारखाने, खाजगी उद्योजकांना भाडेतत्त्वावर चालवायला दिले आहेत. अशी हलाखीची परिस्थिती असतानाही २००२ साली मुख्यमंत्र्यांनी या आजारी कारखान्यांना, त्यांची स्थिती सुधारेल या आशेने १५०० कोटी रुपयांचे अनुदानवजा कर्ज मंजूर केल्याचे घोषित केले.

मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली दबल्यामुळे गंभीर आजारी असलेल्या आणखी अनेक सहकारी संस्था आहेत. सहकारी कृषिप्रक्रिया उद्योगातील सहा घटकांकडे ३१ मार्च २००० पर्यंत १५३.५० कोटी रुपये कर्जाची थकबाकी (व्याजासह) आहे. त्याचप्रमाणे याच तारखेपर्यंत २५ सहकारी सूत गिरण्यांकडे तब्बल २९५.३१ कोटी रुपयांचे कर्ज फेडणे बाकी आहे. एकट्या अहमदनगर जिल्ह्यातच २००० पैकी २०० सहकारी पतसंस्था दिवाळखोर म्हणून घोषित झाल्या आहेत.

अनेक सहकारी संस्था प्रचंड नुकसान, निधीची अफरातफर आणि विविध प्रकारचे घोटाळे यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. पण तेरणा सहकारी साखर कारखान्यात जे झाले, ते लज्जास्पद आणि धक्कादायक आहे. महाराष्ट्राचे माजी पाटबंधारे मंत्री पद्मसिंह पाटील हे त्याचे चेअरमन आहेत, ते शरद पवारांचे जवळचे नातलग आणि विश्वासू शिलेदार आहेत. १९९९-२००१ मध्ये पद्मसिंह पाटील यांनी तेरणा सहकारी साखर कारखान्याच्या भागधारकांना आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील इतर दात्यांना, विविध समाजोपयोगी कार्यासाठी देणगी देण्यास प्रवृत्त केले. उदाहरणार्थ : आसाम मदत निधीसाठी १०.६० लाख रुपये, कारगिलमध्ये बळी गेलेल्या शूर सैनिकांच्या कुटुंबियांना १५.०५ लाख रुपये, गुजरात भूकंपग्रस्त निधीसाठी १०.३० लाख रुपये आणि साखर संकुलाच्या इमारतनिधीसाठी १६.०१ लाख रुपये. हे सर्व ५१.९६ लाख रुपये देणग्यांच्या माध्यमातून गोळा केले होते, पण त्यातला एकही रुपया ज्या कारणासाठी हे पैसे गोळा केले त्यासाठी वापरला गेला नाही. हे सर्व पैसे पद्मसिंह पाटील व यांच्या डबघाईला आलेल्या सहकारी संस्थेला वाचवण्यासाठी, त्यांचे दैनंदिन खर्च भागविण्यासाठी वापरले गेले. सरतेशेवटी या सहकारी संस्थेकडे विविध वित्तसंस्थांची देणी २०० कोटींच्या आसपास आहेत. शिवाय कायम झालेल्या कामगारांना नियमित पगार नाही, भागधारक शेतकऱ्यांना लाभांश दिला गेला नाही आणि निवृत्त झालेले कामगारही लाखो रुपयांची थकबाकी कधी मिळते याची वाट पहात आहेत. उसाचे उत्पादन वाढविण्यासाठी भागधारक शेतकऱ्यांना मंजूर केलेले १.३ कोटी रुपये अनुदान कारखान्याच्या दैनंदिन खर्चासाठी वापरले गेले, हे स्वत: पद्मसिंह पाटील यांनीही कबूल केले आहे.

**आशेचा किरण**

असे असले तरीही आशेचा किरण आहेच. आहे त्या स्थितीतही सकारात्मक घटक ओळखून सहकाराचे पुनरुत्थान करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. हे सकारात्मक घटक कोणते ते ओळखण्यासाठी मात्र महाराष्ट्राकडे भारताच्या संदर्भातच पाहिले पाहिजे.

१९९९-२००० मध्ये भारतात ५,०४००० सहकारी संस्था होत्या, त्यांचे २०.९१ कोटी सदस्य होते. (महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली : २००१) त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात १,५२६१९ संस्था आणि ४.१४ कोटी सदस्य आहेत. याचा अर्थ एकट्या महाराष्ट्रातच देशातील ३० टक्के सहकारी संस्था आणि २० टक्के सदस्य आहेत. याच वर्षी राज्यातील सहकारी संस्थांचे भागभांडवल ४५६० कोटी रुपये, ठेवी ३५३११ कोटी रुपये आणि खेळते भांडवल ७०५०१ कोटी रुपये होते. (सहकारी महाराष्ट्र : १९९९) म्हणजे इतके सारे घडत असूनही महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर आहे.

१९८८ पासून साखर उत्पादनाच्या बाबतीत भारत देश जगात प्रथम क्रमांकावर आहे आणि महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक साखर उत्पादन करणारे राज्य आहे. २००१-०२ मध्ये भारताने १८.५२ दशलक्ष टन साखरेचे उत्पादन केले, त्यातील ५.५६ दशलक्ष टन उत्पादन एकट्या महाराष्ट्राने केले आणि हे सर्व साखर उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही अभिमानाची बाब आहे. (को-ऑपरेटिव्ह शुगर प्रेस न्यूज : २००३) सांगली जिल्ह्यातील वाळवा येथील हुतात्मा आहिर सहकारी साखर कारखाना हा देशभरात 'एक आदर्श साखर कारखाना' म्हणून ओळखला जातो. साखरेचा सर्वाधिक उतारा मिळण्याच्या बाबतीत तो कारखाना देशात प्रथम क्रमाकांवर आहे. शिवाय भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक कारभार आणि सर्वाधिक उत्पादन घेणारा कारखाना अशी ख्यातीही त्याने मिळवली आहे.

जगात सर्वाधिक दुधाचे उत्पादन करणारा देशही भारतच आहे. १९९८ मध्ये भारताने ७४ दशलख टन दुधाचे उत्पादन केले आणि दूध उत्पादनाच्या क्षेत्रात भारत जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर गेला, ते स्थान आजपर्यंत कायम राखले आहे. (सहकारी महाराष्ट्र : १९९९) आज गुजरातमधील सहकारी दूध संघ आघाडीवर असला तरी दूध उत्पादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात दुसऱ्या स्थानावर आहे.

भारतात १५०० नागरी सहकारी बँका आहेत; त्यापैकी ६०० हून अधिक म्हणजे ४० टक्के बँका एकट्या महाराष्ट्रात आहेत. देशातील नागरी सहकारी बँकांतील एकूण ठेवी ४०,७०० कोटी रुपयांच्या आहेत. त्यातल्या २३००० कोटी रुपयांच्या म्हणजे ५६ टक्के ठेवी एकट्या महाराष्ट्रातील बँकांमध्ये आहेत. (सहकारी महाराष्ट्र : २०००).

यशस्वी सहकाराचे आणखी एक उदाहरण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा कृषिउद्योग संकुलातील वारणा सहकारी बाजार. वारणेच्या खोऱ्यातील ७८ खेड्यांतील ग्राहकांना त्याचा उपयोग होतो. त्याची वार्षिक उलाढाल ४० कोटी रुपयांची आहे, जी देशांतील पहिल्या पाच सहकारी ग्राहक संस्थांतील एक म्हणून गणली जाते. त्याची नोंद करण्यालायक आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागात असलेली अशा प्रकारची सहकारी ग्राहक संस्था ही भारतातील एकमेव आहे. त्याहून अधिक विशेष हे आहे की या सहकारी संस्थेची चेअरमन एक महिला आहे आणि १७ सदस्यांच्या संचालक मंडळात ९ महिला आहेत. तेथे वेगवेगळ्या विभागांत मिळून एकूण १३१ महिला कर्मचारी आहेत. (महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली : २००१).

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राची काही खास वैशिष्ट्ये आहेत. ही सहकाराची विचारप्रणाली खूप वेगवेगळ्या वर्तुळांद्वारे राज्याच्या सामाजिक व आर्थिक जीवनात झिरपलेली आहे. महाराष्ट्रात भांड्यांचे १४७ सहकारी संस्था, ८२ चामडे कमावणाऱ्या सहकारी संस्था, १६ सहकारी इस्पितळे आणि मोठ्या संख्येने धुलाई कामगार व ऑटो रिक्षा ड्रायव्हर्स यांच्या सहकारी संघटना, सहकारी विद्यार्थी वसतिगृहे व शैक्षणिक संस्था आहेत. इतकी विविधता व विपुलता असलेले सहकार उद्योग इतर राज्यांत आढळत नाहीत. (सहकारी महाराष्ट्र : २०००) आजही, कोपरगाव, प्रवरानगर, वारणानगर, कराड, सांगली, बारामती, अकलूज या महाराष्ट्रातील ग्रामीण भागांत सहकाराचे जाळे घट्ट विणलेले दिसते.

### निष्कर्ष

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचे वारे जगभर वाहत आहेत. ते आता थोपवता येणार नाहीत, पण म्हणून 'सहकाराचे युग आता संपले आहे' असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. उलट आजच्या बदलत्या परिस्थितीत सहकाराची गरज पूर्वीपेक्षा जास्त आहे; कारण उद्योग आणि व्यापार यांत गळेकापू स्पर्धा चालू आहे आणि ती दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. छोटे शेतकरी, शेतमजूर, छोटे कारागीर व उत्पादक यांनी एकत्र येऊन सहकाराच्या मार्गाने वाटचाल केली तरच ते टिकून राहू शकतील, प्रगती करू शकतील.

खऱ्या अर्थाने उभारलेल्या सहकार चळवळीचा फायदा छोट्या उत्पादकांना झाला पाहिजे, त्यांना तिने भक्कम केले पाहिजे. तिच्याद्वारे गरिबी व विषमता कमी व्हायला हवी. सहकाराच्या यशाची किंवा अपयशाची तीच खरी कसोटी असली पाहिजे. राज्यालाही सहकाराच्या बाबतीत आपली भूमिका पुन्हा एकदा निश्चित करावी लागेल. राज्य सरकारने सहकारी संस्थांचे नियंत्रक व व्यवस्थापक या भूमिकेपेक्षा सुविधा पुरवण्याचे काम केले पाहिजे. त्यासाठी सहकार कायद्यात योग्य दुरुस्त्या करून सहकारक्षेत्र स्वतंत्र, स्वायत्त आणि स्वावलंबी केले पाहिजे. नोकरशाहीच्या बेड्यातून आणि स्वार्थी राजकारण्यांच्या तावडीतून सहकाराला सोडवण्यासाठी हे फार आवश्यक आहे. शिवाय राजकीय दबावाला बळी पडून सहकारी साखर कारखान्यांचे पेव फुटणार नाही याचीही काळजी राज्य सरकारने घेतली पाहिजे. सिंचनाच्या सोयी आणि उसाची उपलब्धता लक्षात न घेता उभारलेल्या साखर कारखान्यांमुळे, त्या कारखान्यांचे व शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले आहे.

प्रामाणिक व समर्पण वृत्तीने काम करणारे नेते व कार्यकर्ते यांचा सहभाग हाच सहकाराच्या पुनरुत्थानाची व यशाची गुरुकिल्ली आहे. हा टप्पा गाठण्यासाठी आंध्र प्रदेशातील 'को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट फाऊंडेशन' (सी.डी.एफ.)सारख्या सहकार क्षेत्रातच कार्य करणाऱ्या गुणवत्तापूर्ण व कार्यक्षम स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली पाहिजे. सी.डी.एफ.सारख्या काही स्वयंसेवी संस्था या क्षेत्रात उतरल्या तर सहकाराचे युग पुन्हा अवतरेल आणि नवनिर्माण करू शकेल.

(अनुवाद : **विनोद शिरसाठ**)

लेखक : **बी.एस.बावीसकर**

E-mail :bs_baviskar@yahoo.co.in

पृष्ठ २ वरून)

प्रबंध लिहिला तो संशोधनाची चौकट पूर्णपणे पाळूनच. य.दि.फडकेंसारखा ऐतिहासिक पुराव्याचा व तपशीलाचा आग्रह ते धरीत नाहीत, पण त्यांचे लेखन सहजासहजी खोडून काढता येण्यासारखे नसते. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, यशवंतराव चव्हाण व गोपाळ गणेश आगरकर या विचारवंतांवरील भोळेंचे लेखन चरित्रलेखनासारखे नाही. चरित्रलेखनात त्यांना तसा रस नाही. त्यांना प्रिय आहे या विचारवंतांच्या विचारांचा अभ्यास; त्यांच्या वारसदारांच्या कामगिरीची समीक्षा; फुले-आंबेडकरी चळवळीच्या आजच्या अधोगतीची कारणमीमांसा. भोळे यांच्या टीकेचे एक लक्ष्य आहे, प्रतिगामी व हिंदुत्ववादी गट व दुसरे लक्ष्य आहे चळवळीतील नेते व कार्यकर्ते, जे त्यांचे मित्र आहेत, ज्यांच्याबद्दल त्यांना आस्था आहे. परिवर्तनवादी चळवळींना चुचकारून चळवळीचेच नुकसान होत असते, असे भोळे मानतात म्हणून ते चळवळीवर निर्भीडपणे टीका करतात. या भूमिकेवर खंबीर राहिल्याने चळवळीतील काही मंडळी त्यांच्यावर नाराज होण्याचा धोका पत्करायला भोळे तयार असतात. जेव्हा दलित चळवळीतील काहीजण हिंदुत्ववाद्यांशी जवळीक करू लागले, तेव्हा त्यांच्यावर कठोरपणे टीका करण्यात व त्यांची हेटाळणी करण्यात भोळे सर्वांत पुढे होते. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानापासून आजची चळवळ कशी दूर चालली आहे हे सांगताना भोळे म्हणतात, की दलित चळवळीतील विविध प्रवाहात इतर बाबतीत विस्तव जात नसला तरी आंबेडकरी विचार गाडून टाकण्याबाबत सर्वांचे संगनमत झालेले आहे. दलित चळवळीला विभूतीपूजा व पांढरपेशीय मानसिकतेने ग्रासलेले आहे. दलितांचे राजकारण विचारकेंद्री होण्याऐवजी व्यक्तिकेंद्री झाल्यामुळे त्यास गटबाजीची लागण झाली आहे. अशी मते स्पष्टपणे मांडणारे भोळेंसारखे विचारवंत आज महाराष्ट्रात हाताच्या बोटावर मोजण्याएवढेही नाहीत.

भोळेंनी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त जे लेखन केले आहे, त्यात जवळजवळ सहा पुस्तके राजकीय घडामोडींवरील आहेत व नऊ पुस्तके व पुस्तिका फुले-आंबेडकर-शिंदे-आगरकर यांचे कार्य व तत्त्वज्ञान व त्यांचा वारसा यांविषयी आहेत. साहित्यसमीक्षा हा भोळे यांचा विशेष आवडीचा प्रांत. त्यात त्यांचे एकच पुस्तक आहे पण ते महत्त्वाचे आहे. 'साहित्यप्रत्यय' या शीर्षकाच्या या पुस्तकात भोळेंच्या तेरा सैद्धांतिक लेखांचा व अकरा पुस्तक परीक्षणांचा समावेश केलेला आहे. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांना अधिक अर्थपूर्ण दृष्टीने साहित्याकडे पाहणे शक्य होते असे भोळे यांचे मत आहे व त्यांचे वरील पुस्तक वाचताना त्याचा प्रत्यय येतो. फुले-शिंदे-राजवाडे-शेजवलकर-केतकर यांच्या साहित्यविषयक भूमिकेकडून प्रेरणा घेऊन भोळे यांनी साहित्य व समाजजीवन यांमधील आंतरसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. निशिकांत ठकार यांनी भोळेंच्या 'साहित्यप्रत्यय'चे परीक्षण करताना म्हटले आहे, की साहित्याच्या सामाजिक आशयाला महत्त्व देताना भोळे आंधळी समाजवादी भूमिका घेत नाहीत व वाङ्मयीन निकषाचे महत्त्व अधोरेखित करतात; पण साहित्यकृती एकदा सामाजिक जीवनाचा भाग बनली की तिची सामाजिक व राजकीय समीक्षा झाली पाहिजे, असा आग्रह धरतात. मराठी साहित्य मुख्यत: मध्यमवर्गीय जाणीवा जोपासणारे व प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थन करणारे आहे. तसेच विद्रोही वाङ्मयाची व्यासपीठे क्रांतिकारी जाणीवांचे वाहन होण्याच्या दृष्टीने थिटी पडली आहेत, असे भोळे स्पष्टपणे बजावतात. लोकप्रिय मराठी साहित्यास भोळे बेगडी, ठोकळेबाज, निर्जीव व स्थितीवादी म्हणतात तर दलित साहित्याचे वर्णन साचेबंद, शब्दबंबाळ व पोकळ या शब्दांत करतात. 'साहित्यप्रत्यय' या पुस्तकास २००३चा महाराष्ट्र फाऊंडेशनचा साहित्यपुरस्कार मिळाला होता तो किती योग्य होता, याचा प्रत्यय हे पुस्तक वाचल्यावर येतो.

साहित्यक्षेत्रातील भोळे यांचे दुसरे योगदान आहे अनुवाद करण्याबद्दलचे. चार भाषांतरित पुस्तके भोळे यांच्या खात्यावर आहेत व त्यांच्या 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर : अनुभव आणि आठवणी' या पुस्तकास साहित्य अकादमीचा अनुवाद पुरस्कार (२००२) मिळालेला आहे. अलीकडेच त्यांनी पाकिस्तानी लेखक इंतजार हुसैन यांच्या एकवीस कथांचे भाषांतर साहित्य अकादमीसाठी केले आहे. महेश एलकुंचवार यांच्या मते हा अनुवाद इतका सरस आहे की तो अनुवाद वाटतच नाही. हुसैन यांनी मराठीतच कथा लिहिल्यात असे वाटते. भाषेवरील प्रभुत्व व समाजजीवनाची सखोल जाण असल्याशिवाय इतका चांगला अनुवाद होणे शक्य नसते. परंतु समाजजीवनाची नुसती जाण अपुरी पडते. विचारवंतांची वैचारिक बैठक पक्की असावी लागते. भोळे यांचा वैचारिक प्रवास विचाराच्या क्षेत्रातील दिग्गजांच्या सोबतीने झाला. केवळ तत्त्ववैचारिक, अमूर्त व स्थलकालनिरपेक्ष विचार न करता तो अभावग्रस्ततेचे जीवन जगणाऱ्या माणसांच्या अनुषंगानेच करावा लागतो, याचे भान त्यांना फुले-शिंदे-आंबेडकरांच्या वाचनाने आले. लोकशाही, स्वातंत्र्य अशा पुस्तकी परिभाषेत विचार करण्याच्या पद्धतीला त्यांनी छेद दिला. मार्क्स-लेनिन वाचल्यावर वर्गाधारित समाजात समता-स्वातंत्र्य या मूल्यांचे अर्थ वर्गनिहाय बदलतात, हेही ध्यानात आले. गांधीजींच्या वाचनाने भोळे यांच्या विचाराला एतद्देशीय संदर्भ प्राप्त झाला. फुले-शिंदे-आंबेडकरांच्या विचारांचा सखोल परिणाम भोळे यांच्या लेखनावर पडला व बहुजनवादी व वास्तववादी परिमाण त्यांच्या विश्लेषणाला मिळाले, असे म्हणता येईल. पाठ्यपुस्तकापासून ते स्तंभलेखनापर्यंत आणि साहित्य समीक्षेपासून ते अनुवादित पुस्तकांपर्यंत भोळे यांच्यावरील बहुजनवादी विचाराचा प्रभाव स्पष्टपणे नजरेत भरतो. त्यांना फुले-आंबेडकरी विचाराची समकालीन संदर्भात फेरमांडणी करायची आहे. हे कार्य त्यांच्या हातून होईलच, यात शंका नाही.

**राजेंद्र व्होरा**

*(सौजन्य : 'संवादिनी २००७')*

दिल्ली दरवाजातून...

# भारतरत्न, मतदार संघ फेररचना, लहान राज्ये... वादच वाद!

निरीक्षक

राजधानीत सध्या वेगवेगळे वाद सुरू आहेत. मतदारसंघांची फेररचना किंवा 'डिलिमिटेशन' असो. लहान राज्यांची निर्मिती किंवा अगदी नवा वाद म्हणजे भारतरत्न पुरस्काराबद्दलचा असो, प्रत्येक गोष्टीत राजकीय चढाओढ, स्पर्धा आढळून येत आहे. यात कोणीही मागे नाही. भारतरत्न पुरस्कारावरून सुरू झालेली चढाओढ केवळ लाजिरवाणी आहे. सुरुवात केली भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार लालकृष्ण अडवानी यांनी. अडवानी यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना एक पत्र लिहून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा अशी मागणी केली. मनमोहन सिंग सरकारला एकप्रकारे पेचात पकडून गंमत बघणे हाच यामागील वरवरचा हेतू होता. पण त्याचबरोबर वाजपेयींची या सर्वोच्च नागरी पुरस्कारासाठी शिफारस करून वाजपेयी यांच्या राजकीय निवृत्तीवर शिक्कामोर्तब करण्याचा हेतुही अडवानींच्या मागणीमध्ये होता. आपल्या पंतप्रधानपदाच्या मार्गात कोणताही अडथळा नको हीच प्रबळ भावना यामागे होती. पंतप्रधानपदाच्या खुर्चीत बसण्यासाठी उतावीळ अडवानींनी ही खेळी मुद्दाम खेळली खरी; परंतु ती आता त्यांच्या अंगाशी येताना दिसू लागली आहे. एकीकडे हेच अडवानी आता देशातील राजकीय वारे बदलू लागले असून केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार पुन्हा सत्तारूढ होणार असे उच्चरवाने सांगत आहेत. मग त्यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या त्या भावी सरकारने वाजपेयींना भारतरत्न पुरस्कार देऊन त्याचे श्रेय घेणे योग्य की मनमोहन सिंग सरकारकडे त्याबद्दल याचना करणे योग्य? परंतु पंतप्रधानपदाचे बाशिंग बांधलेल्यांना आणि प्रतिस्पर्धी पक्षाला केवळ सतत अडचणीत आणण्याच्या पछाडलेल्यांना त्या भावनेच्या भरात आपण काय करीत आहोत याचेही भान उरले नाही. आता पक्षातले वाजपेयी समर्थक अडवानी यांच्या विरोधात कुजबुज करू लागले आहेत आणि त्यांच्या या उतावळेपणाबद्दल नाराजीही व्यक्त केली जाऊ लागली आहे. वाजपेयींसाठी भारतरत्नची मागणी करणाऱ्या अडवानी यांना कदाचित विसर पडला असेल, परंतु भारतरत्नच्या खालोखाल मानला जाणारा 'पद्मविभूषण' पुरस्कार वाजपेयींना १९९२ मध्ये (याच वर्षी ६ डिसेंबरला बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली) देणारे सरकारही काँग्रेसचेच होते. त्यामुळे आपण सरकारला पेचात आणू ही अडवानी यांची भावनाच खोटी असून सरकारपेक्षा वाजपेयींचा काटा आपल्या मार्गातून कसा दूर होईल याचाच हा दुष्ट कट मानावा लागेल. अडवानी यांचे हे खलनायकी रूप लालूप्रसाद यांनी बरोबर उघडे पाडले. 'वाजपेयींना निवृत्त करण्याच्या या कारस्थानात केंद्र सरकार सहभागी होणार नाही' अशी मासलेवाईक प्रतिक्रिया देऊन लालूंनी अडवानींचाच बुरखा फाडला.

अडवानींचे हे ढोंग उघड करण्याऐवजी काँग्रेसने आपल्या राजकीय शामळूपणाचे दर्शन घडवले. भारतरत्न पुरस्काराचा निर्णय करण्यासाठी एक समिती असते आणि ते निर्णय करतील. सरकारचा व काँग्रेसचा त्याच्याशी काही संबंध नाही असा गुळमुळीत, मिळमिळीत पवित्रा काँग्रेसने घेतला. काँग्रेसचे नेत वीरप्पा मोईली यांनी ज्येष्ठ मार्क्सवादी नेते व पश्चिम बंगालचे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिलेल्या ज्योती बसू यांचे नाव वाजपेयींच्या बरोबरीने पुढे करण्याचा प्रयत्न केला. कोणी गाय मारली म्हणून लगेच वासरू मारून त्याची बरोबरी करता येत नाही. पण प्रसंगावधान व तेही राजकीय पातळीवर दाखवणे काँग्रेसला जमत नाही. त्यामुळे विनाकारण बसू यांना या वादात ओढून आणि त्यांच्या पक्षाने तो प्रस्ताव नाकारून काँग्रेसच्या फाजील उत्साही मंडळींनी आपले दात पाडून घेतले. ज्योती बसू यांचे नाव पुढे आल्यानंतर काहीकाळ मार्क्सवादीही बावचळून गेले. पश्चिम बंगालच्या डाव्या आघाडीचे अध्यक्ष बिमान बसू यांनी आपल्या प्राथमिक प्रतिक्रियेत ज्योती बसू हे भारतरत्न पुरस्काराचे मापदंड पूर्ण करीत असतील तर त्यांना भारतरत्न मिळण्यात अडचण असू नये असे म्हटले. म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांनी ज्योती बसू यांना भारतरत्न पुरस्काराचे मापदंड पूर्ण करीत असतील तर त्यांना भारतरत्न मिळण्यात अडचण असू नये असे म्हटले. म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांनी ज्योती बसू यांना भारतरत्न मिळण्याच्या गोष्टीचे समर्थनच केले; पण दुसऱ्याच दिवशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे जाहीर खुलासा करण्यात आला आणि कोणताही नागरी पुरस्कार स्वीकारण्यास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अनुकूल नाही असे जाहीर करून बसू यांच्या भारतरत्नच्या चर्चेस पूर्णविराम देण्यात आला. मार्क्सवाद्यांचा खुलासा येतो न येतो तोपर्यंत बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी त्यांच्या पक्षाचे संस्थापक कांशीराम यांना भारतरत्न मिळाले पाहिजे, अशी डरकाळी फोडून टाकली. त्यामुळे आता २६ जानेवारीपर्यंत भारतरत्न इच्छुकांच्या यादीत आणखी किती

नावे समाविष्ट होतील ते पहावे लागेल. परंतु या निरर्थक वादामुळे त्या पुरस्काराचे अवमूल्यन तर झाले आहेच परंतु त्या निमित्ताने मोठे नेते देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराच्या माध्यमातूनही आपले राजकारण कसे खेळू पहात असतात ही खेदजनक बाबही स्पष्ट झाली. अडवानी यांना खरोखरच वाजपेयी यांच्याबद्दल आदर असेल तर त्यांनी सरकारला वाजपेयी यांना भारतरत्न देण्याबद्दलचे पत्र लिहिणेही गैर नाही; पण त्याचा जाहीर उच्चार करणे व पत्रकारांना ते प्रसिद्धीसाठी देणे हे कितपत उचित मानता येईल? यावरूनच त्यांच्या हेतूबद्दल शंका येते. त्याचबरोबर भारतरत्न हा पुरस्कार खिरापतीसारखा वाटण्याची गोष्ट नाही, त्याचा योग्य तो आदर व महत्त्व हे राखलेच पाहिजे. परंतु मोठ्यामोठ्या नेत्यांनाही त्याचे भान रहात नाही, हे दुर्दैव!

एकीकडे भारतरत्नवरून चढाओढ तर आता दुसरीकडे लहान राज्यांच्या निर्मितीवरून पुन्हा वातावरण तापविले जाऊ लागले आहे. याची सुरुवात काँग्रेसमधीलच मंडळींनी केली आहे. उत्तर प्रदेशातील एक मागासलेला व सततचा दुष्काळी असलेला प्रदेश म्हणून बुंदेलखंड ओळखला जातो. झांशी आणि त्यास लागून असलेले चार-पाच जिल्हे यांचा यात समावेश होतो. काँगेसने बुंदेलखंडाचे स्वतंत्र राज्य करण्याची मागणी थेट पंतप्रधानांकडे केली, तर आंध्र प्रदेशचा कारभार पाहणारे काँग्रेसचे सरचिटणीस वीरप्पा मोईली यांनी स्वतंत्र तेलंगणाची निर्मिती करण्यासाठी दुसऱ्या राज्य पुनर्रचना आयोगाच्या स्थापनेचा निर्णय लवकरच केला जाईल असे जाहीरपणे सांगितले. सरकारी पातळीवरून अद्याप या माहितीस दुजोरा मिळत नाही. परंतु या वर्षाच्या अखेरीपर्यंत याबाबत काहीतरी हालचाल होणे अपेक्षित मानले जात आहे. म्हणजेच आपल्या सरकारच्या अखेरच्या टप्प्यात दुसऱ्या राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना करून ते घोंगडे २००९ मध्ये निवडणुकीनंतर सत्तेत येणाऱ्या नव्या सरकारच्या गळ्यात पडेल अशी ही योजना आहे. म्हणजे तेलंगणाच्या लोकांना दिलेल्या आश्वासनाचीही पूर्तता आणि त्यातून काही पेच निर्माण झाल्यास स्वत:ला त्यापासून अलिप्तही राखणे असा हा प्रकार आहे. काँग्रेसने खेळलेला हा डाव आहे.

आणखी एक मुद्दा असाच रंगतदार ठरणार आहे. मतदारसंघांची फेररचना पंचवीस राज्यांत लागू करण्याचा निर्णय झाला आहे. फेररचना आयोगाने पंचवीस राज्यांची फेररचना पूर्ण केली आहे. परंतु झारखंड, आसाम, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या पाच राज्यांमधील फेररचना पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे तूर्तास त्या राज्यांना वगळून जेथे पूर्ण झाली आहे तेथे फेररचना लागू करण्याचे सरकारने ठरविले आहे व हा निर्णय शहाणपणाचा मानावा लागेल. अन्यथा फेररचनेचा फायदा होत नाही म्हणून करा त्याला उशीर असे सरकारने केले असते, तर सरकारच गोत्यात आले असते. न्यायालयानेही याबाबत फेररचना लागू करण्याबाबत काहीशी निर्णायक भूमिका घेतल्यानेही सरकारचा नाइलाज झाला. परंतु या फेररचनेबद्दल पक्षांमध्ये व विशेषत: विद्यमान खासदारांमध्ये नाराजीही आहे. फेररचनेची तत्त्वे ठरविताना अनुसूचित जातींचे तसेच आदिवासींचे राखीव मतदारसंघ सध्या आहेत त्यापेक्षा कमी होणार नाहीत, यावर कटाक्षाने भर देण्यास सांगण्यात आले. या राखीव मतदारसंघांची संख्या एकवेळ वाढली नाही तरी चालेल परंतु ती कमी होता कामा नये ही खबरदारी घेण्यास फेररचना आयोगास सांगण्यात आले होते. परंतु झारखंडमध्ये हे तत्त्व पाळले गेले नाही परिणामी तेथे आदिवासी मतदारसंघांची संख्या कमी करण्यात आली व त्यातून निर्माण झालेल्या वादामुळे तेथील फेररचना स्थगित करावी लागली. मतदारसंघांची फेररचना करण्याची आवश्यकता भासण्याचे कारण एवढेच होते, की मतदारसंघ दिवसेंदिवस असमतोल होत चालले होते. एक मतदारसंघ पाच-सहा लाखांचा तर दुसरा अठरा लाख, तेवीस लाखांचा. १९७१ नंतर प्रथमच ही फेररचना झाली आहे. छत्तीस वर्षांत लोकसंख्येने शंभर कोटींचा आकडा पार केला, परंतु लोकसभा मतदारसंघांची संख्या बदलली नाही. ती वाढली तर सध्याच्या लोकसभेत बसायला जागा नाही अशी स्थिती आहे. मग उपाय एवढाच की मतदारसंघांची संख्या कायम ठेवून मतदारांची संख्या समप्रमाणात विभागून नवे मतदार तयार करणे म्हणजेच साधारणपणे मतदारांची संख्या समप्रमाणात राखून मतदारसंघांची फेररचना करण्यात आली. २०२६ या वर्षापर्यंत मतदारसंघांची संख्या न वाढविण्याचा कायदा करण्यात आला आहे. त्यामुळे तोपर्यंत अशाच पद्धतीने फेररचना करावी लागणार आहे. आता ज्यांचे मतदारसंघ खूप अवाढव्य होते त्यांचे काहीसे कमी झाल्याने ते लोकप्रतिनिधी खूष होणे स्वाभाविक आहे. परंतु ज्यांचे लहान मतदारसंघ होते व आता त्यात भर पडली असल्याने काही लोकप्रतिनिधी नाखूष होणेही स्वाभाविक आहे. परंतु कधीतरी हे होणारच असल्याने आता सर्वांनाच त्याचा स्वीकार करावा लागणार आहे. त्याचबरोबर आता निवडणुकीला एक वर्षाचा अवधी असल्याने संभाव्य खासदारांना त्यांच्या-त्यांच्या नव्या मतदारसंघांची ओळख करून घेण्यासही पुरेसा अवधी मिळणार आहे. आता आगामी निवडणुका या फेररचनेनुसार होणार हे निश्चित झाले आहे. लोकप्रतिनिधींनीही नाराजीत वेळ घालविण्यापेक्षा फेररचनेशी जुळवून घेऊन कामाला लागणे अधिक श्रेयस्कर. अन्यथा तेच अडचणीत येतील. ही फेररचना आता कोणीही अडवू शकणार नाही, हेही त्यांनी ध्यानात घेतले पाहिजे.

**– निरीक्षक**

परामर्श

# लोकशाही समाजवादाची वाटचाल

**गोविंद तळवलकर**

**प्रा. डोनाल्ड ससून यांच्या 'वन हन्ड्रेड इयर्स ऑफ सोशलिझम' हा ग्रंथ लिहिला आहे, त्या अनुषंगाने लिहिलेल्या लेखांतील हा दुसरा लेख...**

दुसरे महायुद्ध संपताना इंग्लंडमध्ये झालेल्या निवडणुकीत मजूर पक्ष बरेच मोठे बहुमत मिळवून निवडून आला. तथापि निवडून येण्यापूर्वी व आल्यानंतर या पक्षाने आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय धोरणाचा पुरेसा विचार केला नव्हता. लीग ऑफ नेशन्सची जी तत्त्वे होती ती त्यास परराष्ट्र संबंधांबाबत मान्य होती; पण योजनाबद्ध आर्थिक व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत स्वातंत्र्य यांची सांगड कशी घालायची, याचा निर्णय मजूर पक्षाने केला नव्हता.

हा पक्ष विरोधात होता तेव्हा उमराव सभा रद्द करण्याचे कलम त्याच्या कार्यक्रमात होते. संसद सार्वभौम असल्यामुळे कोणतेही धोरण अंमलात आणणे शक्य असल्याची या पक्षाची धारणा होती. पण सत्तेवर येताच यास काही मर्यादा आहेत हे समजून आले. त्यामुळे मजूर पक्षाने त्याच्या कार्यक्रमास मुरड घातली. भांडवलशाही नष्ट होणार हे गृहीतकृत्य त्याने प्रमाण मानले होते. सत्ताधारी झाल्यावर या पक्षाला प्रस्थापित भांडवलशाही व्यवस्थेतील मर्यादा स्पष्ट झाल्या आणि विशेष काही साध्य करता येणार नाही असा निष्कर्ष काढला गेला. समाजवाद आणणेही शक्य नसल्याचे दिसून आले. यामुळे मजूर पक्षाची स्थिती गोंधळाची होती. तेव्हा प्रस्थापित व्यवस्था वा यंत्रणाच कशी सुधारायची या विचारास प्राधान्य प्राप्त झाले. विरोधी पक्ष म्हणून वावरताना मजूर पक्षाने सार्वजनिक बांधकामे सरकारी क्षेत्रात ठेवण्यास महत्त्व दिले होते. वास्तविक लिबरल पक्षाने याचा पुरस्कार अगोदर केला होता. केन्स या अर्थशास्त्रज्ञाच्या प्रभावाखाली लिबरल पक्षाने या धोरणाचा स्वीकार केला होता.

ब्रिटिश मजूर पक्ष हा फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क इत्यादी देशांतील समाजवादी पक्षांपेक्षा युद्धकाळात वेगळ्या अवस्थेतून गेला होता. या देशातील समाजवादी पक्ष दुबळे होते, त्यांनी नाझी वा त्यांचे हस्तक यांच्याशी हातमिळवणी केली होती. इंग्लंडमध्ये नाझींशी लढणाऱ्या हुजूर पक्षाच्या बरोबरीने मजूर पक्ष उभा होता. फ्रान्समध्ये समाजवादी पक्षाने पेताँ याच्या पक्षाशी हातमिळवणी केली आणि पेताँ हा नाझींपुढे शरणागती स्वीकारणार होता. त्या काळात फ्रेंच कम्युनिस्टांनी जनरल द गॉल याच्याशी सहकार्य करण्याचा पवित्रा घेतला व नाझींना प्रतिकार केला. यामुळे युद्धोत्तर काळात फ्रेंच समाजवादी मागे पडून कम्युनिस्ट पक्ष प्रबळ झाला. इंग्लंडमध्ये मजूर पक्षाची फ्रेंच समाजवादी पक्षासारखी गत झाली नाही.

युद्धोत्तर काळात बहुतेक सर्व पश्चिम युरोपीय देशांत समाजवादी पक्ष संसदीय निवडणुकीत बऱ्यापैकी मते मिळवून निवडून आले होते. पण इंग्लंड, स्वीडन व नॉर्वे या देशांतच हे पक्ष सत्तेवर आले. फ्रान्स व इटली या देशांत कम्युनिस्ट व ख्रिश्चन लोकशाही पक्ष यांच्या कात्रीत समाजवादी पक्ष सापडले होते. बेल्जियममध्ये समाजवादी पक्ष सत्ताधारी झाला तरी तो अस्थिर पायावर उभा होता. यामुळे १९४५ ते ४९ या काळात बेल्जियममध्ये सात संयुक्त मंत्रिमंडळे आली. ती सर्व समाजवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली होती; पण राजकीय अस्थिरता वारंवार होणाऱ्या बदलांमुळे स्पष्ट झाली.

पश्चिम जर्मनीत समाजवादी पक्ष युद्धोत्तर काळात पुढे आला; पण त्याला बराच काळ इतर पक्षांबरोबर सहकार्य करूनच सत्तेत भागीदारी मिळवणे भाग झाले होते. रशियाच्या अंकित असलेल्या पूर्व जर्मनीत समाजवादी पक्षाने कम्युनिस्ट पक्षाशी जुळवून घेतले आणि थोड्याच दिवसांत समाजवादी पक्ष निष्प्रभ बनला व कम्युनिस्ट पक्ष सत्ताधारी बनला. शिवाय रशियाने पूर्व जर्मनी व इतर पूर्व युरोपीय देश यांत लष्करी बळाच्या जोरावर तिथल्या कम्युनिस्ट पक्षास राज्यावर बसवण्याचे धोरण अंमलात आणल्यामुळे पश्चिम जर्मनीतील समाजवादी पक्षास ख्रिश्चन लोकशाहीवादी इत्यादी पक्षांच्याबरोबर जाण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही.

ब्रिटनमध्ये मजूर पक्ष अधिकारावर आला तेव्हा त्या देशाची आर्थिक दुरवस्था झाली होती. युद्धामुळे सार्वजनिक कर्जाचा मोठा बोजा पडला होता. सैनिक परत आल्यावर त्यांचे पुनर्वसन करायचे होते. अमेरिकेने 'लीज अॅन्ड लेन्ड' या कायद्याखाली जी मदत दिली होती ती युद्ध संपताच थांबवली. इंग्लंडच्या साम्राज्याचा खर्च भागवण्यासाठी व मजूर पक्षाच्या समाजवादी कार्यक्रमासाठी आपण मदत देता कामा नये अशी अमेरिकन सत्ताधारी व लोकप्रतिनिधी यांची धारणा होती. डेमॉक्रॅटिक व रिपब्लिकन या दोन्ही पक्षांचे याबाबत एकमत होते. यामुळे ब्रिटिश मजूर पक्षापुढे फार मोठी आर्थिक समस्या उभी राहिली. या दडपणामुळे पंतप्रधान अॅटली व त्यांचे काही प्रमुख सहकारी यांनी वसाहतींचा बोजा उतरवल्याशिवाय गत्यंतर नाही, असा निर्णय घेतला. मग भारतात सत्तांतर घडवून अणण्यास प्राधान्य देण्यात आले. नंतर मलेशिया इत्यादी देशात हेच पाऊल टाकण्यात आले. इतकेच नव्हे तर मजूर

पक्ष पराभूत होऊन हुजूर पक्ष गादीवर आला तेव्हा याच धोरणाचा अवलंब केला गेला. विशेषत: हेरॉल्ड मॅक्‌मिलन पंतप्रधान झाल्यावर त्यांनी बदलत्या वाऱ्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास अग्रक्रम दिला.

ॲटली व त्यांचे परराष्ट्रमंत्री बेव्हिन यांनी आणखी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले, ते मंत्रिमंडळाने मान्य केले. एक म्हणजे रशियाचा वाढता प्रभाव आणि त्यातही पूर्व युरोपात त्याने स्वत:च्या नियंत्रणाखालील मंत्रिमंडळे स्थापन केल्यामुळे अमेरिकेचे नेतृत्व मान्य करणे. ॲटली मंत्रिमंडळाची अशी समजूत होती की, अमेरिकेशी जवळचे संबंध ठेवून आपण तिच्या परराष्ट्र धोरणावर काही प्रमाणात तरी नियंत्रण ठेवू शकू. आणि शक्य होईल तेव्हा रशिया व अमेरिका यांच्यात मध्यस्थाची भूमिकाही बजावणे आपल्याला शक्य होईल. ही भूमिका फारच थोड्या वेळा ब्रिटनला बजावता आली.

स्टालिनने बर्लिनची कोंडी केली तेव्हा अमेरिका व ब्रिटन यांनी विमानांनी पुरवठा चालू ठेवून कोंडी अयशस्वी केली. तेव्हा ॲटली यांचेच सरकार होते. रशियाविरुद्ध उत्तर अटलांटिक हा लष्करी करार करण्यास मजूर पक्षाने पाठिंबाच दिला. द गॉल यांना अमेरिकेचे वर्चस्व सहन होत नव्हते. तेव्हा त्यांनी युरोपीय युनियन ही आर्थिक बाजारपेठ तयार करण्याच्या योजनेला पाठिंबा दिला आणि अमेरिका व रशिया यांना तुल्यबळ युरोपीय सत्ता होईल असे स्वप्न त्यांनी पाहिले. पण ते स्वप्नच होते. ब्रिटिश मजूर पक्ष या प्रकारचे स्वप्न पाहत नव्हता. चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर नव्या सरकारला ॲटली यांच्या सरकारने पाठिंबा दिला हे अमेरिकेला मानवले नाही, पण या प्रश्नाबाबत ॲटली यांनी मोहीम उघडली नाही. त्याचबरोबर कोरियन युद्धात ते अमेरिकेच्या बरोबर सामील झाले.

**अर्थकारणात सामाजिक मालकी हा एक महत्त्वाचा घटक समाजवादी मनात आले होते. ब्रिटिश मजूर पक्षाच्या घटनेतील चौथे कलम हे राष्ट्रीयीकरणासंबंधी होते. मजूर पक्षात नंतरच्या काळात यावरून बरेच मतभेद झाले. तथापि या पक्षाचे सरकार युद्धोत्तर काळात आले तेव्हा अनेक कारखाने व उद्योग सार्वजनिक मालकीचे करण्यात आले. यात कोळशाच्या खाणी, रेल्वे इत्यादींचा समावेश होतो. तथापि फ्रान्स व ऑस्ट्रिया यांनी राष्ट्रीयीकरणावर जितका भर दिला तितका ॲटली सरकारने १९४५ ते ५० या काळात दिला नव्हता.**

ॲटली सरकारचा दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे अणुबाँब तयार करण्याचा. युद्ध काळात अणुसंशोधनाच्या कार्यात इंग्लंडचा काही सहभाग होता आणि या संशोधनाच्या रहस्याची त्यास अमेरिकने कल्पना दिली होती. अण्वस्त्रांमुळे ब्रिटन जागतिक राजकारणात काही महत्त्वाची भूमिका खेळू शकेल असे मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळास वाटत होते. तथापि ब्रिटनची आर्थिक परिस्थिती खालावत होती. यामुळे अमेरिकेने 'मार्शल मदत योजना' युरोपच्या पुनरुज्जीवनासाठी जाहीर केली, तेव्हा तिचे सर्वात प्रथम स्वागत करण्यात ॲटलींचे सरकार पुढे होते.

समाजवादाचा स्वीकार केलेल्या मजूर पक्षाने प्रस्थापित भांडवलदारी व्यवस्था व राज्ययंत्रणा पूर्णत: नष्ट करण्याचे लेनिनचे धोरण स्वीकारलेले नव्हते. यामुळे मजूर पक्षाच्या कारकिर्दीत इंग्लंडमध्ये मूलभूत संस्थात्मक बदल झाले नाहीत. उमराव सभेच्या अधिकारांवर मर्यादा आली; पण उमराव सभा नष्ट झाली नाही. चर्च व राज्ययंत्रणा यांची फारकत युरोपात झाली होती; पण इंग्लंडने तसे काही केले नाही. यामुळे चर्च ऑफ इंग्लंडचा प्रतिनिधी उमराव सभेत बसण्याचे बंद झाले नाही. अर्थात या प्रतिनिधीस वा चर्चला राजकीय व सामाजिक जीवनात राजकीय आश्रय देण्यात आला नाही. राजेशाही अबाधित राहिली. तिला घटनात्मक प्रमुख इतकेच स्थान होते व आहे.

मजूर पक्षाने क्रांतिकारक बदल करण्याचा मार्ग न अवलंबिता सुधारणेचा मार्ग स्वीकारला. यामुळे हुजूर पक्षाच्या काळातील शिक्षणविषयक कायदा बदलला नाही. तांत्रिक शिक्षणाची सुधारणाही प्रगती करू शकली नाही. या बाबतीत हुजूर पक्ष आघाडीवर होता, हे विशेष. संस्थात्मक आमूलाग्र सुधारणा करण्याबाबत मजूर पक्षच मागे होता असे नाही. फ्रान्स, बेल्जियम इत्यादी देशातील समाजवाद्यांचे हेच धोरण राहिले. इटलीत नवी घटना बनवण्यात तिथल्या समाजवादी पक्षाचा महत्त्वाचा सहभाग नव्हता; तर ख्रिश्चन लोकशाही पक्ष हा परंपरावादी पक्ष व कम्युनिस्ट यांनी सहकार्य करून घटना तयार केली. फ्रेंच समाजवादी पक्षाने कम्युनिस्ट पक्षाच्या वाढत्या प्रभावास पायबंद घालण्यास प्राधान्य दिले होते. रशियाचा चढाईचा पवित्रा त्यास धोकादायक वाटत होता.

इंग्लंडमध्ये समाजवादाचा स्वीकार केलेला मजूर पक्षही कम्युनिस्ट पक्षाच्या विरोधी होता. शिवाय मार्क्सवादही त्याने पूर्णपणे स्वीकारला नव्हता. ॲटली यांच्यासारख्या मजूर पक्षीय नेत्यांवर मानवतावादाचे संस्कार होते. ते व बेव्हिन हे रशियाच्या वाढत्या शक्तीमुळे अस्वस्थ होतेच; पण मजूर पक्षातील बेव्हन, मायकेल फूट इत्यादी डावा गट हा कट्टर रशियाविरोधी होता.

स्वीडनमध्ये नवी घटना तयार करण्यात समाजवाद्यांचा पुढाकार होता. गुन्नार व अल्वा मिर्डाल या अर्थशास्त्रज्ञ दांपत्याने या घटनेची मुख्य सूत्रे निश्चित केली. या पतिपत्नीचे असे मत होते की, नागरिकांना नुसते पैसे वाटून फरक पडणार नाही. तसे ते वाटले तर ते चैनीत उडवतील. म्हणून वस्तू वा इतर रूपाने लोकांना मदत देणे हिताचे असा निर्णय घेण्यात आला. या दांपत्याने काही बाबतीत अतिरेकही केला. नवजात बालकास कोणते कपडे द्यावेत, हेही नियम करून ठरवण्याचा अधिकार देण्यात आला. स्वीडिश समाजवादी पक्षाने १९४४ साली तयार केलेल्या कार्यक्रमात काम करून दमून येणाऱ्या स्त्रियांना घरी आल्यावर कमी कष्टात स्वयंपाक व घरगुती कामे, सोयीची होतील अशी उपकरणे तयार करण्याचे एक कलम होते.

अर्थकारणात सामाजिक मालकी हा एक महत्त्वाचा घटक समाजवादी मानत आले होते. ब्रिटिश मजूर पक्षाच्या घटनेतील चौथे कलम हे राष्ट्रीयीकरणासंबंधी होते. मजूर पक्षात नंतरच्या काळात यावरून बरेच मतभेद झाले. तथापि या पक्षाचे सरकार युद्धोत्तर काळात आले, तेव्हा अनेक कारखाने व उद्योग सार्वजनिक मालकीचे करण्यात आले. यात कोळशाच्या खाणी, रेल्वे इत्यादींचा समावेश होता. तथापि फ्रान्स व ऑस्ट्रिया यांनी राष्ट्रीयीकरणावर जितका भर दिला, तितका ॲटली सरकारने १९४५ ते ५० या काळात दिला नव्हता. नॉर्वेमध्येही याच प्रकारचे धोरण सत्ताधारी समाजवादी पक्षाने अंमलात आणले. मध्यवर्ती बँक ही इंग्लंड, फ्रान्स, नॉर्वे, हॉलंड इत्यादी देशांनी सरकारी नियंत्रणाखाली आणली. नॉर्वेतील जर्मन मालकीची अल्युमिनियमची बँक सरकारने युद्धात झालेल्या हानीच्या भरपाईसाठी ताब्यात घेतली.

नॉर्वे व स्वीडनच्या समाजवादी पक्षांनी १९४४ सालीच राष्ट्रीयीकरणास प्राधान्य देण्याचे धोरण सोडून दिले. उत्पादनास त्यापेक्षा अधिक महत्त्व असल्याचे या पक्षांनी म्हटले होते. ब्रिटिश मजूर पक्षाने त्या काळात जरी आपल्या घटनेत राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार करणारे चौथे कलम समाविष्ट केले असले तरी त्याचबरोबर रोजगारी घटत असल्यास खाजगी उद्योग ताब्यात घेण्याची पुस्ती जोडली होती. पुढील काळात मात्र या पुस्तीचे महत्त्व कमी झाले. स्वीडनमध्ये युद्धात फारशी हानी झाली नव्हती, तिथे समाजवादी पक्षाने राष्ट्रीयीकरणास प्राधान्य दिले. तथापि परंपरावादी पक्षांनी याविरुद्ध मोहीम काढल्यावर एक आयोग नेमण्यात आला. त्याने अगदी आवश्यक असेल तरच राष्ट्रीयीकरण करण्याची शिफारस करून कमीत कमी क्षेत्रांत ते अंमलात आणण्याचे बंधन घातले. हे मान्य झाले.

ब्रिटन व इतर युरोपीय देशांनी या रीतीने भांडवलदारी व्यवस्था पूर्णत: नष्ट न करता, उत्पादनवाढ आणि रोजगारीत वाढ यांना प्राधान्य दिले. मजूर पक्षाचे धोरण या रीतीने कल्याणकारी स्वरूपाचे होते. क्रांतिकारक धोरण स्वीकारून सर्व अर्थव्यवस्था सरकारी नियंत्रणाखाली आणण्याचे नव्हते. यामुळे बँक ऑफ इंग्लंड सरकारी नियंत्रणाखाली आली तरी खाजगी बँकांना धक्का लावला नाही. शिक्षण, आरोग्य, वाहतूक व घरबांधणी इत्यादी क्षेत्रांत सरकारची मदत वाढवून गरिबांना साहाय्य करावे व या योगे अगदी आवश्यक अशा सार्वजनिक सेवा त्यांना उपलब्ध करून द्याव्या ही मजूर पक्षाची दृष्टी होती. यामुळे अर्थव्यवस्थेत प्रचंड उलथापालथ झाली नाही. विशेष म्हणजे हुजूर पक्षाचे सरकार आल्यानंतर त्याने मजूर पक्षाच्या मुख्य धोरणाचा त्याग केला नाही.

पश्चिम युरोपात १९५० नंतर समाजवादी पक्ष सत्ता गमावून बसले. ही स्थिती १९६०च्या दशकात पालटली. स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क या तीन स्कॅन्डिनेव्हियन देशांत मात्र समाजवाद्यांच्या हाती सत्ता राहिली; पण त्यांनाही इतर काही पक्षांबरोबर आघाडी करणे भाग पडले. समाजवादी पक्षांप्रमाणेच युरोपीय देशांतल्या कम्युनिस्ट पक्षांची घसरगुंडी झाली. याची आकडेवारी प्रा.ससून यांनी दिली आहे. १९५०च्या दशकात व नंतर उपभोग्य मालाचे उत्पादन वाढत गेले आणि त्याची मागणीही वाढली. ग्राहकांची ही वाढती बाजारपेठ हा अमेरिकेचा प्रभाव मानला गेला. मग काही समाजवादी व एकजात सर्व देशांचे कम्युनिस्ट, उपभोग्य मालाचा वाढता प्रसार हा अमेरिकेचा प्रभाव असल्याचे मानून राष्ट्रीय स्वावलंबन, राष्ट्रीय संस्कृतीचे जतन करण्याची हाक देऊ लागले. यामुळेच फ्रेंच कम्युनिस्ट नेता मॉरिस थोरे यांनी वाङ्मय व जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात वाइनवर कोका कोलास मात करू देता कामा नये असे जाहीर आवाहन केले.

तंत्रज्ञान सुधारत गेले आणि उपभोग्य मालाचे उत्पादन वाढत गेले. यापूर्वी केवळ धनिकांनाच जे उपलब्ध होते, त्यातले बरेच मध्यम वर्गाच्या आटोक्यात आले आणि वेतनात वाढ झाल्याबरोबर पाठोपाठ श्रमजीवी वर्गाच्याही. या स्थितीत ग्राहकांना निवड करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले. तेव्हा सामान्य लोकांच्या बदलत्या आवडीनिवडीची दखल न घेऊन चालणारे नव्हते. तेव्हा ज्यांना निवडणूक लढवायची होती त्यांनी आपला पवित्रा बदलला. ही जी नवी लाट आली तिला विरोध करणे निष्फळ होऊन बसले. प्रा.ससून म्हणतात की, आधुनिक तंत्रज्ञान विकसित होत असल्याने हा बदल होत गेलाच; पण पश्चिम युरोपने रशियाच्या नियंत्रणाखालील पूर्व युरोपची व्यवस्था स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे, तसेच रशियन आक्रमक धोरणास पायबंद घालून संसदीय लोकशाहीचा मार्ग अवलंबल्यामुळे त्यास अमेरिकेशी जवळचे संबंध ठेवणे अनिवार्यच होते. तेव्हा नवी व्यवस्था पश्चिम युरोपवर कोणत्या बाहेरच्या शक्तीने लादली नाही; त्याने ती स्वत: स्वीकारली. लोकांना हीच व्यवस्था हवी होती आणि निवडणूक लढवणाऱ्या समाजवादी पक्षांना याकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. यामुळे त्यांना आपल्या जहाल कार्यक्रमास मुरड घालणे अनिवार्य होते. या पक्षातले जे गट जुन्या धोरणाचा आग्रह सोडण्यास तयार नव्हते ते लवकरच नगण्य होऊ बसले.

प्रा.ससून यांनी हेही दाखवून दिले आहे की, ज्या काळात कारखानदारी व एकंदर अर्थव्यवस्था जोमात होती, विकसित होत होती, तेव्हा रोजगारीत लक्षणीय वाढ होत होती. तेव्हा टोरी व तत्सम पक्षांच्या हाती सत्ता आल्यावर सामाजिक संपत्तीत वाढ व्हावी आणि तिचा उपयोग कल्याणकारी कार्यक्रमात वाढ करण्यास अवसर मिळावा असे झालेले दिसते. याच काळात कामगारांची सौदा करण्याची शक्तीही वाढत गेली. मंदी असेल, बेकारी मोठ्या प्रमाणात असेल, तर कामगारांची सौदा करण्याची शक्तीही घटत असते. कामगार मोठ्या प्रमाणात असंतुष्ट ठेवले व त्यांची क्रयशक्ती अल्प प्रमाणात ठेवली तर आपल्याच कारखानदारीवर संकट येते हे कारखानदारांनाही समजून आले होते.

हे सूत्र मांडून ससून यांनी साठ सालानंतर विविध युरोपीय देशांतील आर्थिक परिस्थितीची तपशीलात जाऊन चर्चा केली

*(पृष्ठ २४ वर*

अशोक राजवाडे

# व्हेनेझुएला : एका सार्वमताची गोष्ट

महाराष्ट्राच्या एकतृतीयांश लोकसंख्या पण तिप्पट क्षेत्रफळ असलेल्या व्हेनेझुएला नावाच्या देशातल्या सार्वमतावर जगाचं लक्ष एवढं का केंद्रित झालेलं असावं? या सार्वमतासाठी एकोणचाळीस देशांनी आपले निरीक्षक पाठवले होते आणि हे सार्वमत खुल्या वातावरणात पार पडणार नाही अशी हवा अमेरिकाधार्जिण्या माध्यमांतून पसरवली जात होती. चावेझ हे हुकूमशहा आहेत आणि सदासर्वकाळ सत्तेत राहण्याच्या खटाटोपापायी त्यांनी सार्वमताचा हा उद्योग आरंभला आहे, असं चित्र माध्यमांतून रंगवलं जात होतं. चावेझ हे सार्वमत हरले तर ते असा निकाल सहजासहजी स्वीकारणार नाहीत असंही म्हटलं जात होतं.

व्हेनेझुएला हा तेलसंपन्न देश आहे आणि तिथले अध्यक्ष ह्यूगो चावेझ हे यापूर्वी नऊ वेळा निवडणुका वा सार्वमतांना सामोरे गेले आहेत आणि १९९८ पासून दरवेळी भरघोस मतांनी विजयी झाले आहेत. चावेझ यांची धोरणं बऱ्याचअंशी मुक्त भांडवलाच्या विरोधी असून, या अशा भांडवलाच्या हालचालींवर त्यांनी बरेच निर्बंध लादले आहेत वा अटकाव केला आहे. एवढंच नव्हे तर व्हेनेझुएलाच्या तेलाच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा त्यांनी समाजकल्याणाच्या योजनांकडे वळवला आहे. मोफत वा स्वस्त शिक्षण आणि आरोग्य, अतिगरीब जनतेसाठी अन्नपुरवठा अशा गोष्टींचा यात समावेश आहे. अमेरिकेच्या इराकबाबत वा इस्रायलबाबतच्या धोरणांना चावेझ यांचा विरोध आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावरून जॉर्ज बुश यांचा उल्लेख 'सैतान' म्हणून करणारे चावेझ हे एकमेव राष्ट्रप्रमुख असावेत. आपल्या स्वत:च्याच नव्हे तर जगातल्या अनेक देशांत चावेझ लोकप्रिय असून, जगातले विचारवंत व्हेनेझुएलातल्या घडामोडींकडे लक्ष ठेवून असतात. प्रसिद्ध विचारवंत एजाज अहमद यांच्यामते जगात दहा ते बारा देश असे आहेत, जिथे चावेझ निवडणुकीला उभे राहिले तर विजयी होऊ शकतात. मात्र आंतरराष्ट्रीय भांडवलाचे प्रवर्तक चावेझवर खूष नाहीत. खुद्द व्हेनेझुएलातली नव्वद टक्के माध्यमं खाजगी आणि बऱ्याच अंशी अमेरिकाधार्जिणी आहेत, ती चावेझविरोधी आहेत. व्हेनेझुएलातल्या घटनेत काही मूलभूत बदल घडवून तिच्यातल्या अनेक (सुमारे वीस टक्के) कलमांत बदल घडवून आणण्यासाठी, २ डिसेंबर २००७ या दिवशी सार्वमत घेण्यात आलं. मात्र या सार्वमतात चावेझ यांचा थोडक्यात पराभव झाला. चावेझ यांच्या बाजूने ४९.३ टक्के तर विरोधी बाजूने ५०.७ टक्के मतं पडली.

**सार्वमत कशाबद्दल होतं?**

सार्वमतातला महत्त्वाचा मुद्दा अध्यक्षीय मुदतीवरची बंधनं काढून टाकण्याविषयी होता. आताच्या घटनेप्रमाणे अध्यक्षांना दोनदाच म्हणजे एकूण बारा वर्षांसाठी सत्तेवर राहता येतं. हे बंधन काढून टाकण्याच्या इथे प्रस्ताव होता. म्हणजे नव्या बदलाप्रमाणे अध्यक्षांना कितीही वेळा निवडणूक लढवता आली असती. दुसरं म्हणजे जर देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर निर्बंध घालणारे अनेक प्रकारचे कायदे अध्यक्षांच्या हातात असावे, असा एक प्रस्ताव सार्वमतात होता. ह्या दोन्ही गोष्टी अनेकांना खटकल्या होत्या. तरीपण या सार्वमतात असलेल्या काही कलमांचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

**कलम २१ :** एखाद्या व्यक्तीच्या लैंगिक वागणुकीवरून किंवा त्याच्या आरोग्याच्या परिस्थितीवरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. अपंग, तृतीयपंथी किंवा समलिंगी व्यक्तीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बहुतेक वेळा नकारात्मक असतो. यावर हे उत्तर आहे.

**अमेरिकेच्या इराकबाबत वा इस्रायलबाबतच्या धोरणांना चावेझ यांचा विरोध आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावरून जॉर्ज बुश यांचा उल्लेख 'सैतान' म्हणून करणारे चावेझ हे एकमेव राष्ट्रप्रमुख असावेत. आपल्या स्वत:च्याच नव्हे तर जगातल्या अनेक देशांत चावेझ लोकप्रिय असून, जगातले विचारवंत व्हेनेझुएलातल्या घडामोडींकडे लक्ष ठेवून असतात. प्रसिद्ध विचारवंत एजाज अहमद यांच्यामते जगात दहा ते बारा देश असे आहेत, जिथे चावेझ निवडणुकीला उभे राहिले तर विजयी होऊ शकतात.**

**कलम ६४ :** व्हेनेझुएलातल्या प्रत्येक व्यक्तीला स्वत:ला घर असण्याचा अधिकार प्रस्थापित केला जाईल.

**कलम ८७ :** जे व्यावसायिक असंघटित क्षेत्रात आहेत आणि / वा ज्यांना नोकरदारांप्रमाणे सुरक्षा नाही, त्यांच्या सामाजिक सुरक्षेसाठी स्वतंत्र निधी स्थापन करणं. उदा. टॅक्सीचालक, छोटे व्यावसायिक, असंघटित क्षेत्रातले कामगार यांसारख्यांसाठी अशा योजनेचा उपयोग होणार होता.

**कलम ९० :** आठवड्याच्या कामाच्या तासात घट करणं. कामाचे तास व्हेनेझुएलाच्या कायद्याप्रमाणे ४४ होते, ते ३६ वर आणणं.

**कलम २७२ :** कैद्यांचे अधिकार जपण्यासाठी प्रयत्न करणं आणि त्यांच्या पुनर्वसनावर भर देणं.

एकविसाव्या शतकाचा समाजवाद व्हेनेझुएलामध्ये आणणं, हा या घटनाबदलामागचा महत्त्वाचा हेतू आहे असं चावेझ यांचं म्हणणं होतं आणि चावेझ यांच्या धोरणांची दिशा पाहता, त्यापेक्षा वेगळं त्यांना अभिप्रेत होतं असं म्हणता येणार नाही. कारण या धोरणांच्या दिशेने त्यांचा प्रवास सुरू आहे आणि त्यामुळेच अमेरिकेचा त्यांच्यावर रोष आहे. मात्र काही क्षेत्रात राष्ट्रीयीकरण झालं असलं तरी आतापर्यंत उत्पादनांचं सरसकट राष्ट्रीयीकरण त्यांनी केलेलं नाही. गोरगरीब जनतेसाठी काही कल्याणकारी पावलं उचलण्यापर्यंतच त्यांनी मजल गाठली आहे. मात्र लॅटिन अमेरिकेतल्या देशांना एकत्र आणणं; आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांना शह देत पर्यायी बँकेची स्थापना, अमेरिकेच्या खुल्या बाजाराच्या धोरणांवर आधारित करारांना विरोध करणं, यात चावेझ यांनी सतत पुढाकार घेतल्याने चावेझ यांचं नेतृत्व अमेरिकेच्या डोळ्यांत सतत सलतं आहे.

**पराभवाची कारणं**

यातले अनेक प्रस्ताव आकर्षक असले तरी पुरेसं लक्ष न देताच शब्दबद्ध केले होते. अनेक ठरावांची मोटलीदेखील नीट लक्ष न देताच बांधली होती. यातल्या अनेक प्रस्तावांसाठी घटनेत बदल करण्याची आवश्यकता नव्हती. चावेझ समर्थकांच्या फाजील आत्मविश्वासामुळे, पुरेशा संख्येने चावेझ समर्थक मतदानाला बाहेर पडले नाहीत आणि त्यामुळे हा पराभव झाला असे अनेकांनी म्हटलं आहे.

त्यांच्या बाजूने कोण आहे आणि विरोधात कोण आहे? सरकारी पक्ष किंवा विरोधक या साऱ्यांनी जनमताच्या ज्या काही चाचण्या प्रसिद्ध केल्या आहेत, त्यातून स्थूलमानाने असं दिसतं की, गोरगरीब जनता ही बहुतांशी चावेझबरोबर असून चावेझचे विरोधक मध्यमवर्ग वा उच्चवर्गात अधिक प्रमाणात आहेत. याची कारणं उघड आहेत, चावेझच्या 'एकविसाव्या शतकातल्या समाजवादा'च्या भाषेने उच्चवर्गीय आणि मध्यमवर्गीय धास्तावले आहेत. वीज आणि दूरसंचार क्षेत्रांत चावेझने राष्ट्रीयीकरण घडवल्याने या असुरक्षिततेच्या भावनेत भर पडली आहे. देशाच्या तेलउद्योगातला अतिरिक्त पैसा चावेझनी आरोग्य, शिक्षण आणि कल्याणकारी कामांकडे वळवल्याने गुंतवणूकदार वर्गामध्ये नाराजी पसरली आहे. मात्र चावेझच्या कारकिर्दीत दारिद्र्यरेषेखालील लोकांचं प्रमाण चव्वेचाळीस टक्क्यांवरून तीस टक्क्यांपर्यंत खाली आलं आहे. शिक्षण, आरोग्य यांबाबत वर म्हटलंच आहे. भाववाढीचा हिशोब जमेस धरूनही दर माणशी केल्या जाणाऱ्या सार्वजनिक खर्चात ३१४ टक्के वाढ झाली आहे.

रोमन कॅथलिक चर्चने चावेझला विरोध केला आहे. या विरोधाची कारणं समजण्यासारखी आहेत. चावेझ यांची भाषा लॅटिन अमेरिकेत साठीच्या दशकात लोकप्रिय असणाऱ्या लिबरेशन थिऑलॉजी नावाच्या पंथाच्या समर्थकांसारखी आहे. ख्रिस्त हा एक श्रेष्ठ क्रांतिकारक होता, असं या पंथाच्या लोकांचं म्हणणं आहे. हे चर्चला अमान्य आहे. या पंथातल्या ख्रिश्चनांनी साठीच्या दशकात व नंतर जनतेच्या बाजूने आणि त्या त्या देशातल्या हुकूमशहांच्या विरुद्ध लढे दिले होते आणि अमेरिकेच्या झोंडशाहीला विरोध केला होता. यासाठी चर्चबरोबर त्यांनी उभा दावाही पत्करला होता. व्हॅटिकनमधले आत्ताचे पोप सुरुवातीपासूनच लिबरेशन थिऑलॉजीच्या विरोधात होते. मात्र इक्वाडोरचे आताचे अध्यक्ष राफेल कोरिया हे स्वत:च लिबरेशन थिऑलॉजीचे पुरस्कर्ते आहेत. शिवाय बाजूंच्या पॅराग्वेमध्ये 'गरीब जनतेचा बिशप' म्हणून ओळखले जाणारे 'फर्नांडो लूगो' हे एप्रिल २००८ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी उभे आहेत. याला चर्चचा प्रखर विरोध आहे. चावेझ आणि बाकीचे नेते ख्रिश्चनांच्यामध्ये फूट पाडत आहेत असं चर्चचं म्हणणं आहे. तसंच काही मानवाधिकार संघटना, विचारस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या संघटना चावेझच्या विरोधात होत्या. यातल्या सर्वच अमेरिकाधार्जिण्या होत्या असं नव्हे; पण या संघटनांचा विचार, इतिहास आणि विरोधाची कारणं हे स्वतंत्रपणे तपासावं लागेल.

चावेझ यांचा जर या निवडणुकीत पराभव झाला तर चावेझसमर्थक काहीतरी दंगल घडवून आणतील किंवा कसंही करून चावेझ यात काहीतरी गबडत करतील असं चित्र माध्यमांनी पसरवलं होतं. पण तसं काहीच घडलं नाही. उलट चावेझनी आपल्या समर्थकांना शांत राहण्याचं आवाहन केलं. विरोधकांचं अभिनंदन केलं. चावेझनी सार्वमतातला आपला पराभव सहज स्वीकारल्याने विरोधकांची तोंडं बंद झाली आहेत. आपण सार्वमताचा आदर करतो; विरोधकांनीही असाच आदर करावा असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला आहे. व्हेनेझुएलातली लोकशाही आता अधिक सुदृढ झाली आहे, असा याचा अर्थ होतो असं चावेझनी म्हटलं आहे. विरोधकांनी लोकमताचा आदर करावा असा टोला चावेझनी लगावण्यामागे काही इतिहास आहे. २००४ साली चावेझनी अध्यक्षपदावरून पायउतार व्हावं यासाठी

एक सार्वमत घेतलं गेलं होतं. दहा लाख सह्या जमा केल्या तर अध्यक्षांना सत्तेवरून पायउतार करण्यासाठी सार्वमत घेण्याची व्हेनेझुएलाच्या घटनेत तरतूद आहे. (ही घटना चावेझच्या काळात लिहिली गेली.) २००४ सालचं सार्वमत जेव्हा चावेझ विरोधक हरले होते (म्हणजे चावेझ यांनी सत्तेवर राहण्याच्या बाजूने जनतेने कौल दिला होता) तेव्हा त्यांनी ते स्वीकारायला नकार दिला होता. यापूर्वीच्या सार्वमतांत अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिमी कार्टर आणि त्याची संघटना (कार्टर सेंटर) यांनी निरीक्षकांचं काम बजावलं होतं आणि ह्या निवडणुका व्यवस्थित पार पडल्या असल्याचा निर्वाळा दिला होता. २००५ साली तिथल्या काँग्रेसच्या निवडणुकांत आपण निवडणूक हरणार आहोत असं विरोधकांच्या जेव्हा लक्षात आलं तेव्हा त्यांनी ऐनवेळी निवडणुकांवर बहिष्कार टाकला. कार्टर सेंटर आणि युरोपीय युनियनचे निरीक्षक या विरोधकांच्या निर्णयावर नाराज होते. चावेझ हे हुकूमशहा असल्याने त्यांनी हा सार्वमताचा घाट घातला, असा जो प्रचार पश्चिमी कॉर्पोरेट माध्यमांतून सुरू होता (आणि आपल्याकडच्या माध्यमांनी त्याचीच री ओढली होती) तो अर्थातच खरा नव्हता असं मत अनेक विचारवंतांनी व्यक्त केलं आहे. एक कारण तर साधं आहे की चावेझना सत्तेवर राहण्यासाठी लोकशाही निवडणुकांखेरीज कोणता मार्ग हवा होता असं सार्वमतांत वा इतरत्र कुठेच आढळून आलं नाही. दुसरीकडे या सार्वमतात असे अनेक मुद्दे होते की ज्यांच्यातून हे स्पष्ट होत होतं की सत्तेचं विकेंद्रीकरण चावेझला अभिप्रेत होतं. अनेक विचारवंतांनी अमेरिकेतल्यापेक्षा व्हेनेझुएलामधली लोकशाही सुदृढ असल्याचं मत व्यक्त केलं होतं. एकोणचाळीस देशांतल्या निरीक्षकांखेरीज युरोपीय युनियन, जिमी कार्टर यांचं ‘कार्टर सेंटर’ आंतरराष्ट्रीय वकिलांचं गिल्ड अशा अनेक संघटना सार्वमताचं जवळून निरीक्षण करत होत्या.

सार्वमत आपण हरणार असं गृहीत धरून चावेझच्या विरोधकांनी फ्रॉड (गैरव्यवहार) अशी अक्षरं छापलेली टी शर्टस् आधीच छापून ठेवले होते आणि अशा तऱ्हेने बोभाटा करण्याचा त्यांचा विचार होता. मात्र विरोधकाकांचाच सार्वमतात विजय झाल्यामुळे हा बेत फसला. चावेझ यांचा १.४ टक्क्यांनी पराभव होण्याऐवजी १.४ टक्क्यांनी विजय झाला असता तर नेहमीप्रमाणे विरोधकांनी गैरव्यवहार झाल्याचे आरोप केले असते, असं मत चेसा बोदिन या व्हेनेझुएलासंबंधीच्या राजकीय अभ्यासकाने म्हटलं आहे. सार्वमतांनंतरची विरोधकांची वागणूक समंजस आहे, पण ते एकसंध नाहीत. त्यांच्यात अनेक प्रवाह आहेत, आणि चावेझच्या कारकिर्दीत विरोधकांनी बजावलेली भूमिका नकारात्मक आहे. २००२ साली चावेझविरोधी जो लष्करी उठाव झाला होता त्यात त्यांची वागणूक लोकशाहीविरोधी होती; दरवेळी ते निवडणूक हरत होते, तेव्हा त्यांनी गैरप्रकार झाल्याचे आरोप केले होते आणि लोकशाही प्रक्रियेला खीळ घातली होती असं बोदिन यांनी म्हटलं आहे. (विरोधकांपैकी अनेक गटांना अमेरिकेचा प्रत्यक्ष  वा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे असं अनेकदा स्पष्ट झालं आहे.) अमेरिकेचं शासन आणि त्याच्या अखत्यारीतल्या यु.एस.एड किंवा नॅशनल एन्डोमेंट फॉर डेमॉक्रसीसारख्या संस्था विरोधी गटांना निधीवाटप करत असतात हे सर्वज्ञात आहे; पण प्रत्येक संघटनेबाबत हे खरं असतंच असं नाही; अनेकवेळा अशा बातम्या ह्या अफवा असू शकतात; मात्र तिथे अमेरिकेच्या हस्तक्षेपाचा धोका अगदी खरा आहे असं बोदिन यांचं मत आहे. सुमाते या नावाची आणखी एक संस्था व्हेनेझुएलामध्ये चावेझविरोधी कामामध्ये गुंतलेली आहे. अमेरिकेचं शासन आणि सुमाते यांच्यात फंडींगच्या व्यवस्था असल्याचं दोघांनीही मान्य केलं आहे. सुमातेच्या संस्थापक मारिया कोरीना माचाडो यांनी अध्यक्ष बुश, कोंडोलिसा रईस आणि वॉशिंग्टनमधल्या इतर अनेक अनेक उच्चपदस्थांच्या गाठीभेटी घेतल्याचं वृत्त अनेकदा प्रसिद्ध झालं आहे.

या निकालानंतर काय होईल हे सांगणं कठीण आहे. चावेझ भांडवलशाहीशी तह करतील की नव्याने पक्षबांधणीवर भर देऊन, आपलं स्थान बळकट करून पुन्हा आपला कार्यक्रम पुढे नेतील? अमेरिका या घटनांची कशी दखल घेईल आणि आपली रणनीती कशी आखील? हे सर्व नीट पहावं लागेल. ज्या कसोट्या वापरून आपण एखाद्या देशाच्या लोकशाहीसंबंधी बोलत असतो त्या निकषांचा आपल्याला जरूर विचार करावा लागेल. त्या देशाची धोरणं खरंच जनतेला धार्जिणी आहेत की नाहीत; त्यातून देशाची साधनसंपत्ती कुठून कशी कुणाच्या खिशात जात असते; त्यातून जनतेचं सबलीकरण होतं की विशिष्ट हितसंबंधीयांचं होतं, हे प्रश्न आपल्याला विचारावे लागतील. आपण ह्या कसोट्या न वापरताच अनेकदा नेत्यांची निवड करतो आणि मग नरेंद्र मोदी, जॉर्ज बुश, सर्कोझी (फ्रान्स), टोनी ब्लेअर असे कोणतेही नेते विजयी होऊ शकतात. युद्धं, जातीय, धार्मिक वा वांशिक दंगली, असंख्य माणसांच्या जिवाला धोका, संपत्ती कुठेतरी गायब होणं हे सारं संभवू शकतं आणि असे भीषण व्यवहार करणाऱ्यांमधूनच आपल्याला नेत्यांची निवड करायची असते, हेच किती भीषण आहे! या पार्श्वभूमीवर लॅटिन अमेरिकेत निर्माण झालेले नवे पर्याय आणि त्यांचे लोकशाहीचे लढे हे आपल्याला बरंच काही शिकवून जातात– जरी त्यांचा मार्ग खडतर असला तरी!

**अशोक राजवाडे**
ashokrajwade@gmail.com
बी-३०२, अमिषा अपार्टमेंट, लक्ष्मण म्हात्रे मार्ग, नवागाव, दहिसर (प.), मुंबई ४०००६८.
फोन : ०२२-२८९५३६१२

कैफियत

राजन गवस

# ज्याच्या घरात आठ लाख पडून आहेत, त्याला नोकरीची गरज काय?

अगदी सतत घडणारा प्रसंग. तुमच्या अवती-भवती असे सततच घडत असते. तुमच्यात आणि माझ्यात फरक काय? पण त्या प्रसंगाने काही प्रश्न माझ्यासमोर उभे केलेत. याची उत्तरे माझ्याकडे नाहीत. कदाचित तुमच्याकडे असू शकतील.

फार सौंदर्यवादी समीक्षकांच्या कठीण भाषेत न बोलता तो प्रसंग तुमच्यासमोर ठेवला तर – कदाचित तुम्ही काही उत्तरे सुचवू शकाल.

प्रसंग असा –

माझ्या जवळचेच गाव. गावाला नाव हवेच कशाला? या गावात एक माध्यमिक शाळा आहे. ती माध्यमिक शाळा अलिकडेच सुरू झाली आहे. 'अलीकडे' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे, कारण अलीकडे आणि पलीकडे यामध्ये वसंतदादा पाटील नावाचे मुख्यमंत्री आहेत. आता हे कोण वसंतदादा पाटील हे सांगायची गरज नाही. माझ्या मनात त्यांच्याविषयी नितांत आदर आहे. आदराची कारणे अनेक आहेत. ते कृषिजनसंस्कृतीतील अल्पशिक्षित पण अत्यंत कुशाग्र बुद्धीचे मुरब्बी राजकारणी होते. याविषयी तुमच्याही मनात संशय नसावा. कणखर, द्रष्टे! आणखीही काही विशेषणे मला सुचतील. त्यांनी विनाअनुदान शैक्षणिक धोरणात किंचित पुढाकार घेतला आणि त्यानंतर विनाअनुदानित शाळा-महाविद्यालयांचे अक्षरशः पेव फुटले.

**शेतीत लक्ष घातलेल्या या तरुणाने आपल्या शेतीचा कायापालट केलेला. चारशे टन ऊस दरवर्षी. अधिक इतर पिके. खातेपिते घर. कोणत्याच गोष्टीची कमतरता नाही. तरीही कोणत्याच चांगल्या मुलीचा बाप त्याला मुलगी द्यायला तयार नाही. प्रत्येकाची इच्छा एकच – मुलगा नोकरीस हवा. म्हणून मुलाने शोधलेला हा पर्याय.**

या धोरणानुसारच ही माध्यमिक शाळा आमच्या शेजारच्या गावातील एका पुढाऱ्याने सुरू केली. हे पुढारी कोणत्याही पक्षाचे असतील. कारण आता पक्षाच्या नावात फरक असला तरी सर्वांचे चेहरे सारखेच. वैचारिक भूमिकेचा प्रश्न पर कधीच निकालात निघालाय. तर या पुढाऱ्याचा 'राजकारण' हा धंदा. धंदा म्हटलं की फायदा-तोटा आलाच. कोणीही, कोणताही धंदा तोट्यात चालावा म्हणून करत नाही; एवढे गृहीत धरले तर ह्या पुढाऱ्याने सुरू केलेल्या हायस्कुलबाबतचे अनेक प्रश्न निकालात निघतात.

या हायस्कुलची भूगोल या विषयाच्या शिक्षकाची जागा रिक्त झाली. रीतसर जाहिरात काढल्याशिवाय शासकीय मान्यता मिळत नाही. अर्थात, या रीतसर शासकीय कार्यात शासकीय यंत्रणा पैसा मिळवत असते. पण आता हे काही महत्त्वाचे उरलेले नाही. तर जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. मुलाखतीच्या तारखा ठरल्या. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना बोलावण्यात आले. मुलाखत या शब्दाचे अर्थ आता शिक्षणखात्यात बदललेले आहेत. मुलाखतीच्या वेळी ज्ञानाची 'चाचणी' अपेक्षित नसून, कोण किती पैसे देऊ शकतो याची 'चाचपणी' केली जाते. ज्ञानाचा आणि शिक्षणाचा आता संबंध संपलेलाच आहे.

माध्यमिक शाळेत शिक्षक होण्यासाठी आता ज्ञानाची गरज नसून पैशांची गरज असते. ही अलीकडच्या शिक्षणातील पात्रता. त्यानुसार पात्र उमेदवारांना बोलावण्यात आले. मुलाखती सुरू झाल्या. कोणाची देण्याची क्षमता किती याची चाचपणी सुरू झाली. पण यातील एका उमेदवाराने सांगून टाकले की ''तुम्हाला सर्वाधिक रक्कम जो कोणी देईल, त्याच्यापेक्षा पंचवीस हजार जास्त देण्यास मी तयार आहे.'' अखेरचे तीन उमेदवार रिंगणात. यातील शेवटच्या उमेदवाराने संस्थेस सात लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली. आठ दिवसांचा वेळ द्यावा अशी विनंती केली. पंचवीस हजार जास्तवाल्या त्या उमेदवारास संस्थाचालकांनी आत बोलावले. त्यास अंतिम दर सात लाख रुपये आल्याचे सांगितले. त्याचे म्हणणे विचारले. त्याने सात लाख पंचवीस हजार रुपयांचा चेक त्यांच्यासमोर ठेवला. संचालक मंडळ तयार. आजचे पुढारीच म्हणाले, 'चेक नको, रोख रक्कम हवी.' उमेदवाराने तासाची वेळ मागून घेतली आणि तासाच्या आत सात लाख पंचवीस हजारांची रक्कम त्यांच्यासमोर टाकली. संचालक मंडळ आवाक झाले. संचालक मंडळातील 'पलीकडच्या शिक्षण व्यवस्थेतील' एक संचालक म्हणाले, 'बाळ, ज्याच्या घरात आठ लाख पडून आहेत, त्याला नोकरीची गरज काय?'

उमेदवार काहीच न बोलता म्हणाला, 'ऑर्डर कधी देताय?' त्याला ऑर्डर दिली गेली. निवडला गेलेला उमेदवार एकदम खुष. संस्थाचालक त्याहून खुष.

ही बातमी काही दिवसांत आमच्यापर्यंत पोहोचली. आश्चर्य वाटले नाही; पण सात लाख पंचवीस हजार रुपये एका तासात हजर करण्यानं मला धक्का दिला होता, बोच वाढली होती. चौकशी करायला गेल्यावर आणखी वास्तव समोर आलं. ते असं –

सात लाख पंचवीस हजार देणारा उमेदवार माझ्या गावा जवळचाच. सधन शेतकऱ्याचा मुलगा. वय वर्षे तेहतीस. बी.एड्. नंतर नोकरी मिळत नाही म्हणून शेतीकडे वळलेला. शेतीत त्याने आपल्या इच्छेप्रमाणे प्रगती केली. घरात लग्नाची चर्चा सुरू झाली. मुली शोधण्याची मोहीम हातांत घेतली गेली. पण जावे तिथे अपयश. 'मुलाला नोकरी आहे का?' हा काळजाची खपली काढणारा प्रश्न. प्रत्येक ठिकाणी हाच प्रश्न. नंतर ठरलेला नकार. शेतीत लक्ष घातलेल्या या तरुणाने आपल्या शेतीचा कायापालट केलेला. चारशे टन ऊस दरवर्षी. अधिक इतर पिके. खातेपिते घर. कोणत्याच गोष्टीची कमतरता नाही. तरीही कोणत्याच चांगल्या मुलीचा बाप त्याला मुलगी द्यायला तयार नाही. प्रत्येकाची इच्छा एकच – मुलगा नोकरीस हवा. म्हणून मुलाने शोधलेला हा पर्याय.

वास्तवावर तुमचा किंवा माझाही विश्वास बसणे कठीण. पण हे आपल्या अवतीभवतीच घडते आहे. खेड्यापाड्यात नोकरी नसणाऱ्या तरुणास मुली देण्यास कोणताच बाप तयार नाही. मुलीला नोकरीवाला नवराच हवा आहे. कृषिजन संस्कृतीतल्या मुलाला आता नोकऱ्या उरलेल्याच नाहीत. शासकीय नोकरभरती बंद. सहकारी संस्था मोडकळीस आलेल्या. शहरातील नोकरीसाठी गरजेचे असलेले कौशल्य नाही. अशा तरुणांना आता शेतीशिवाय पर्याय नाही.

पण शेती करणाऱ्याला आता मुलगी मिळणे कठीण झाले आहे. आता लग्नाचे वय तीस वर्षाच्या पुढे गेले आहे. तेही नोकरी असणाऱ्यांसाठी. मग नोकरी नसणाऱ्यांचे काय? खेड्यापाड्यांतील हा नवा प्रश्न आहे : शेती करणाऱ्या शिक्षित मुलांच्या लग्नाचे काय? आठवी-नववी शिकलेल्या मुलीलाही आता नोकरदार नवरा हवा आहे. त्यात आता आईवडिलांनी लग्न ठरवण्याचा जमाना इतिहासजमा झालाय. बदल घडणे स्वाभाविक, पण हे बदल नवे प्रश्न निर्माण करत आहेत त्याचे काय?

पदवी घेतलेल्या तरुणांची संख्या ढीगभर. पण नोकरीच्या संधी जवळपास नाहीत. शिक्षण आणि नोकरी यांचा संबंध काय? शिक्षण नोकरी यांचा संबंध कोणी जोडला? हा संबंध तोडायचा असेल तर काय करायला हवे? असल्या प्रश्नांचा विचार करण्यास आता वेळ आहेच कुणाला?

पण खेड्यापाड्यात मात्र हा नवा जीवघेणा प्रश्न उभा ठाकलाय.

यातून समाजात नवी विकृती तर जन्म पावणार नाही ना? नवा हिंसक समूह तर जन्मास येणार नाही? तुमच्या माझ्या मुली निर्भयपणे जगायच्या असतील तर या नव्या प्रश्नाचा विचार करायला हवा. पण कोणी?

**राजन गवस**
मु.पो. गारगोटी, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर.
मोबाईल : ९४२२५८०५१७.

■

'साधना'च्या या व मागील अंकाच्या मुखपृष्ठांवर व्यंगचित्रे दिली आहेत. त्यांतील इंग्रजी शब्दही तसेच ठेवले आहेत. अधूनमधून मुखपृष्ठांवर हा बदल करण्याची कल्पना वाचकांना कशी वाटते, ते समजून घेण्यात अगत्य आहे.

**– संपादक**

## *लेखकांना विनंती*

'साधना'कडे येणाऱ्या लेखांचे प्रमाण वाढले आहे, ही आनंदाची बाब आहे. लेखकांनी कृपया पुढील बाबी लक्षात घ्याव्यात :

१] साहित्य कागदाच्या एकाच बाजूवर वाचनीय अक्षरांत दोन ओळींत पुरेसे अंतर ठेवून समास सोडून लिहिलेले असावे. ते साहित्य अन्यत्र पाठवले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करावा.

२] साहित्याची मूळ-प्रत पाठवावी. झेरॉक्स नको. वाईट अक्षराची मूळ-प्रत / झेरॉक्स दोन्ही स्वीकृत केले जाणार नाहीत.

३] प्रत्येक साहित्य प्रकाराखाली लेखकाचे नाव आणि संपूर्ण पत्ता (फोन, इ-मेल असल्यास त्यासहित) असणे आवश्यक आहे.

४] पाठवलेल्या सर्व साहित्याची झेरॉक्सप्रत लेखकाने स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे. पोच मिळण्यासाठी साहित्यासोबत स्वतःचे नाव, पत्ता असलेले पोस्टकार्ड पाठवावे.

५] साहित्य स्वीकृती / अस्वीकृतीचा निर्णय आमच्याकडून लेखकांना लवकरात लवकर कळवण्याचा आमचा प्रयत्न राहील.

६] अस्वीकृत साहित्य आमच्याकडून लेखकास परत पाठविले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी; व त्यासाठीचे परतीचे टपालहशील पाठवू नये.

आंतरराष्ट्रीय राजकारण

मुनीर सय्यद

# इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत तणाव कायम

इराणने अण्वस्त्रे विकसित करण्याचा कार्यक्रम २००३ साली स्थगित केला, तो पुन्हा सुरू करण्यात आलेला नाही, असा संयुक्त अहवाल अमेरिकेच्या १६ गुप्तचर संस्थांनी प्रकाशित केल्यापासून या प्रश्नावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

हा अहवाल प्रकाशित झाल्यावर अनेक निरीक्षकांना आश्चर्य वाटले. हा अहवाल प्रसिद्ध करून सध्या इराणवर आर्थिक निर्बंध लादण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नातील हवा का काढून घेण्यात आली हे या निरीक्षकांना समजेना. अध्यक्ष बुश यांच्या टीकाकारांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठविली.

काही टीकाकारांनी गुप्तचर संस्थांनी इराकवर हल्ला करण्यापूर्वी अमेरिकन प्रशासनाला दिलेल्या संहारक शस्त्राबद्दलच्या चुकीच्या अहवालाची आठवण करून दिली. याच संस्थांनी २००५ साली इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम सुरूच असल्याचे म्हटले होते. आता त्याच संस्था २००३ साली इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम स्थगित करण्यात आल्याचे म्हणत आहेत. त्यामुळे इराणबद्दल आपल्याला किती कमी माहिती आहे हे यावरून सिद्ध होत असल्याचे म्हटले.

इराणची बाजू मांडण्याचा प्रयत्नही या निमित्ताने होत आहे. इराणने अण्वस्त्रप्रसार विरोधी करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारान्वयेही त्याला शांततापूर्ण कार्यासाठी (जसे ऊर्जानिर्मिती) अणुइंधन निर्मिती करता येऊ शकते. हे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाच्या देखरेखीखाली करावे लागते. इराण विरोधक म्हणत आहेत की इराण जगाला अण्वस्त्र संहाराच्या मार्गाने नेत आहे, तो धोकादायक होता व आहे, या म्हणण्यात आज तरी तथ्य नाही. इराण अण्वस्त्रे निर्माण करण्याकरिता युरेनियम संपृक्त करीत आहे असे जरी गृहीत धरले तरी त्याला अण्वस्त्रे बनविण्यास अद्याप सात-आठ वर्षे तरी लागतील.

इराणची बाजू मांडताना ही मंडळी म्हणतात की, इराणच्या आजूबाजूला पाकिस्तान, रशिया, भारत, चीन, इस्रायलसारखे अण्वस्त्रधारी देश आहेत. त्यांच्या शेजारी इराकमध्ये व अफगाणिस्तानमध्ये हजारोंच्या संख्येने अमेरिकन व पाश्चिमात्य राष्ट्रांचे लष्कर तैनात आहे. अशा परिस्थितीत कुठलाही देश आपल्या सुरक्षेसाठी अण्वस्त्रनिर्मितीचा मार्गाच चोखाळेल.

उत्तर कोरियासारख्या अण्वस्त्रधारी देशाविरुद्ध ज्याने दुसऱ्या देशावरून क्षेपणास्त्रे पाठवून त्यांना भयभीत केले, त्यांच्या बाबतीत जेवढी लवचिकता दाखविण्यात आली तेवढी लवचिकता अमेरिका व पाश्चिमात्य राष्ट्रे इराणबाबत का दाखवीत नाहीत, असा सवालही करण्यात येत आहे.

इराणबरोबर वाटाघाटी सुरू ठेवाव्यात, आर्थिक निर्बंधही घालावेत व त्याबरोबर आर्थिक व इतर प्रोत्साहनेही द्यावीत असा मार्ग चीन सुचवीत आहे. रशिया व अणुऊर्जा आयोग शिक्षेच्या वा युद्धाच्या विरोधात आहेत.

**आपण अणुऊर्जेसाठी युरेनियम संपृक्त करीत असून अण्वस्त्रे बनविण्याचा आपला कुठलाही इरादा नाही असे इराण वारंवार सांगत आला आहे. त्याने अणुऊर्जा आयोगाबरोबर करार केला व भूतकाळात आपण कसे युरेनियम मिळविले याचे खुलासे दिले. दबाव वाढत गेल्यावर अनधिकृतपणे मिळविलेला एक नकाशा आयोगाला दिला; परंतु सध्या सुरू असलेल्या अणुकार्यक्रमाची माहिती अथवा अधिक खोलवर तपासणी करण्यास आयोगाच्या निरीक्षकांना परवानगी दिली नाही.**

सौदी अरेबिया व आखाती राष्ट्रेही युद्धाच्या तसेच या भागात तणावाचे वातावरण निर्माण होण्याच्या विरोधी असून, इराणबरोबर राजनैतिक व व्यापारी संबंध वाढवून तणाव कमी करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. इराणच्या तथाकथित अण्वस्त्र कार्यक्रमावरून ही राष्ट्रे चिंतीत असली तरी इराणवर हल्ला करण्यास अमेरिकेला या राष्ट्रांचा पाठिंबा मिळणार नाही.

### इराणचे चुकले कुठे?

चीन, उत्तर कोरिया, भारत, पाकिस्तान व इस्रायल या राष्ट्रांनी अण्वस्त्रे बनविली. अमेरिका व पाश्चिमात्य राष्ट्रे काही निर्बंध लादण्यापलीकडे काही करू शकली नाहीत. मग इराणच्या बाबतीतच असा आरडाओरडा व युद्धाची भाषा का होत आहे. अध्यक्ष बुश म्हणतात की इराण धोकादायक होता व आहे. फ्रेंच नेते युद्धाची भाषा करतात. इराणमुळे मध्यपूर्वेत आण्विक संहार होईल असे म्हटले जाते.

चीन, तैवान, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, पाकिस्तान, भारत या राष्ट्रांमध्येही तणावाचे वातावरण राहिले आहे. त्यामुळे फक्त

मध्यपूर्वेतच तणावाचे वातावरण आहे असेही नाही. वरील राष्ट्रांपैकी उत्तर कोरियाने अण्वस्त्रनिर्मिती कार्यक्रम थांबविण्याचे मान्य केले आहे; तर लिबियाने आपला अण्वस्त्र कार्यक्रम सोडून दिला आहे.

मग इराणबाबतच असा हलकल्लोळ का? असा प्रश्न उपस्थित होतो. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाची माहिती प्रथम जगाला २००२ साली कळली. ही माहिती इराण प्रशासनाच्या विरोधी गटाकडून मिळाली. यावर बरीच चर्चा व टीका होऊ लागली. जसजसे हे स्पष्ट होत गेले की इराण १८ वर्षे गुप्तपणे अण्वस्त्र कार्यक्रम राबवीत होता व त्यासाठी त्याने अनधिकृतरित्या, गुप्तपणे सामुग्री व तांत्रिक ज्ञान मिळविले. एवढेच नव्हे तर पाकिस्तानच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे जनक समजले जाणारे डॉ.ए.क्यू.खान यांच्या अण्वस्त्र प्रसाराच्या उद्योगांशी इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचा संबंध आहे. तसे अमेरिका व पाश्चिमात्य राष्ट्रांनी इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम थांबविण्याची जोरदार मोहीम उघडली.

आपण अणुऊर्जेसाठी युरेनियम संपृक्त करीत असून अण्वस्त्रे बनविण्याचा आपला कुठलाही इरादा नाही असे इराण वारंवार सांगत आला आहे. त्याने अणुऊर्जा आयोगाबरोबर करार केला व भूतकाळात आपण कसे युरेनियम मिळविले याचे खुलासे दिले. दबाव वाढत गेल्यावर अनधिकृतपणे मिळविलेला एक नकाशा आयोगाला दिला; परंतु सध्या सुरू असलेल्या अणुकार्यक्रमाची माहिती अथवा अधिक खोलवर तपासणी करण्यास आयोगाच्या निरीक्षकांना परवानगी दिली नाही.

इराणने अण्वस्त्र प्रसारविरोधी करारावर स्वाक्षरी केली असल्याने तो संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाच्या परिप्रेक्षात येत होता. अशा राष्ट्रांना आयोगाच्या देखरेखीखाली फक्त शांततामय उपयोगासाठी (अणुऊर्जेसाठी) अणुशक्तीचा वापर करता येतो. आयोगाने इराणकडे पाठपुरावा सुरू केला, अण्वस्त्र कार्यक्रमाची माहिती व खुलासे मागितले (इराण पुरेसे सहकार्य करीत नसल्याचे अहवाल आयोगाने दिल्यानंतर, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेने दोन वेळा आर्थिक व इतर निर्बंध इराणवर लादले.)

अमेरिकेचा असा आरोप आहे की, इराण आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाबरोबर केलेल्या कराराच्या आड वेळ काढीत असून आपला युरोनियम संपृक्तीकरणाचा कार्यक्रम त्याने चालू ठेवला आहे.

अमेरिकेच्या या म्हणण्याला इराणी बंडखोरांच्या पॅरिस स्थित संघटनेने पुष्टी दिली आहे. 'नॅशनल कौन्सिल ऑफ रेसिस्टन्स ऑफ इराण' या संघटनेचे प्रवक्ते श्री.मेहदी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की मध्य इराणमधील काराकास पर्वतराजीमध्ये नातान्झजवळ डोंगरामध्ये बोगदे खोदून भूमिगत आण्विक केंद्र तयार करण्यात आले असून, तेथे युरेनियम संपृक्तीकरण व इतर कार्यक्रम चालतात, हे केंद्र एका बोगद्याद्वारे नातान्झ आण्विक केंद्राशी जोडलेले आहे. 'बॉंबहल्ला झाला तरी या तळाला धक्का लागणार नाही अशी रचना करण्यात आली आहे. आपली ही माहिती इराण प्रशासनाच्या आतील गोटातून मिळाली असल्याचा दावा श्री.मेहदी यांनी केला.

मेहदी म्हणतात की या भागातील सर्व जमीन विकत घेण्यात आली असून, या भागाला लष्करी विभाग घोषित करण्यात आले आहे. दोन वर्षांपूर्वी हे काम सुरू झाले असून येत्या सहा महिन्यात हे भूमिगत केंद्र कार्यान्वित होईल.

इराणी प्रशासनाने अर्थातच असे भूमिगत केंद्र अस्तित्वात असल्याचा व तेथे युरेनियमचे संपृक्तीकरण चालत असल्याचा दावा फेटाळला आहे.

इराणी बंडखोरांची ही संघटना 'पीपल्स मुजाहिदीन ऑफ इराण' या संघटनेची राजकीय शाखा आहे व तिला 'दहशतवादी संघटना' घोषित करण्यात आले आहे. याच संघटनेने इराणच्या या कथित भूमिगत आण्विक केंद्राची प्रथम माहिती २००२ साली जाहीर केली होती.

यावर्षी जुलैमध्ये अमेरिकेतील 'इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ॲन्ड इंटरनॅशनल सिक्युरिटी' या संस्थेने नातान्झजवळ बोगद्यांची सुविधा असल्याचे पुरावे उपग्रह छायाचित्राद्वारे मिळत असल्याचे सांगितले.

याशिवाय आयोगाच्या निरीक्षकांना बॉंब बनविण्यायोग्य अतिसंपृक्त युरेनियमचे पुरावे इराणने दाखविलेल्या युरेनियम उत्पादन केंद्रांजवळ आढळले. तसेच एका इराणी प्रशासनविरोधी गटाच्या व्यक्तीने अमेरिकेला दिलेल्या लॅपटॉपमध्ये क्षेपणास्त्राच्या कोनचे नकाशे मिळाले. संपृक्त युरेनियम धातूपासून गोलाकार कवच कसे तयार करावे यासंबंधीचा एक दस्तऐवज इराणकडे अनेक वर्षे असल्याचे सिद्ध झाले. हे ज्ञान अण्वस्त्रनिर्मितीसाठी आवश्यक असते. या पुराव्यामध्ये तथ्य नाही; असे इराण म्हणतो.

यानंतर इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमातील एका वैज्ञानिकाचे भाषण पाश्चात्त्य राष्ट्रांच्या हाती लागले; या भाषणावरून हे स्पष्ट झाले की आंतरराष्ट्रीय दबावातून मार्ग काढण्यासाठी इराणने अण्वस्त्र कार्यक्रम तात्पुरता स्थगित केला आहे.

जहाल गटाचे अहमदेनिजाद निवडून आल्यानंतर २००६ साली पुन्हा अण्वस्त्र कार्यक्रम जोमात सुरू केला. युरेनियमचे संपृक्तीकरण प्लुटोनियमवरील काम शांततापूर्ण उपयोगासाठी असून कायदेशीर असल्याचे इराणचे म्हणणे आहे.

एका बाजूला अमेरिका व पाश्चात्त्य राष्ट्रांना हे पुरावे मिळत होते व दुसऱ्या बाजूला अहमदेनिजाद इस्रायलविरोधी जहाल वक्तव्ये करीत होते.

इस्रायलला जगाच्या नकाशावरून पुसून टाकणे आवश्यक आहे असे ते एकदा जाहीरपणे म्हणाले. तसेच आमच्या भूमीत इस्रायल कशाला? कॅलिफोर्नियात इस्रायल निर्माण करा असेही ते म्हणाले. अहमदेनिजाद स्वत: 'इराण रिव्हाल्युशनरी गार्ड' या पर्यायी लष्करी संघटनेचे सभासद होते. ते निवडून आल्यानंतर ही संघटना आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक सक्रिय झाली.

अफगाणिस्तान, इराक, लेबनॉन, पॅलेस्टिन येथील तालिबान, शिया पंथीय, सशस्त्र दले व पॅलेस्टाईनमधील हमास या कडव्या धार्मिक संघटनेच्या लढवय्यांना प्रशिक्षण देणे, पैसा व शस्त्रे पुरवणे असे उद्योग ही संघटना करते. असे पाश्चात्त्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

दक्षिण लेबनानमध्ये हेजबुल्ला या इराणच्या पाठिंब्याने लढणाऱ्या संघटनेने इस्रायलला जेरीस आणले. पकडलेले इस्रायली सैनिक सोडले नाहीतच, शिवाय आपल्या रॉकेट माऱ्याने इस्रायलला आपल्या वस्त्या रिकाम्या कराव्या लागल्या. या लढाईनंतर हेजबुल्ला व त्यांचे पुढारी यांचे वजन मध्यपूर्वेत खूप वाढले.

गाझा पट्टीतूनही हमास संघटनेचे सभासद इस्रायलमध्ये रॉकेटहल्ले करीत असतात. यामुळेच सध्या इस्रायल तेथे हवाई हल्ले करीत आहे. अशा प्रकारे इराण उत्तर व दक्षिण अशा दोन्ही बाजूने इस्रायलवर दबाव ठेवून आहे.

इराणची युद्धजन्य परिस्थिती कायम ठेवण्याच्या धोरणामुळे इस्रायली प्रशासन इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत फार चिंतीत आहे. इस्रायलचे परराष्ट्रखाते, त्याचे राजनितीतज्ज्ञ, अमेरिकेतील प्रभावी इस्रायली गट सतत व अतिशय जोमाने अमेरिका, युरोपियन राष्ट्रे, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून सतत इराणविरुद्ध दबाव बनविण्याच्या प्रयत्नाला लागलेले दिसतात.

गेल्या वर्षीच्या सरत्या डिसेंबर महिन्यातही सुरक्षा परिषदेच्या सदस्यांच्या खाजगी बैठका आयोजित करण्यात आल्या. त्याआधी युरोपियन संघाचे प्रतिनिधी सोलाना इराणी नेत्याना भेटले. अणुऊर्जा आयोगाने त्याआधी इराणशी चर्चा केली. या चर्चेमधून काहीही निष्पन्न झाले नाही. युरेनियम संपृक्तीकरण अथवा प्लुटोनियमवरील काम आपण कुठल्याही परिस्थितीत थांबवणार नाही असे इराणी परराष्ट्र मंत्र्यांनी स्पष्ट केले; परंतु सुरक्षा परिषद सदस्यांमध्ये तिसऱ्या फेरीचे अधिक कडक निर्बंध लादण्याबाबत एकमत होऊ शकले नाही. याचे कारण रशिया व चीनचा निर्बंध लादण्यास असलेला विरोध आहे. या दोन्ही राष्ट्रांकडे असलेला व्हेटोचा अधिकार हे आहे.

निरीक्षकांच्या मते याच परिस्थितीचा इराण गैरफायदा घेत आहे व त्यामुळे त्याला आपला अण्वस्त्र कार्यक्रम चालू ठेवता येत आहे.

पाश्चात्त्य जगतात नाताळच्या सुट्ट्या सुरू झाल्यामुळे इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमावरील चर्चा तात्पुरती बंद झाली. या सुट्ट्या संपल्या की या विषयावर पुन्हा चर्चा सुरू होईल. अमेरिका नवीन ठरावाचा मसुदा घेऊन सुरक्षा परिषद सदस्यांपुढे जाईल. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग व अरब जगतामध्ये अशी भावना आहे की अजूनही बराच वेळ आहे. वाटाघाटी व आर्थिक निर्बंध या मार्गाने इराणला रोखता येईल.

इराणचे प्रमुख नेते आयातुल्ला खोमेनी यांचा इराणच्या ताठा भूमिकेला पाठिंबा आहे, त्यामुळे इराणमधील नेमस्त गट सध्या निष्प्रभ ठरत आहे. त्यामुळे एकूणच हा प्रश्न सुटण्याची सध्या तरी लक्षणे नाहीत. उत्तर कोरियाप्रमाणे येथेही रशिया व चीनची भूमिका निर्णायक ठरणार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून हा प्रश्न सुटला नाही तर स्वत:चे निर्बंध घालण्याचा विचार पाश्चात्त्य राष्ट्रे करीत आहेत. अमेरिका, फ्रान्स व इस्रायल या प्रश्नावर आधीपासून आक्रमक भूमिका घेत असून त्यांनी युद्धाची भाषा केली आहे. त्यामुळे आता नाताळनंतर काय होते याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

**मुनीर सय्यद**
९०८, म.गांधी रस्ता, पनवेल, जि. रायगड ४१०२०६.

---

# लोकशाही समाजवादाची वाटचाल

*पृष्ठ १६ वरून)*

आहे. त्यांनी वारंवार नियंत्रित भांडवलशाही व नियंत्रित कामगार संघटना यांचे महत्त्व प्रतिपादन करत सोव्हिएत युनियन तसेच त्याच्या नियंत्रणाखालील पूर्व युरोपीय देश कसे घसरणीला लागले हे स्पष्ट केले आहे.

अनियंत्रित कामगार संघटना कशी वाताहत करतात, हे दाखवून देताना त्यांनी इंग्लंडचे उदाहरण नमूद करावे हे साहजिकच आहे. सत्तरीत इंग्लंडमधील कामगार संघटना मर्यादेबाहेर गेल्या. एकाच उद्योगातील निरनिराळ्या खात्यांच्या स्वतंत्र संघटना असत. त्या प्रत्येकाशी वाटाघाटी करणे हा एक उद्योग व्यवस्थापकांच्या मागे लागला. शिवाय एका खात्यातल्या संघटनेने संप केल्यास सर्व कारखानाही बंद पडणे शक्य असे. याखेरीज एका उद्योगात संप झाल्यास त्यास सहानुभूती म्हणून इतर कोणत्या उद्योगात संप होईल याचा नेम नव्हता. वाहतुकीचा संप हा सामान्य लोकांच्या सहनशक्तीचा अंत पाहणारा होताच, पण दफनभूमीतील कर्मचारी संपावर गेल्यामुळे जेव्हा अनेक मृतदेह दफन न होता तसेच ठेवून देण्याची वेळ आली, तेव्हा लोक बिथरले. या स्थितीत ब्रिटिश मध्यमवर्गीयांनीच नव्हे तर कामगारांच्या काही गटांनीही हुजूर पक्षास बहुमत मिळवून देऊन मार्गारेट थॅचर या पंतप्रधान झाल्या. त्याआधी व नंतरच्याही काळात मजूर पक्षास सत्तेवर असताना व नसताना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले याचे विवेचन ससून यांनी केले असून ते महत्त्वाचे आहे.

सोव्हिएत युनियनने सर्व अर्थव्यवस्था सरकारी नियंत्रणाखाली आणून राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य नष्ट केले. तुरुंगवास, हत्याकांड व वेठबिगारीचा अवलंब करणाऱ्या श्रमछावण्या यांचा अवलंब करण्यात आला. ससून यांनी म्हटले आहे की, या उपायांनी सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाने मागासलेला रशिया औद्योगिक युगात आणला तरी सर्वसाधारण लोकांच्या सामान्य गरजा भागवण्याच्या बाबतीत त्यास अपयश आले आणि स्वत:च्याच ओझ्याखाली सोव्हिएत युनियनचा डोलारा कोसळला. तसा तो कोसळल्यानंतर इंग्लंड व इतर काही युरोपीय देशांतल्या समाजवादी पक्षांनी राष्ट्रीयीकरणामुळेच सामान्य लोकांचे कल्याण साधले जाते हा आग्रह पूर्णत: सोडला आणि भांडवलशाही व कामगार संघटना यांना आटोक्यात ठेवण्याचे धोरण अवलंबिले. याचे चांगले परिणामही लगेच दिसून आले.

(अपूर्ण)

**गोविंद तळवलकर**
govindtalwalkar@hotmail.com

**चित्र आणि पट...**

# ‘थर्ड आय’ : आशियाई चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने...

**डॉ. श्रीकांत परळकर**

**नोव्हेंबर महिन्यात मुंबईत ‘थर्ड आय’ हा आशियाई चित्रपट महोत्सव पार पडला. तमिळ, कानडी, बंगाली, हिंदी या भाषेतील चित्रपटांशिवाय इराणी, चिनी, जपानी चित्रपटही या महोत्सवात प्रदर्शित झाले. या महोत्सवातील ‘पोएट ऑफ द वेस्टस्’ दिग्दर्शक मोहम्मद अहमदी (इराण) व ‘सायलेन्ट ऑनर’ दिग्दर्शक तनुज अनवर्तने (श्रीलंका) हे चित्रपट मला विशेष आवडले. अलीकडे प्रदर्शित झालेला ‘तारे जमीन पर’ या चित्रपटात अमीर खानची महत्त्वाची भूमिका असून, दिग्दर्शक म्हणून अमीरचा हा पहिलाच चित्रपट आहे. दिग्दर्शकांचे पहिले चित्रपट या दृष्टीने वरील तीन चित्रपटांविषयी थोडेसे...**

**चित्रपट : ‘सायलेन्ट ऑनर’**
(स्थानिक भाषेत- निराला गीरा)
दिग्दर्शक- **तनुज अनवर्तने,**
चित्रपट कथा- **योलांड विरसिंगे**

अंमली पदार्थांचा अवैध व्यापार व गुन्हेगारी यातून उभी रहात असलेली समांतर व्यवस्था श्रीलंकेस मोठी डोकेदुखी झालेली असल्यामुळे, या संघटित गुन्हेगारीविरुद्ध पावले उचलण्याची मोठी जबाबदारी कायदेमंत्री सालिया (रवींद्र रंडेनिया) यांच्यावर येऊन पडते. सालिया अत्यंत कार्यतत्पर मंत्री. आई, पत्नी राधा (नीना फर्नांडो), कुमारवयीन मुलगा अर्जुन असा त्याचा परिवार, कोलंबो जवळील उच्चभ्रू समाजात रहात असतो. घर सुखसोयींनी समृद्ध असते. परंतु फुरसत काढून पत्नीशी बोलणं किंवा कुटुंबासाठी वेळ देणे मंत्रीमहोदयांना शक्यच होत नसते. छोट्या अर्जुनचे अप्रतिम पियानो वादन मात्र राधाचे मन प्रसन्न करण्यास हातभार लावत असते.

श्रीलंकेत अंमली पदार्थ भूतान व नेपाळ येथून आणले जात असल्याने त्याविरुद्ध सार्क संघटनेच्या सहकार्याने परिणामकारक उपाययोजना करण्याच्या उद्देशाने कोलंबो येथे सार्क देशांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली जाते. या सरकारी हालचालीचा ड्रग्ज माफियांना सुगावा लागतो. बैठकीत देश-प्रतिनिधींची भाषणे झाल्यावर करारावर सह्या होण्यापूर्वी कायदेमंत्री सालिया भाषण देण्यासाठी उभे राहतात. ड्रग्ज माफियांनी आपली तयारी केलेली असते व समारंभ स्थळाजवळ दबा धरून बसलेला एक बंदूकधारी मारेकरी मंत्र्यावर नेम धरतो आणि चाप ओढतो. तेवढ्या क्षणात मुलगा अर्जुन सालियांना काहीतरी सांगण्यासाठी पुढे येतो. त्या मारेकऱ्याची गोळी त्याचा अचूक वेध घेते, अर्जुन तेथेच प्राण सोडतो.

कुमारावस्थेतील अर्जुनचा क्रूर हत्येचा राधाला साहजिकपणे जबरदस्त धक्का पोहोचतो. अर्जुनने शिक्षणातील हुशारी सोबतच पियानो वादनात विशेष नैपुण्य मिळवलेले असते. प्रोत्साहनाच्या दृष्टीतून राधाने अर्जुनच्या छंदात मनोमन रस घेतलेला असतो. तो जागतिक किर्तीचा पियानोवादक होणार हे त्या मातेचे स्वप्न असते. परंतु ते स्वप्नच राहते. राधाला या क्षणी अत्यावश्यक असलेला मानसिक आधार अगोदरच कामात व्यस्त असलेल्या सालियांकडून मिळणे शक्य नसते. शिवाय सासूकडून तसा आधार मिळण्याची शक्यता नसते. पुत्रवियोगाने निराश झालेल्या राधास आता आपले जगणे निरर्थक वाटू लागते. दिवसेंदिवस एकलकोंडी झालेल्या राधाची स्थिती दयनीय होत जाते. हवापालट, प्रवास या उपायांनी तिची मानसिक स्थिती काही केल्या सुधारत नाही.

मंत्री महोदयांच्या परिचयातील स्त्री. सिंथिया हे सर्व पाहून त्यांना मदत करण्याच्या बहाण्याने पुढे येते. राधाला पूर्ववत करण्याची ग्वाही मंत्रीमहोदयांना देऊन तिला आपल्यासोबत नेते. आीण एका इसमाशी ओळख करून देऊन ‘आजपासून हा तुझा डॉक्टर’ असे सांगून मार्को (सौम्य लियानगे) या अंमली पदार्थांचा धंदा करणाऱ्या बोगस डॉक्टरच्या ताब्यात राधाला देते. राधाला

प्रथम तो सिगरेटमधून अंमली पदार्थ देण्याचा खूप प्रयत्न करतो. ती त्यास विरोध करते. परंतु मार्को आपले प्रयत्न चालूच ठेवतो, अखेर राधा त्यास बळी पडते. अंमली पदार्थांच्या सेवनाने मन हलके झाल्याने तिला ते हवेहवेसे वाटू लागते. हळूहळू ती पूर्णत: व्यसनाधीन होते. अर्जुनची किंवा मंत्रीमहोदयांची आठवणही तिला येईनाशी होते. 'त्या' डॉक्टरच्या ती पूर्णत: अधीन होते, तो तिचा शरीर सुखासाठी व अंमली पदार्थ व्यवसायासाठी उपयोग करू लागतो. नाईट क्लब, डान्स पार्टी या ठिकाणी येत असलेली अंमली गिऱ्हाईके आता राधाच्या परिचयाची झालेली असतात. विक्रीचे अनेक व्यवहार तिच्यासमक्ष होऊ लागतात.

त्याचवेळी प्रखर टिकेचे लक्ष्य झालेल्या मंत्रीमहोदयांना अंमली पदार्थाच्या व्यवसायाविरुद्ध कडक मोर्चेबांधणी करणे क्रमप्राप्त होते. श्रीलंकेत अंमलीविरोधातील उपाययोजना वाढवली जाते. एकदा एका समुद्र किनाऱ्याच्या जवळ अंमलीपदार्थ विक्रीचा फार मोठ्या प्रमाणावर सौदा ठरत असतो, तेव्हा पोलीसपथकाची त्यावर धाड पडते. डॉक्टरच्या गाडीत अंमली साठा सापडतो व त्याच गाडीत राधाही असते. साहजिकपणे तिलाही अटक होते. गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असल्याने अटक झालेल्यांना मोठी शिक्षा होते, राधा मंत्र्यांची पत्नी असूनही तिला तुरुंगात पाठवले जाते.

तुरुंगात सुरुवातीला व्यसनापासून दूर राहणे राधाला कठीण जाते, तेथील जीवनशैली इतर कैदी यांच्याशी जुळवून घेताना राधाला कठीण जाते. आलेल्या नैराश्येमुळे ती जीव देण्याचा प्रयत्नही करते, तेव्हा दुसरी महिला कैदी राधाला वाचवते. दोघींच्यात एक स्वाभाविक जवळीक निर्माण होऊन दोघी एकमेकींचा आधार बनतात. त्या महिलेला असलेल्या लहान मुलीशी राधाचा परिचय होतो. तुरुंगात येण्यापूर्वी 'त्या' डॉक्टरला बळी पडलेल्या राधेत त्याचा वंश वाढत असतो. यातून होत असलेली सामाजिक टीका व घरातून आईकडून येत असलेले दडपण यापुढे नमून मंत्री राधेला कायदेशीर फारकत देऊन टाकतात. राधाही वैद्यकीय मदतीने आपली सोडवणूक करून घेते. राधाविषयी आपुलकी असलेल्या कैदी महिलेचा एकदा राग अनावर होतो व झटापटीत दुसऱ्या एका कैदी महिलेचा तिच्या हातून जीव जातो. तिला मृत्युदंडाची शिक्षा होते. फाशी जाण्यापूर्वी ती आपली मुलगी मातृत्वास पारखी झालेल्या राधाकडे सुपूर्द करते. थोड्याच महिन्यात राधाची शिक्षा संपून ती मैत्रिणीच्या मुलीसह तुरुंगाबाहेर येते. दिशाहीन राधा जायचे कुठे असा विचार करीत एका दिशेने चालू लागते. तोच लाल दिव्यांच्या मोटारींचा एक ताफा तिच्या मागून येतो व पुढे निघून जातो. ताफ्यातील एका गाडीत मंत्री सालिया आहेत, हे तिच्या लक्षात येताच ती सोबतच्या मुलीचा दंड पकडते व झटकन विरुद्ध दिशने चालायला सुरुवात करते व आत्मनिश्चयाने स्वावलंबनाची व सन्मानाची वाट निश्चित करते.

सुरुवातीस उच्चभ्रू राहणीतील आई राधा नंतर कल्पनेपलीकडच्या संकटात गुरफटते. म्हणून राधाच्या भूमिकेतील नीना फर्नांडोवर चित्रपट पाहताना अधिक लक्ष केंद्रित होते. तिने दोन्ही प्रकारच्या जीवनशैलीत लक्षात ठेवण्यासारखे काम केले आहे. रवींद्र रंडेनीयने उभा केलेला मितभाषी परंतु स्मार्ट मंत्री सालिया कमी वावर मिळूनही प्रभावी वाटला. ड्रगमाफिया (सौम्य लियानगे) आणि त्याची अतिउत्साही व महत्त्वाकांक्षी मैत्रीण सिंथिया यांचे जिवंत अभिनय प्रेक्षकांनाही चीड आणणारे वाटले. दिग्दर्शक म्हणून तनुज अनवर्तनेचा हा पहिलाच चित्रपट ९५ मिनिटांची आटोपशीर लांबी. नेमके संवाद, प्रसंगांची जिवंत उभारणी यामुळे विषय गंभीर असूनही चित्रपट शेवटपर्यंत लक्ष वेधून घेतो व मनाची कायम पकड घेत राहतो. यांचे श्रेय दिग्दर्शक तनुज अनवर्तनेकडे जाते.

**चित्रपट : 'पोएट ऑफ द वेस्टस्'**
(इराण)
दिग्दर्शक- **मोहम्मद अहमदी**

शिक्षित असूनही रस्ते झाडून व कचरा गोळा करणाऱ्या गाडीवर काम करून स्वत:चे पोट भरणाऱ्या स्वप्नाळू युवकांवर (फरझिन मोहदिस) 'पोएट ऑफ द वेस्टस्' हा चित्रपट आहे. घरांच्या दारापाशी ठेवण्यात येणाऱ्या पिशव्या हुडकताना त्याला एकदा फाडून टाकलेल्या कागदावर लिहिलेली पत्रं आढळतात. कधीकधी एका बंद घरातील दाढीवाल्या कवीबरोबर (मोहम्मद एसकंदारी) वार्तालाप करण्याची संधीही घेतो. तो कवी त्या झाडूवाल्या युवकावर खूष होऊन त्याला आपला काव्यसंग्रह भेट देतो. परंतु कपट्याच्या स्वरूपातील ती पत्रे मात्र त्याला स्वस्थ बसू देत नाहीत. ज्या घरापाशी ती पत्र मिळतात ते घरही शोधून ठेवतो. फुरसतीच्यावेळी इतरत्र वेळ न दवडता पत्रांचे कपटे जुळवून ती वाचण्याचा प्रयत्न करताना त्याला त्या पत्रामागील आशय, लिहिणाऱ्या व्यक्तीच्या भावना यांचा थोडाफार उलगडा होत जातो. अपघातात आपला प्रियकर गमावलेली एक दु:खी स्त्री परदेशात असलेल्या भावास पत्राद्वारे आपल्या अडचणी व व्यथा कळवते. इतके त्या युवकास समजते व त्याची त्या दु:खी स्त्रीशी भावनिक जवळीक उत्पन्न होते. प्रसंगी वेळात वेळ काढून तो नकळत तिच्यामागे सावलीप्रमाणे राहून तिच्याशी जवळीक साधल्याच्या समाधानात राहतो. परंतु तो प्रत्यक्ष तिला भेटत नाही, असे करताना तो थोडाफार अडचणीतही येतो, पण तो ती सहन करतो. त्या स्त्रीस भावाकडून व्यवस्थित प्रतिसाद मिळत नाही व तिला त्याच्याकडे जाण्यासाठी व्हिसाही मिळण्यास अडचणी येत आहेत, इतपत माहिती त्या युवकास मिळते. म्हणून तिला दिलासा मिळावा यासाठी भावाच्या नावाने पत्रं लिहून ती त्या स्त्रीच्या लेटर बॉक्समध्ये सरकवतो व ती पत्रे घेते याची लांब उभा राहून खात्री करतो. शक्यतो ती दु:खी-कष्टी

राहू नये याकरता तो जमेल तसे प्रयत्न तिच्या अपरोक्षपणे करत राहतो.

दुसरीकडे त्या दाढीवाल्या कवीकडून कचरा मिळाला नाही किंवा त्याचे दर्शनही झाले नाही, म्हणून त्याला राहवत नाही. शिडीने तो कवीच्या घरात शिरतो तर तेथे कवी मृतावस्थेत आढळतो. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांच्या मथळ्यात त्याच कवीचा फोटो त्याला सर्वत्र दिसतो आणि एका प्रसिद्ध कवीशी आपला परिचय होता याचे समाधान त्या युवकास वाटते.

संपूर्ण चित्रपटातील घटना एकाच रस्त्याच्या जवळपास किंवा त्या युवकाची झोपडीवजा खोली येथे घडताना दिसतात. असे असूनही युवकाची स्वगते व त्याच्या कल्पना यामुळे कुठेही कंटाळवाणे वाटत नाही. निरागस चेहरा, हळुवारपणा, स्वत:शी पुटपुटणे यांच्याद्वारे फरझिन या कलाकाराने उभा केलेला युवक पाहताना भडकपणा जाणवत नाही. मोहम्मद अहमदीने दिग्दर्शित केलेल्या या पहिल्याच चित्रपटाचे दिग्दर्शन सुरेख आहे.

**चित्रपट : 'तारे जमीन पर'**

(अमीर खान प्रॉडक्शन्स)

दिग्दर्शक- **अमीर खान,**

लेखक- **अमोल गुप्ते**

घोड्याच्या शर्यतीत घोडे जलद पळवून जिंकण्याची इर्शा आणि आपल्या पाल्यावर अभ्यासाचे मानेवरल्या 'जू'प्रमाणे सतत टेन्शन ठेवून, त्याच्याकडून टक्केवारीची अपेक्षा करणे यात तसा फरकच राहिलेला नाही. स्वीकारलेल्या शिक्षणपद्धतीचे आपण बळी ठरत आहोत, हे खरे असले तरी विद्यार्थ्यांवर काय अन्याय होत असेल याचा विचार सर्वसाधारणत: केला जात नाही हेही तितकेच सत्य.

इशान असाच एक नऊ वर्षीय शाळकरी विद्यार्थी. त्याचा मोठा भाऊ शिक्षणात ठीक, पण इशानची लक्षणे मात्र अगदी वेगळी. वर्गात शिक्षक शिकवत असताना तो स्वत:चे लक्ष इतरत्र भिरभिरवतो. पुस्तकातील शब्द त्याच्यापुढे तरंगतात. वाचताना शब्दांचे अर्थ तो इतके विचित्र लावतो की शिक्षिका त्याच्यावर नेहमी संतापतात. परंतु इशानला त्याची गंमत वाटते. 'तीन नव्वे किती' विचारले तर तो नजरेसमोर नवग्रह आणून उत्तर सांगण्याचा प्रयत्न करतो. शिक्षणात त्याचे डोके असे भलतीकडे भन्नाट चालते. शिकवलेले समजण्याच्या क्षमतेचा अभाव इशानमध्ये असला तरी त्याच्यापाशी काही चांगले कलात्मक गुणही आहेत, दुर्दैवाने त्याकडे शिक्षकांचे, महत्त्वाकांक्षी पालकांचे दुर्लक्ष होऊन इशानचा कोंडमारा होतो.

शाळेच्या कोंडमाऱ्यातून सुटका करून घेण्याकरता एकदा शाळेला दांडी मारून मुंबईच्या रस्त्यावरून स्वच्छंदपणे भटकायचे तो ठरवतो, असे करण्याने त्याची शाळेतील रागीट शिक्षक व हेटाळणी करणारे मित्र यांच्यापासून सुटका होते. रस्त्यावर काढलेली चित्रे, मोकळेपणे खेळणारी मुलं, गाडीवर मिळणारा बर्फाचा गोळा यांचा अनुभव घेता येतो. बापाच्या खांद्यावर बसून बर्फाच्या गोळ्याची मजा चाखणारा मुलगा पाहून इशानला अप्रूप वाटते. शाळा बुडवून इशानने केलेली भटकण्याची बंडखोरी पाहून त्याचे वडील (बिपिन शर्मा) नाराज होतात, आणि त्याला पाचगणीच्या बोर्डींग स्कूलमध्ये दाखल करतात. इशानच्या विरोधाकडे ते दुर्लक्ष करतात.

बोर्डींग स्कूलमध्ये ठेवूनही इशानमध्ये काहीही सुधारणा होत नाही. अभ्यासात दुर्लक्ष झाल्याने त्याची वारंवार हजेरी घेतली जाऊन शिक्षाही होते. परंतु प्रगती होण्याची काहीच लक्षणे दिसत नाहीत. एकदा इशानच्या शाळेत आलेल्या राम शंकर निकुंभसरांचे इशानकडे लक्ष जाते. इशानप्रमाणेच समस्येत अडकलेल्या मुलांच्या शाळेत असल्याने इशानची 'ही' समस्या त्यांना नेमकी समजते. त्याच्यातील वैगुण्ये न पाहता, त्याच्यातील सुप्त गुण व त्याची कला याकडे ते आग्रहाने पाहतात आणि त्याचे चित्रकलेतील नैपुण्य पाहून ते भारावतात. चित्रकला, आवाज व इतर क्लृप्त्या योजून निकुंभसरांचे इशानला शिकवणे सुरू होते. अर्थातच ते बोर्डींग स्कूलच्या अनुमतीने, अशा पद्धतीच्या शिकवणीने इशानला अभ्यासात गोडी लागते व तो व्यवस्थित प्रगतीपथावर येतो. इशानची बंडखोरी निवळून त्याला निकुंभसर फार प्रिय वाटू लागतात.

अधिकाधिक गुण मिळवण्याकरता कोवळ्या व अजाणत्या पाल्यावर आणली गेलेली दडपणे, शिक्षेचा जाच, पालकांच्या पाल्याविषयी अवास्तव अपेक्षा या सर्वत्र आढळणाऱ्या समस्यांचा निकुंभसरांच्या भूमिकेतून अमीर खानने 'तारे जमीन पर' चित्रपटात अतिशय सूक्ष्मपणे वेध घेतला आहे. संवेदनशील मनाच्या विद्यार्थ्यांना आत्मीयतेने हाताळताना निकुंभसरांचा हळुवारपणा लक्षात राहतो. विशेष म्हणजे स्वत: प्रथमच दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात अमीर खानची भूमिका मनावर ठसा उमटवणारी आहे. परंतु इशानने प्राप्त केलेले उत्तम गुण दाखवले गेल्याने प्रेक्षकांच्या मनात स्वाभाविकपणे गोंधळ उडतो.

दर्शीलने मनापासून उभा केलेला इशान इतका परिणामकारक आहे व त्यालाच चित्रपटाचा नायक म्हणावेसे वाटते. तीन नव्वे हे गणित सोडवताना इशानचे मन ग्रह-ताऱ्यांत भरकटून पृथ्वी व प्लुटोसमोर येणे हा प्रसंग ॲनिमेशन तंत्राद्वारे पडद्यावर आणल्याने परिणाम साधला गेला आहे. ते पाहताना गंमत येते. बोर्डींग स्कूलच्या प्रसंगापर्यंत चित्रपट मनावरची पकड सोडत नाही. परंतु पुढे एकंदर चित्रपट लांबत चाललाय असे जाणवते, त्यामुळे तो शेवटपर्यंत पाहताना चुळबुळ टाळावी म्हटली तरी टाळता येत नव्हती. शंकर अहसान यांचे पार्श्वसंगीत चित्रपटाचा मूड सांभाळण्यात हातभार लावणारे आहे.

छोट्यांचा असूनही मोठ्यांना विचार करायला लावून त्यांना जमिनीवर आणणारा हा चित्रपट!

**डॉ. श्रीकांत परळकर**
५१, अ.गोखले रोड, (उत्तर), दादर,
मुंबई ४०००२८.

चर्चा-मंथन

स. ह. देशपांडे

*उत्तरार्ध*

# 'हिंदुत्ववाद- एक फेरमांडणी' : प्रतिक्रियांना उत्तरे

११. माझे विधान– 'मानवनिर्मित कायद्याखाली राहण्याची मुसलमानांची तयारी नाही; त्यांना कायदा हवा तो शरियतचा.' यावर जमादारांची टीका अशी की, ९८% कायदे सर्वांना समान आहेत; आणि मुसलमानांचा जसा वेगळा कायदा आहे तसा हिंदूंचा आणि ख्रिश्चनांचाही आहे.

'९८%' हे अतिशयोक्त विधान आहे. पण तो मुद्दा आपण सोडून देऊ. मुख्य गोष्ट अशी की, मुस्लिमांची मनातून निष्ठा अल्लानिर्मित कायद्यावर असते. भारतात जे कायदे समान आहेत, ते ते नाइलाज म्हणून पाळतात आणि ते कायदे मुख्यत: इंग्रज सरकारने केलेले आहेत.

सर्व धार्मिक गटांचे वेगवेगळे कायदे आहेत हीच तर अडचण आहे. सर्वांना शंभर टक्के कायदा समान असला पाहिजे. पण वैयक्तिक कायदा समान असण्याला मुस्लिमांचा विरोध आहे.

जमादारही वैयक्तिक कायद्याच्या 'सुधारणे'बद्दल बोलतात; समान वैयक्तिक कायद्याविषयी बोलत नाहीत!

भारताची राज्यघटना व कुराण यांत विरोध आला तर काय श्रेष्ठ मानणार ही राष्ट्रनिष्ठेची खरी कसोटी आहे.

१२. मी लोकशाही व धर्मनिरपेक्षतेबद्दल 'तोंडदेखले' बोलतो आणि 'देशाच्या विकासामध्ये ओबीसी, बहुजन समाज, मागासवर्गीय व धार्मिक अल्पसंख्यांक यांच्या वाट्याबद्दल चकार शब्दही' बोलत नाही, असे जमादारांचे म्हणणे आहे.

धार्मिक अल्पसंख्यांक, विशेषत: मुस्लिम व हिंदू मागासवर्गीय आणि ओबीसी यांमध्ये मुळात फरक आहे. मागास आणि ओबीसी यांचा प्रश्न हिंदू समाजाने त्यांना संधी नाकारल्यामुळे उत्पन्न झालेला आहे आणि मुस्लिमांचा विकासात वाटा कमी आहे, तो प्रामुख्याने त्यांनी स्वत:च्या पायावर धोंडा पाडल्यामुळे आणि संधीचा फायदा न घेतल्यामुळे निर्माण झालेला आहे– मग सच्चर समिती हवे ते म्हणो. धार्मिक रूढी आणि हटवाद यांच्या मिश्रणातून मुख्यत: मुस्लिम मागासलेपणाचा जन्म झालेला आहे. स्त्रियांचे कनिष्ठ स्थान, पडदा, तोंडी तलाक, निरक्षरतेचे जास्त प्रमाण, संततिनियमनाच्या अभावामुळे पोरवडा, त्यातून दारिद्र्य, शिक्षणासाठी मदरशांमधल्या धार्मिक शिक्षणावर भर, आधुनिक शिक्षणाकडे दुर्लक्ष, उर्दूचा आग्रह इत्यादी घटकांचा तो समुचित परिणाम आहे.

१३. माझे विधान– 'हिंदूंवर हिंदू म्हणून होणारे अन्याय हे मुसलमानांवर आणि ख्रिश्चनांवर होणाऱ्या अन्यायांपेक्षाही अधिक आहेत तरी ते दुर्लक्षित राहिले आहेत.'

जिहादचा धोका मुसलमानांना नाही, तो हिंदूंना आहे. त्यामागे एक धर्मतत्त्व आहे. गुजरातमधील मुसलमानांवरील अत्याचार घृणास्पद आहेत, पण खिलाफतीच्या काळात मोपला मुसलमानांनी केलेले हिंदूंचे हत्याकांड अधिक हिंस्र होते आणि हिंदूंनी मुसलमानांवर जे अत्याचार केले त्यामागे धर्माज्ञा नाही.

जिहाद खरे म्हणजे सुरू झालेलाच आहे. 'जम्मू-काश्मीरमध्ये १९८९ पासून सुमारे १५ हजार नागरिक आणि ५५० जवान मृत्युमुखी पडले आहेत. गेल्या वीस-बावीस वर्षांत भारतात सुमारे ६५ हजार हत्या झाल्या आहेत. भारताच्या मर्मस्थळांवर झालेल्या हल्ल्यांची आठवण करायची तर १९९३ सालचे मुंबईचे साखळी बाँबस्फोट, ऑक्टोबर २००१ मधील जम्मू-काश्मीर विधानसभेवरचा हल्ला, डिसेंबर २००१ मध्ये भारताच्या लोकसभेवरचा हल्ला, जानेवारी २००२ मध्ये कलकत्त्याच्या अमेरिकन सेंटरवर, सप्टेंबर २००२ मध्ये गुजरातमधल्या अक्षरधाम मंदिरावर झालेले हल्ले, २००२ मध्येच जम्मूमधील रघुनाथ मंदिरावरचा हल्ला, ऑगस्ट २००३ मध्ये मुंबईत गेटवे ऑफ जव्हेरी बाजार येथे झालेले बाँबस्फोट, नंतरचे घाटकोपरचे स्फोट इत्यादींचा उल्लेख करावा लागेल.' हे लिहिल्यानंतरच्या काळात मुंबईत लोकल रेल्वेमध्ये एकाच वेळी अनेक डब्यात झालेले स्फोट, मालेगावचा आणि हैदराबादचा स्फोट यांची भर घातली पाहिजे. राज्ययंत्रणा खिळखिळी करणे हाही एक या हल्ल्यांमागचा एक उद्देश आहे.

ख्रिश्चन संकटाबद्दल मधु वाणी म्हणतात की, 'ईशान्येकडे ज्या चळवळी सुरू आहेत, त्या धार्मिक चळवळी नाहीत' मुद्दा तो नाही, फुटीरपणाचा आहे. अलीकडच्या २००१ शिरगणतीप्रमाणे नागालँडमध्ये सुमारे ९० टक्के, मिझोराममध्ये सुमारे ८७ टक्के व मेघालयमध्ये सुमारे ७०% लोक ख्रिस्ती झाले आहेत. ईशान्येकडच्या सर्व राज्यांमध्ये ख्रिश्चनीकरण स्वातंत्र्यकाळातले आहे.[८]

या सर्व सहा राज्यांमध्ये ख्रिश्चनांची लोकसंख्या १९९१ साली ३९ टक्के होती. ती २००१ साली ४५ टक्के झाली. म्हणजे ख्रिश्चनीकरण वेगाने चालू आहे. ख्रिस्ती मिशनरी करीत असलेली धर्मांतरे प्रलोभनातून (इंड्यूसमेंट) आणि लबाडीतून (फ्रॉड) होतात, याबद्दल १९५१ सालच्या मध्यभारत काँग्रेस शासनाने नेमलेल्या नियोगी कमिशनच्या काळापासून तक्रारी करण्यात येत आहेत.

यापुढचा मोठा धोका म्हणजे राष्ट्रविरोधी कृत्यांचा आहे, तसा इतिहासही आहे. इंडोनेशियाचा ईस्ट टिमोर हा प्रदेश ख्रिस्ती झाल्यामुळे त्याचे वेगळे राष्ट्र झाले. श्रीलंकेत तमिळवाद्यांना ख्रिस्त्यांचा पाठिंबा आहे. भारताच्या फाळणीला ख्रिश्चनांचा पाठिंबा होता आणि फाळणीच्या वेळी मुस्लिम लीग व ख्रिस्ती धर्मसंस्था यांचा समझोता होऊन छोटा नागपूर आणि ईशान्य भागात एक ख्रिस्तीस्तान उभारावे असा मनोदय होता.

व्हॅटिकनमधील ख्रिस्ती धर्मपीठ गोवामुक्तीला प्रतिकूल होते.[९]

नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅंड ही एक दहशतवादी संघटना असून तिची कार्यालये न्यूयॉर्क, जिनिव्हा आणि हेगमध्ये आहेत, याचा अर्थ काय होतो?[१०]

लेखाचा विस्तार वाढत चालला आहे. तेव्हा वाचकांपैकी या विषयाचा अभ्यास करू इच्छिणारी जी मंडळी आहेत, त्यांना मी विनंती करतो की माझ्या धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीतून हिंदुत्व विचाराची फेरफांडणी (राजहंस, पुणे, २००६) या पुस्तकातली मुस्लिम संकट व ख्रिश्चन संकट यांची चर्चा करणारी पृष्ठे ६ ते २४ वाचावीत. वरचा उतारा याच पुस्तकातून घेतला आहे.

१४. मधु वाणी यांनी शांतपणे माझा लेख पुन्हा वाचला तर त्यांच्या लक्षात येईल की, लोकसंख्येबाबत अतिरंजित विधाने मी केलेली नाहीत. २०२५ साली किंवा २०५० साली मुसलमान बहुसंख्य होतील किंवा चार बायका करण्याची त्यांना अनुज्ञा असल्यामुळे त्यांच्या वाढीचा वोग हिंदूंच्या वाढीच्या वेगापेक्षा मोठा आहे असे मी कुठेही म्हटलेले नाही. (एकूणच माझी मांडणी संघाच्या मांडणीपेक्षा वेगळी आहे, सावरकर आणि गोळवलकर यांची मांडणीही एक नाही ह्या गोष्टी मधु वाणी लक्षात घेत नाहीत.)

मुस्लिम लोकसंख्येचा प्रश्न मुस्लिम संकटाच्या पार्श्वभूमीवर पाहिला पाहिजे. भारतातले सर्वजण राष्ट्रवादी आणि धर्मनिरपेक्ष झाले, भारतातल्या राज्यसंस्थेची धर्मनिरपेक्षता निर्दोष झाली आणि सर्वांनी मनापासून ती मान्य केली तर माझ्या मते कुणाचीही लोकसंख्या कितीही वाढो किंवा कमी होवो, मला त्याची (वाणी यांच्या शब्दात) 'चिंता' असणार नाही.

१५. स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी व बालविवाह हे हिंदू 'धर्मा'वर नसून 'समाजा'वर असलेले कलंक आहेत, अशी सुधारणा वाणी यांनी केली आणि हिंदू धर्म सर्व धर्मात क्रूर आहे हे वाक्य त्यांनी गाळून टाकले, तर त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. सर्वच धर्म कमीजास्त प्रमाणात क्रूर होते आणि आहेतही. मात्र त्यांच्या क्रौर्याचे प्रकार वेगवेगळे आहेत.

मात्र हिंदूंच्या लोकसंख्यावाढीचा वेग स्त्रियांवरील अत्याचारांमुळे मुसलमानांपेक्षा कमी आहे असे त्यांना सुचवायचे असेल तर ते बरोबर नाही. अगदी १८८१ सालच्या पहिल्या खानेसुमारीपासून आजपर्यंत दर दशकात मुसलमानांच्या वाढीचा दर हिंदूंच्या दरापेक्षा जास्त राहिला आहे, याचे महत्त्वाचे कारण मुस्लिम स्त्रियांना एकूण प्रजोत्पत्ती दर (टोटल फर्टिलिटी रेट) हिंदू स्त्रियांच्या दरापेक्षा मोठा आहे आणि अलीकडच्या काळात संततिनियमनाला मुस्लिम स्त्रियांचा प्रतिसाद कमी आहे.

तुलनात्मक लोकसंख्यावाढीच्या संदर्भात जमादार यांनी चलाखी करण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणण्यापेक्षा त्यांचे गणित चुकले आहे असे म्हणणे अधिक न्यायाचे होईल. १९८१ ते १९९१ आणि १९९१ ते २००१ या काळात हिंदूंच्या वाढीचा वेग २२.७ टक्क्यांवरून १९.९ टक्क्यांपर्यंत कमी झाला व मुस्लिम वाढीचा वेग त्याच काळात ३२.९ टक्क्यांवरून २९.५ टक्क्यांपर्यंत कमी झाला. याची नीट टक्केवारी काढली तर हिंदूंच्या वाढीचा वेग १२.३४ टक्क्यांनी कमी झाला व मुसलमानांच्या वाढीचा वेग १०.३४ टक्क्यांनी कमी झाला असे दिसून येईल. मुसलमानांच्या वाढीचा वेग हिंदूंच्या वाढीच्या वेगापेक्षा मोठा आहे हा जमादार यांचा निष्कर्ष चूक आहे.

१६. भारतीय मुसलमान 'आर्यांप्रमाणे' बाहेरून आलेले नाहीत, त्यांपैकी ९८ टक्के येथलेच मूळ निवासी आहेत आणि मुस्लिम समाजात अधिक समता असल्यामुळे (स्वयंस्फूर्तीने) धर्मांतरित झालेले आहेत असे जमादार म्हणतात. आर्य बाहेरून आले हा सिद्धांत आज सर्वमान्य नाही आणि इस्लाममध्ये शंभर टक्के समता आहे हेही खरे नाही.

जगातील कुठलाही समाज हिंदूंच्या इतका विषम नाही हे मला मान्य आहे. मात्र सगळीच धर्मांतरे स्वयंस्फूर्तीने झाली हे खरे नाही.

१७. '...तो इथलाच मूळ निवासी आहे. त्यामुळे इतर सर्व भारतीयांप्रमाणे त्याचाही भारतावर तितकाच अधिकार आहे' इति जमादार.... यात एक अडचण आहे आणि जमादारांना ती (वर उल्लेखिलेल्या इतर अनेक गोष्टींप्रमाणे) माहीत असावयास हवी. ज्यांचे हिंदू पूर्वज नरकात खितपत पडलेले आहेत त्या पूर्वजांबद्दल आणि त्यांच्या भूमीबद्दल मुसलमानांना कसे प्रेम वाटणार? (प्रत्यक्ष प्रेषितांची आई आणि चुलते मुसलमान नसल्यामुळे नरकात आहेत. प्रेषितांना अल्लाकडून संदेश येण्यापूर्वी निवर्तलेला मुलगाही नरकात.) शिवाय दार-उल-हरबची संकल्पना.

तरीही मुस्लिमांबरोबर सहजीवन अपरिहार्य आहे असे माझे मत मी मूळ लेखात मांडले आहे.

'भारतात मुस्लिम आहेत आणि ते इथेच राहणार आहेत, ही वस्तुस्थिती हिंदुत्ववाद्यांनी एकदाची स्वीकारली पाहिजे. घटनेने ज्याप्रमाणे लोकशाही स्वीकारली आहे, तशीच धर्मनिरपेक्षताही स्वीकारली आहे. ही धर्मनिरपेक्ष लोकशाही टिकवून ठेवण्यातच भारताचे राष्ट्रहित सामावले आहे,' हे जमादार यांचे म्हणणे मला शंभर टक्के मान्य आहे. असे असताना 'हिंदुराष्ट्रा'चा वास त्यांना कुठून आला? वाणींनाही तोच प्रश्न विचारला पाहिजे.

साधनाच्या हीरकमहोत्सवी विशेषांकात (तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी : सामर्थ्य व मर्यादा) प्रा.स.ह.देशपांडे यांचा 'हिंदुत्ववाद : एक फेरमांडणी' हा लेख आम्ही प्रसिद्ध केला होता. त्या लेखावर गेल्या चार महिन्यात अनेक प्रतिक्रिया 'साधना'कडे आल्या. त्यातल्या काही जशाच्या तशा, तर काही संपादित करून प्रसिद्ध केल्या. चार-पाच प्रतिक्रिया मात्र प्रसिद्ध करता आल्या नाहीत. याचे कारण आशयाची पुनरावृत्ती किंवा जागेची मर्यादा हेच आहे. त्या सर्व प्रतिक्रियांना सविस्तर उत्तर देणारा स.ह.देशपांडे यांचा हा लेख प्रसिद्ध करून, या विषयावरील वाद-संवाद आम्ही आता थांबवीत आहोत. प्रा. स.ह.देशपांडे यांचे व त्यांच्या लेखावर प्रतिक्रिया देणाऱ्या सर्व संबंधितांचे आभार.

**—संपादक 'साधना'**

१८. 'पाकिस्तान व बांगला देशात जे मुस्लिमेतर आहेत, ते तिथे आजही सुखासमाधानाने जगत आहेत,' असे जमादार म्हणतात. पुढील आकडेवारी त्यांच्या 'सुखा-समाधाना'ची थोडीशी कल्पना देईल. फाळणीपूर्वीच्या आजच्या पाकिस्तानच्या प्रदेशात १९४१ सालच्या शिरगणतीप्रमाणे हिंदूंची लोकसंख्या जवळजवळ वीस टक्के होती. ती आता (२००१) दोन टक्क्यांहून कमी आहे. आजच्या बांगला देशात जो प्रदेश होता, त्यात हिंदूंची लोकसंख्या १९४१ साली सुमारे तीस टक्के होती आज (२००१) ती सुमारे दहा टक्के आहे. पाकिस्तानने अल्पसंख्यांचा प्रश्न कसा 'सोडविला' याचे हमीद दलवाई यांनी पस्तीस वर्षांपूर्वी केलेले वर्णन जमादार यांनी वाचावे.[११] बांगला देशाच्या संदर्भात तस्लिमा नसरीन यांनी केलेले हिंदूंच्या हलाखीचे वर्णन जमादारांनी वाचले नसावे.

१९. प्रदीप देशपांडे यांच्या लेखात मधु वाणी यांच्याप्रमाणेच त्यांचा संताप व्यक्त झाला आहे. फरक एवढाच की वाणी यांच्या लेखात काही युक्तिवाद करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे प्रदीप देशपांडे यांच्या लेखाचा वेगळा विचार करण्याची गरज नाही. रमेश आगाशे यांचे एक विधान असे आहे... 'भारतीय इस्लाम धर्मीयांनी देशनिष्ठेला धर्मनिष्ठेपेक्षा वरचे स्थान देऊन धर्मविचाराने देशाशी गद्दारी करणार नाही, हे आपल्या वागणुकीतून दाखवून द्यावे ही शिवसेनेची मागणी अवास्तव असे म्हणता येत नाही...' हे विधान त्यांच्या त्याअगोदरच्या मांडणीवर काटच मारणारे आहे.

**समारोप**

समारोपादाखल दोन मुद्दे मांडून हा बराच लांबलेला लेख पुरा करतो.
अ. मूळ समस्या मुसलमानांच्या धर्माचे, इस्लामचे खरे स्वरूप काय आहे याच्या आकलनाविषयीची आहे. हे आकलन एकदा झाले म्हणजे भारतीय मुसलमानांचा एवढेच नव्हे, तर जगातल्या मुस्लिम समाजाचा इतिहास आणि वर्तमानातली त्यांची वागणूक यांचा पट उलगडतो.

काही अपवाद वगळता हा इस्लाम समजून घेण्याचा हिंदूंनी प्रयत्न केला नाही. सावरकर, सावरकारांपेक्षा जास्त सूक्ष्मपणे इस्लामची चिकित्सा करणारे आंबेडकर, शहा, कुरुंदकर आणि दलवाई यांनीही इस्लामवर स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही. गेली जवळजवळ आठशे-नऊशे वर्षे हिंदू आणि मुसलमान एकत्र राहत असूनसुद्धा या अवधीत शेषराव मोरे हेच बहुधा पहिले हिंदू असावेत की ज्यांनी ७५० हून अधिक पृष्ठांचा इस्लामवरील ग्रंथ लिहिला. त्यांनतर पहिल्या चार खलिफांवर पुस्तक लिहून इस्लामच्या इतिहासाला आता त्यांनी प्रारंभ केला आहे.[१२]

जोपर्यंत भारतीय विचारवंतांचे लक्ष या विषयाकडे जात नाही, इस्लाम हा अभ्यासाचा आणि चर्चेचा विषय होत नाही, तोपर्यंत माझ्यासारख्या लेखकाला 'मुस्लिमद्वेष्टा', 'हिंदू-मुस्लिम समाजात फूट पाडणारा' इत्यादी आरोप सोसावे लागणार. जमादार यांनी मी 'घटनाद्रोह' केला आहे असे म्हटले आहे. सुदैवाने मला साधनामधल्या टीकाकारांनी 'देशद्रोही' म्हटलेले नाही. (पण भा.ल.भोळे यांनी माझ्या लेखनाला एके ठिकाणी 'देशद्रोही' असे म्हटलेले आहे.)

आ. ही दूषणे मला मिळतात याचे आश्चर्य नाही. मला आश्चर्य वाटते ते हुसेन जमादारांचे. प्रत्येक मुसलमान कुराण वाचतो असे नाही, त्यामुळे त्यांनी कुराण वाचलेले नसावे अशी शक्यता आहे. पण ज्याचे कार्य ते गेली पस्तीस वर्षे करीत आहेत असे अभिमानाने सांगतात, त्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांनी काय लिहिले आहे, हे त्यांना माहीत नसावे किंवा आजच्या त्यांच्या (जमादारांच्या) भूमिकेला गैरसोयीचे आहे म्हणून बाजूला ठेवावे, ही मात्र धक्का देणारी गोष्ट आहे.

जमादारांचे सगळे मुद्दे असगरअली इंजिनियर, रफीक झकेरिया, ए.जी.नूराणी या तथाकथित 'पुरोगामी' मुस्लिम विचारवंतांसारखेच आहेत. या विचारवंतांना धर्मनिष्ठ मुस्लिमांना दुखवायचे नसते, कुराणाकडे आणि हदीसकडे चिकित्सक नजरेने पाहायचे नसते म्हणून इस्लामी धर्मग्रंथांचा 'उदार' आणि आधुनिक काळाला उचित असा अर्थ लावण्यात (किंवा त्यांवर लादण्यात) ते आपले चातुर्य पणाला लावीत असतात. तीच गत जमादारांची झालेली आहे.

मी प्रारंभापासून मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा सहानुभूतीदार आहे आणि यथाशक्य त्याला मदतही केलेली आहे, हे जमादारांना माहीत आहे. माझ्या मते जमादारांची आजची भूमिका मंडळाच्या भूमिकेला छेद देणारी आहे.

**स. ह. देशपांडे**
सी-२८, गंगाविष्णू संकुल, प्रतिज्ञा हॉलसमोर,
कर्वेनगर, पुणे ४११०५२
फोन : ०२०-२५४३४८२९

■

**रा.स्व. संघाचा सर्वांगांनी विचार करून लिहिलेले, संघाच्या स्थापनेपासून गुजराथच्या दंगलीपर्यंतच्या इतिहासाचे तसेच संघ परिवाराची जातकुळी कोणती आहे याचे थोडक्यात विश्लेषण असलेले 'साधना प्रकाशना'चे पुस्तक :**

## मुखवट्यामागचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**लेखक : मधु वाणी ● किंमत : रु. ८०/-**



क्रीडांगण...

शरद कद्रेकर

**क्रिकेटच्या खेळात रोबोसारखा यांत्रिकपणा परवडण्यासारखा नाही, त्यातील मानवी अंग (ह्युमन एलिमेंट) नष्ट करून चालणार नाही, ते टिकायलाच हवे. क्रिकेटधुरिणांनी ही बाब लक्षात ठेवायला हवी, पण अधिकाधिक बिनचूक निर्णयांसाठी आधुनिक यंत्रसामुग्रीचा उपयोग अटळ आहे. वारंवार होणाऱ्या पंचांच्या चुकांमुळे रंगाचा बेरंग होऊ शकतो, याची प्रचिती सिडनी कसोटीत आली.**

# क्रिकेटच्या निर्णयप्रक्रियेत तंत्रज्ञानाची मदत हवी

क्रिकेट हा जंटलमन्सचा गेम समजला जात असे, पण आता तो तसा राहिलेला नाही. या खेळात प्रचंड पैसा आला, मॅचफिक्सिंगचे ग्रहण त्याला लागलं आणि हा खेळ बदनाम झाला. त्रयस्थ पंच, सामनाधिकारी यांच्या जमान्यात, प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात, चुकीच्या निर्णयांमुळे वाद वाढत चालले असून कटुता, वितुष्ट येण्याचे प्रसंग वारंवार घडत आहेत. खेळाच्या निकोप वाढीसाठी ही बाब हानीकारक आहे.

भारतीय संघ ऑस्ट्रेलियात असून गावस्कर-बॉर्डर करंडकासाठी दोन्ही संघात निकराची झुंज अपेक्षित होती. पण मेलबर्नच्या सलामीच्या कसोटीत भारतीय संघाने चौथ्या दिवशीच पांढरे निशाण दाखवले. नूतन वर्षात सिडनीत दुसऱ्या कसोटीला सुरुवात झाली. सिडनीच्या खेळपट्टीचा भारताला धार्जिणी असा लौकिक आहे. १९४७-४८च्या दौऱ्यात इथेच डॉन ब्रॅडमनसारख्या महान फलंदाजाचा विजय हजारेंनी अवघ्या १३ धावांवर त्रिफळा उडवला, तसेच भारताने कांगारूंवर पहिल्या डावात आघाडी घेतली ही आठवण आजही ताजी वाटते. अनिल कुंबळेच्या भारतीय संघाकडून क्रिकेट चाहत्यांना मोठ्या अपेक्षा होत्या, पण मेलबर्नच्या अपयशी सलामीनंतर सिडनीतही पराभवाची आफत भारतावर ओढवली आणि बरोबरी ऐवजी ०-२ची पिछाडी भारताच्या नशिबी आली.

सचिन तेंडुलकर, अनिल कुंबळे, राहुल द्रविड, सौरभ गांगुली, लक्ष्मण हे अव्वल पाच खेळाडू संघात असूनदेखील, ऑस्ट्रेलियाविरुद्ध ऑस्ट्रेलियात मालिका जिंकण्याची किमया भारताला जमणार नाही हे आता निश्चित आहे. पण ऑस्ट्रेलियाच्या यशाला काळी किनार लाभली आहे, ती पंचांच्या चुकीच्या निर्णयांची तसेच सामनाधिकाऱ्यांच्या पक्षपाती वर्तणुकीची. कसोटी क्रिकेटमधील चढउतार सिडनीत बघायला मिळाले. झहीरच्या गैरहजेरीत नवा चेंडू हाताळणाऱ्या रुद्रप्रतापमुळे कांगारूंची अवस्था ६ बाद १३२ अशी झाली; पण सायमंडस्, हॉगच्या शतकी भागीमुळे त्यांनी चारशेचा टप्पा ओलांडला. स्टीव बकनर, मार्क बेन्सन यांनी मेहेरनजर केल्यामुळे सायमंड्सने शतक झळकावले. ३० धावांवर तो झेलबाद असतानाही पंचांनी त्याला नाबाद ठरवले. झेल टिपला आहे, हे ठाऊक असूनही सायमंड्सने क्रीझ सोडले नाही. 'खडूस ऑस्ट्रेलियन्स'चा वॉकर म्हणून लौकिक नव्हताच. बिल लॉरी हा यात माहिर, तो तर सबसे बडा 'नॉनवॉकर'. बिल लॉरीची परंपरा बॉब सिंप्सनने कायम राखली. भारताविरुद्ध १९७७-७८च्या कसोटी मालिकेत त्याने ही सवय कसोशीने पाळत धावांच्या राशी उभारल्या. ऑस्ट्रेलियाची ही समृद्ध परंपरा सुरू ठेवलीय ती पंटर पॉंटिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी. सायमंड्सच्या शतकाचा फटका भारताला बसला, पण नाउमेद न होता भारताने कांगारूंना तोडीस तोड जबाब देत ५३२ धावा केल्या. सचिन तेंडुलकर, लक्ष्मण यांनी शतकं फटकावली तर गांगुली, द्रविड, हरभजन यांनी अर्धशतके झळकावली. दुसऱ्या डावात हेडन, हसीच्या शतकांमुळे ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी ३३३ धावांचे आव्हान दिले. शिवाय हरभजनने ऑस्ट्रेलियाचा कर्णधार रिकी पॉंटिंगला बाद केल्यावर ज्या कोलांटउड्या मारल्या, त्याने पॉंटिंग मनोमन वैतागला. आठव्यांदा त्याला हरभजनने पॅव्हेलियनची वाट दाखवली.

चौथ्या डावात त्रिशतकी मजल मारणं सोपं नसलं तरी कठीण निश्चितच नव्हतं. राहुल द्रविड, सौरभ गांगुली यांना वादग्रस्तरित्या बाद देण्याची आगळीक पंच मार्क बेन्सन, स्टीव बकनर यांनी केल्यावर गहजब झाला. आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीने (आयसीसी) खेळात पारदर्शकता आणण्यासाठी त्रयस्थ पंच, तिसरे पंच (टेलिव्हिजन पंच) त्याच्या मदतीला चौथा पंच आणि सामनाधिकारी (मॅच रेफ्री) असा लवाजमा नेमला. शिवाय आधुनिक तंत्रज्ञानाची मदतही त्यांच्या दिमतीला असतेच, पण खेळातील रंगत वाढण्याऐवजी कमी होत चाललीय. ही कटुता टाळण्यासाठी खेळात अधिकाधिक विकसित तंत्रज्ञानाची मदत घ्यायला हवी असे वाटते. आयसीसीच्या एलिट पॅनलमध्ये दहाच

साधना साप्ताहिक : १९ जानेवारी २००८

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिसमधून

पंच आहेत तर इंटरनॅशनल पॅनलमध्ये आहेत तीस पंच. पंचांच्या दृष्टीने विचार करता सततच्या सामन्यांमुळे प्रवासाची दगदग, निरनिराळ्या देशातील वेगवेगळ्या वेळा (टाईम झोन) तसेच हवामान या बाबीही लक्षात घ्यायला हव्यात. याचा परिणाम त्यांच्या निर्णयक्षमतेवर होणं अटळ आहे. एलिट पॅनलमध्ये भारताचा एकही पंच नाही ही खेदाची बाब. आपल्या पंचांचा दर्जा चांगला नसल्याची ओरड होते. वेंकटराघवनसारखा खमका पंच आपल्याकडे होता. दर्जेदार ऑफस्पिनर, उत्तम क्षेत्ररक्षक तसेच कर्णधारपद भूषवल्यामुळे त्याचा दरारा होता, पण वेंकटच्या निवृत्तीनंतर
मात्र एलिट पॅनलमध्ये भारतीय पंच नाहीत. सुरेश शास्त्री, अमित साहेबा हे दोघेजण आंतरराष्ट्रीय पॅनलमध्ये आहेत.

स्टीव बकनर जमैकाचे, क्रिकेट पंचगिरीआधी फुटबॉलच्या वर्ल्डकप प्राथमिक फेरीच्या लढतीत त्यांनी रेफ्रीची भूमिका बजावली आहे. फुटबॉल रेफ्रीसाठी वयोमर्यादा ४५ असल्यामुळे त्यांनी आपला मोर्चा वळवला क्रिकेटकडे. आयसीसी पंचांचे निवृत्तीचे वय आहे ६५ वर्षे. बकनर सध्या आहेत ६१ वर्षांचे. वयोमानानुसार त्यांच्या दृष्टी आणि श्रवणशक्तीवर परिणाम होणं स्वाभाविक आहे. शंभरहून अधिक कसोटी तसेच दोनशेच्या आसपास वनडेतही (पाच वर्ल्डकप फायनल्सचा अनुभव त्यांच्या गाठीशी जमा आहे) त्यांनी पंचगिरी केली आहे; पण अलीकडे अन् खासकरून भारताच्या सामन्यात त्यांची पंचगिरी सुमारच ठरतेय. टेलिव्हिजनवरील प्रक्षेपणामुळे तर त्यांच्या चुका ठळकपणे नजरेत भरतात. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या खेळाडूंना शिक्षा होते. पाकिस्तानविरुद्ध जयपूर वनडेत पंचांच्या निर्णयावर नाराजी दर्शवणाऱ्या युवराजला दंड करण्यात आला. पंचांना मात्र चुकीचे निर्णय दिले तरी शिक्षेची तरतूद नसल्यामुळे पंचांना खेळाडू, मीडिया तसेच प्रेक्षकांच्या रोषाला सामोरे जावे लागते.

एलिट पॅनलमध्ये एखाद्या पंचाचा समावेश करावा की नाही, हे कर्णधारांच्या अहवालावर अवलंबून असते. प्रत्येक सामन्यानंतर कर्णधार आयसीसीला अहवाल सादर करतात, त्यात पंचांबाबत टीकाटिपणी असते. पंचांच्या एखाददुसऱ्या निर्णयाकडे दुर्लक्ष केले तरी त्यांच्याकडून सातत्याने चुका झाल्या तर तिकडे दुर्लक्ष करता येत नाही.

क्रिकेटच्या खेळात रोबोसारखा यांत्रिकपणा परवडण्यासारखा नाही, त्यातील मानवी अंग (ह्युमन एलिमेंट) नष्ट करून चालणार नाही, ते टिकायलाच हवे. क्रिकेटधुरिणांनी ही बाब लक्षात ठेवायला हवी, पण अधिकाधिक बिनचूक निर्णयांसाठी आधुनिक यंत्रसामुग्रीचा उपयोग अटळ आहे. वारंवार होणाऱ्या पंचांच्या चुकांमुळे रंगाचा बेरंग होऊ शकतो, याची प्रचिती सिडनी कसोटीत आली. याच कसोटीत तिसरे पंच ब्रूस ऑक्सनफर्ड यांनी महेंद्रसिंग ढोणीने केलेले यष्टीचितचे अपील नाकारले, अन् सायमंड्सला जीवदान लाभल्यावर खेळाचे पारडेच फिरले. खेळाडूंप्रमाणे पंचांवरही प्रचंड दडपण असते तेव्हा तंत्रज्ञानाची मदत घेण्यात काहीच वावगं नाही. टेलिव्हिजन चॅनलमध्ये सामन्याच्या प्रक्षेपणासाठी प्रचंड स्पर्धा असते, त्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. प्रेक्षकांना चांगले दर्जेदार प्रक्षेपण दाखवण्यासाठी ते जीवाचा आटापिटा करत असतात.

तिसऱ्या पंचांच्या भूमिकेचे पुनर्विलोकन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सायमंड्स यष्टिचीत असल्याचा निर्णय तसेच राहुल द्रविडच्या झेलाबाबतचा निर्णय वादग्रस्त ठरले. अशा प्रसंगी तिसऱ्या पंचांना मैदानातील पंचांशी वॉकीटॉकीवरून संपर्क साधून निर्णय फिरवण्याची मुभा द्यायला हवी. चार पंच आणि सामनाधिकारी अशी पाच मंडळी खेळावर नियंत्रण राखण्याचे काम करतात. टेनिसप्रमाणे क्रिकेटमध्ये रेफरलची पद्धत राबवण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. या वर्षअखेरीस पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत प्रायोगिकरित्या आयसीसी याची अंमलबजावणी करणार असून त्याची गरज आहे.

हरभजनने सायमंड्सला केलेल्या वर्णद्वेषी शेरेबाजीच्या आरोपाची व त्याला बजावण्यात आलेल्या तीन कसोटी सामन्यांची बंदीची शिक्षा माईक प्रॉक्टर यांनी ठोठावल्यावर क्रिकेटजगतात तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने याबाबत कडक धोरण अवलंबिले आहे. बंदी न उठवल्यास भारतीय संघ ऑस्ट्रेलियाचा दौरा अर्धवट सोडून देईल, याचा पुनरुच्चार भारतीय क्रिकेट मंडळाने केला आहे. आयसीसीच्या आचारसंहितेनुसार दौरा अर्धवट सोडल्यास भारताला जबर दंड भरावा लागेल.

**— शरद कद्रेकर**

■

**आपल्या वर्गणीची मुदत संपली तर नाही ना?**